नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

दिवाळी अंक-१९६६

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र


वर्ष २१] नोव्हेंबर १९६६ [अंक

मूल्य : रु. २

युगवाणी

दीपावली-विशेषांक
१९६६





काश्मीरमधील दोन नयनरम्य निसर्गदृश्ये

अनुक्रमणिका

दीपावली विशेषांक १९६६

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ–पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

यु ग वा णी

संपादक
मा. नी. गलगलीकर

वर्ष २१] नोव्हेंबर १९६६ [अंक ७

' हें असेंच कांही तरी '

लागला दिव्याने दिवा
मलबला व्यर्थ थांबवा
कुणि नका करू गवगवा !

संदेह न मनिं वागवा
दावा न दिव्याला दिवा
नच मूर्खवाद वाढवा !

काजळी न वा स्नेह तें
हें असेंच कीं तेवतें
उजळास उजाळा इथे !

धरितां न आतुडे तरी
आकार घे न वैखरी
हें असेंच कांही तरी !

—गुणवंत हनुमंत देशपांडे

—अभिनंदन—

या दिवाळीनिमित्त 'युगवाणी' तर्फे सर्व सभासदांचे आणि वाचकांचे शुभचिंतन.

संपादक-मंडळ,
'युगवाणी' वि. सा. संघ.

अंतरलेला देव

तारा शास्त्री

" काय केलंस तूं हे ?" आई तळतळून म्हणत होती. दु:ख, संताप, अगतिकता अशा संमिश्र भावनांनी, ती बेभान झाली होती. कधी, " ईश्वरा हे सगळं पहायला का मला 'त्यांच्यामागे' जिवंत ठेवलंस ? " असा दीनवाणा आक्रोश करीत होती. कधी, निर्भर्त्सनेची आग पाखडत म्हणत होती,—

" अग ह्या घराण्यातल्या मुलींनी कधी डोळा वर करून कुणाकडे पाहिलं नाही. देव-धर्म आणि कुळाचार करणारं शुचिर्भूत ब्राम्हणाचं घर हे ! भ्रष्ट माणसं ह्या घराची पायरी चढायला वचकायची. आणि तूं...तूं ..!"

तिचा संताप अनावर होत होता.

" कोण कुठला तो—एखाद्या उनाड मैनेसारखी—त्याचा हात धरून घराबाहेर निघालीस ?"

मुलगी मध्येच आईला अडवण्याचा प्रयत्न करीत होती

" आई, आई; अग माझं ऐकून तरी घे."

" काही ऐकायचं नाही मला. आपल्या तोंडून आपल्या पापाची कबूली देणार तू; ऐकलं तर कान बहिरे होतील माझे कायमचे. "

आई मुलीचा हात झिडकारीत म्हणत होती.

कुणी कुणाचं ऐकायचं आणि कुणी कुणाला सांगायचं ! तो प्रसंगच तसा होता. आईच्या दृष्टीने त्यात सान्त्वनाला जागा नव्हती. झाल्या गेल्याला उपाय नव्हता. आशा, अपेक्षा कसली ? दिवाभीतासारखं तोंड लपवून जगायची वेळ आली होती. नवरा मेला, त्या प्रसंगातून ती पार पडली होती. पण ह्या नव्या संकटानं तिला कैचीत पकडलं होतं. मुलीला धरून ठेवता येत नव्हतं. सोडता येत नव्हतं. आईचं दु:ख मुलीला समजत होतं. पण तिचा निरुपाय झाला होता.

मुलगी उठली. उठताना पुन: एकदा अश्रूंची एक नवी सर तिच्या डोळ्यावाटे वाहू लागली. पाय अड-खळत होते, पण खोलीतून बाहेर पडायलाच हवं होतं. ती वळली. आईचं लक्ष तिच्या जाण्याकडे गेलं, तसं तिचा ओचा धरून तिला खाली बसवीत ती म्हणाली,

" बस खाली. चाललीस कुठे ? मी नाही जाऊ देणार तुला."

ती बसली, आईच्या रागाच्या शब्दात सुद्धा, तिच्या मनातली कणव तिला जाणवली. आईचा थर-थरता निकट स्पर्श, तिच्या अंत:करणाला जाऊन भिडला. तिला गहिवरून आलं. " आई—! " म्हणत तिने आईच्या गळ्याला मिठी मारली. मग मायलेकी थोडा वेळ अगदी जवळ आल्या. दोघींचे अश्रू एक-मेकात मिसळले. शांत झाल्यावर आईच्या मिठीतून दूर होत ती म्हणाली,—

" आई तुझा फार मोठा अपराध केला आहे मी. मला समजतं. पण मी पाप केलं आहे असं म्हणू नकोस. नाही ग ! इतकी वाईट नाही मी. जात-धर्म मी काही पाहिलं नाही, फक्त माणूसच पहात राहिले हे खरं ! पण म्हणून मला त्याचा विश्वासघात करता येणार नाही. करायला तू सांगू नकोस !"

आईचा स्वर कठोर झाला— "अन् प्रत्यक्ष आईचा विश्वासघात करताना तुझ्या मनाला दिक्कत वाटली नाही ?"

मुलगी बोलली नाही. बोलायला उत्तर नव्हतंच-बाहेर तो पोंगा वाजवीत होता, तो कानावर येताच ती एकदम उठली. म्हणाली,

"जाते मी. मला न्यायला आले आहेत ते."

"न्यायला आला आहे तुला ? माझ्या समोर माझ्या मुलीला पळवून नेता येईल असं वाटलं त्याला? बाप नाही म्हणून बेवारशी माल समजला तुला तो ? त्याला सांगते मुलीची आई जिवंत आहे अजून !"

संतापाने बेभान होऊन आई तरातरा बाहेर निघाली. मुलीने आईचा दंड धरला आणि आईला अडवीत जरबेच्या स्वरात ती म्हणाली,—

"आई, तमाशा करायचा आहे तुला ? त्याचा काही एक उपयोग होणार नाही. मला अडवणं तुझ्या हातात राहिलेल नाही."

तिने निश्चयाने पाऊल पुढे टाकलं. मुलीच्या आवाजातली जरब आईला उमजली, ती दूर झाली. पण दूर होताना भावनाशून्य कठोर आवाजात म्हणाली,—

"घराच्या बाहेर जाताना एक गोष्ट सांगते ती लक्षात ठेव. आजपासून तू मला मेलीस आणि मी तुला मेले."

त्या शब्दांनी मुलगी दारात थबकली. पण आई दुसऱ्या खोलीत निघून गेली होती. मग ती थेट मोटारीत त्याच्या शेजारी जाऊन बसली. म्हणाली, "चला—!"

× × ×

हॉटेलमध्ये आपल्या ठरलेल्या खोलीत येऊन ते पोचले. आत येताच विमनस्कपणे खिडकीच्या गजांना दोन्ही हात धरून ती बाहेर पहात उभी राहिली. त्याने आपल्यामागे दार ओढून घेतलं. आणि तिच्या डाव्या खांद्यावर हात ठेवून, तिच्या अगदी जवळ, तो उभा राहिला. त्याचा स्पर्श होताच आतापर्यंत तिने आवरलेले सारे बांध कोसळले. गजावरचे हात काढून ती त्याच्याकडे वळली. त्याच्या छातीवर डोकं ठेवून हमसून हमसून हुंदके देऊ लागली तो बोलला नाही. तिला अधिक जवळ घेत, तिच्या केसावरून, खांद्यावरून हात फिरवीत राहिला. हुंदक्याचा पहिला भर ओसरल्यावर, त्याने आपल्या छातीवरून तिचं डोकं दूर केलं. तिची हनुवटी वर उचलत तो म्हणाला,

"किती रडशील ! आज आपल्या दोघांच्या आयुष्यातला आनंदाचा दिवस !"

तिला पुन: हुंदका आला. गद्‌गदून ती म्हणाली,

"माझं असं कुणी राहिलं नाही मला."

"छी ! असं काय बोलतेस वेड्यासारखं ? मी आहे ना तुला ? मी असताना. . . ."

त्याला मध्येच अडवीत ती म्हणाली,

"माझं सगळं काही आता फक्त तुम्ही आहात!"

तिचे दोन्ही गाल आपल्या हाताच्या ओंजळीत घेत तो म्हणाला,

"अन् मला फक्त तू आहेस !"

मग जवळच्या आरामखुर्चीवर तिला बसवीत तो पुढे म्हणाला,

"आता बिलकुल रडायचं नाही. बरोबर पाच वाजता जायचं आहे आपल्याला. तोपर्यंत हे सुजलेले डोळे. हा कोमेजलेला चेहरा, हा लाल झालेला नाकाचा शेंडा—!"

आपल्या बोटांच्या चिमटीत तिच्या नाकाचा शेंडा धरीत तो हसला. तिचेही ओठ थोडे विलग झाले.

"बस्स ! सध्या इतकं पुरे आहे." तिला न्याहाळीत तो म्हणाला आणि पुन: हसला. तीही आपली विमनस्कता विसरली. हसली. त्याने झट्‌दिशी आपले ओठ तिच्या ओठांवर ठेवले

पाच वाजता रजिस्ट्रारच्या ऑफीसमध्ये पोचायला हवं होतं. दोघांनी तयारी केली. तिच्या करता मुद्दाम त्याने गुलाबी रंगाची साडी आणि ब्लाऊज पसंत केला होता. मखमलीच्या पेटीतून मोत्याची माळ गळ्यात घालायला तिने बाहेर काढली तेव्हा तो म्हणाला,

"थांब पहिल्यांदा, टायची गाठ तेवढी नीट करून दे."

ती हसली. तो म्हणाला,

"हसतेस काय ? आता हे काम रोजचंच तुझ्या मागे लागणार !"

"आलंय् माझ्या लक्षात ते." ती म्हणाली.

"काय काय लक्षात आलं आहे सांग पाहू ?" तो.

"सगळं आलं आहे." ती.

"पण सांग तर !" तो.

"सांगेन ओघाओघाने." ती.

"मग आताच्या ओघात मी काय करणार आहे सांग पाहू." तो.

तिने थोडा वेळ विचार केला. ड्रेसिंग टेबलवरची, मखमली पेटीतली माळ हातात घेतली, आणि म्हणाली—

"ही माळ माझ्या गळयात घालणार आहात !

"आणखी ?"

"आणखी काय बाई ?"

"डोळे मीट."

तिने डोळे मिटले. खिशातून सोन्याच्या तारेत गुंफलेलं मंगळसूत्र त्याने बाहेर काढलं आणि दोन्ही हातात त्याची दोन टोकं तिच्यापुढे धरीत तो म्हणाला,— "डोळे उघड."

तिने डोळे उघडले. आश्चर्यातिशयाने ती म्हणाली,—

"अगबाई, मंगळसूत्र ! हे–हे–तुम्ही केलंत ? केव्हा केलंत ? मला बोललासुद्धा नाहीत !"

"तुला आश्चर्यचकित करायचं ठरवलं होतं."

"हो– ? मला वाटलं..." ती चाचरत म्हणाली.

"काय वाटलं ?" तो मिस्किलपणे तिच्याकडे पहात म्हणाला.

"ना...ही... !"

ती थोडा वेळ अंतर्मुख झाल्यासारखी झाली. खालच्या मानेनं म्हणाली, "तुमच्याकडे लग्न झालेल्या बायका काय घालतात हो गळयात ?"

"कुणाकडे ?" तिच्याकडे रोखून पहात तो म्हणाला.

"तुमच्याकडे ?" त्याच्या प्रश्नाचा रोख न समजून मान वर करीत ती म्हणाली.

'तुमच्याकडे' वर जोर देत तो म्हणाला,

"तुमच्याकडे काय घालतात आपल्याला माहीत नाही बुवा ! पण आपल्या दोघांमध्ये हे घालतात."

त्याने हातातलं मंगळसूत्र तिच्या गळयात घातलं.

तिच्या डोळयात अश्रू गर्दी करू लागले.

तिची हनुवटी वर उचलीत तो म्हणाला, "आता हे कशाला ?"

"फार फार चांगले आहात तुम्ही !" ती म्हणाली.

"तुझ्या गोऱ्या गोऱ्या मानेवर मंगळसूत्र फार छान दिसत आहे, बघ तरी आरशात." तिला आरशा-जवळ नेत तो म्हणाला.

आरशात तिच्या शेजारी त्याच्या हसऱ्या चेहऱ्याचं प्रतिबिंब पहाताच ती लाजली. त्याला बिलगली.

"आता वाटतंय की नाही ?" त्याने विचारलं.

"काय ?"

"आपण नवरा–बायको आहोत असं ?" तो म्हणाला.

"अजून अर्धा तास आहे म्हटलं." ती.

"तो संपेल ग ! पण समजा तोही संपला, अन् हे गळयात नाही..."

ती गंभीर झाली. कृतज्ञतेच्या भावाने म्हणाली,

"फार समजतं तुम्हाला, फार चांगले आहात तुम्ही"

× × ×

आपल्याला दिवस गेल्याचं कळलं तिला, अन् का कोण जाणे पोटात भीतीचा गोळा उठावा तसं झालं. नवऱ्याची नोकरी दौऱ्याची. तो बाहेरगावी गेला होता. आठ–दहा दिवस तरी परत येणार नव्हता. घरात ती एकटीच होती. सकाळपासून उलटया सुरू होत. डोकं दुखू लागे. जीव गलबलल्यासारखा होई. अन्नावरची तर वासनाच उडाली होती. चुलीत पेटणं घालायचंसुद्धा तिच्या जीवावर येई. नुसतं अंथरुणावर पडायचं अन विचार करायचा. मग सारखी आईची आठवण येई. वहिनींच्या डोहाळयाचं तिने पुरवलेलं कोडकौतुक आठवे. गर्भिणीनं पाळायच्या नियमांच तिने केलेलं अवडंबर आठवे.

"त्या आईच्या कुशीत आठ दिवसाकरता का होईना विश्रांती घेता आली तर ?"

आईच्या विचारांबरोबर तिच्या मनात हुरहूर दाटून येई. डोळे मिटले की सारखी आई घरात वावरताना दिसू लागे. हा ध्यास कमी करायच्या प्रयत्नात, डोळ्यातून पाण्याची झिरपण सुरू होई. 'नवरा तरी घरी यावा !' मूल होणार ही गोष्ट तिला सुखाची वाटत नव्हती. अन् वाटत नव्हती त्यामुळे नवऱ्याबद्दल एक प्रकारचा दुरावा जाणवत होता, 'तो घरी नाही' हे कधी तिला एका परीने बरंच वाटे. आणि तरीही तो आला की त्याच्या कुशीत शिरायची तिला घाई होई. 'त्याच्यावरच रागवायचं आणि सान्त्वनाकरता पुन: त्याच्याकडेच धाव घ्यायची.' तिचं तिलाच नवल वाटत होतं.

तो आला. त्यानं "तुला बरं नाही का ?" असं तिला विचारलं. पण आपल्या दुखण्याचं कारण सांगायला तिची जीभ धजली नाही.

स्वत:चं आयुष्य त्याच्या आयुष्याशी निगडित करण्याचा निर्णय तिने फार खंबीर मनाने घेतला होता. त्याकरता आई–भावांचे, आप्तांचे, जाती–धर्माचे सारे पाश तोडून टाकले होते. तिला जाणिव होती. ह्या नव्या अनोळखी जगातल्या आयुष्याचा मार्ग सोपा नाही. पण निर्णय घेतला त्याच वेळी 'जे होईल ते' सोसण्याची धमक तिने बाळगली होती. तिने प्रेम केलं होतं तो तिला मनापासून आवडला होता. धर्मभेदाच्या जंजाळात नवरेपणाचा अधिकार गाजवून त्याने तिच्या मनाची कधी ओढाताण केली नाही. स्वत:च्या मनावरचे संस्काराचे ठसेही, दोघांचं एकत्रित जीवन सुसह्य करण्याकरता,. नाहीसे करण्याची शिकवण ती निश्चयाने आपल्या मनाला देत होती. पण हे सगळं तिच्यापुरतं मर्यादित होतं. हे सगळं फक्त ती करणार होती. फक्त ती ! तिच्या शेवटाबरोबरच तिची सारी धडपड, सारी ओढाताण शांत होणार होती.

पण आता तिला मूल होणार होतं. 'मूल होणार होतं म्हणून नवऱ्याला आनंद वाटेल का ?' तिला तेही सांगता येत नव्हतं. 'मूल होण्याबद्दलची त्याची अन् तिची भावना एक असू शकत नाही' येवढंच फक्त तिला जाणवत होतं. 'दोघांचं मूल ! त्याला आनंद झाला तर ?' तर त्यात ती सहभागी होऊ शकणार नव्हती. 'अन् त्याला आनंद झाला नाही तर !' तिच्या दु:खाला पारावार उरणार नव्हता.

जसजसे दिवस वाढू लागले, पोटातल्या गर्भाची हालचाल तिला जाणवू लागली, तसतशी ह्या नव्या जीवाबद्दल एक अपार कणव तिच्या मनाला खिन्नता आणू लागली. उलट्या थांबल्या होत्या. डोकंदुखी थांबली होती. पण विचारांच्या गोंधळाखाली ती इतकी दबली होती की, अन्नाचं तिला वावडं झालं होतं. 'आपण कशावर जगतो आहोत ?' हेच तिला कळत नव्हतं.

नवरा म्हणत होता, "एकदा डॉक्टरकडे चल."

ती टाळाटाळ करीत होती. पण शेवटी एकदा त्याच्याबरोबर गेली. नंतर महिन्याला, आठवड्याला एकटीच जाऊ लागली. डॉक्टर म्हणाले होते, 'मूल फार मोठं आहे' कडक डोहाळ्यांनी आणि अन्नद्वेषामुळे आधीचीच तिची नाजुक शरीरयष्टी, अधिकच नाजूक, अशक्त दिसू लागली होती. पण, मूल बापाच्या वळणावर जाणारसं दिसत होतं. सहा फूट उंचीचा, रुंद हाडापेराचा तिचा नवरा ! त्याच्या अंगकाठीचा वारसा घेऊन मुलगा येणार होता आणि म्हणून तिला त्राग देऊन जन्मणार होता हे निश्चित् !

त्यामुळे डॉक्टरकडच्या फेऱ्या वाढत होत्या. आपल्या तपासणीची पाळी येईपर्यंत, तिथे ती बसलेली असली की, तिच्या मनात येई,—

"ह्या बाळंतपणात आपल्याला काही धोका झाला तर ?"

"मूल की आई ?" डॉक्टरपुढे पुष्कळदा उभ्य. राहिलेल्या ह्या समस्येची उदाहरणं तिला आठवत तिला वाटे,

"असाच आपल्या जीवाला धोका झाला तर ? तर काय ? ह्या अस्वस्थ मनाला कायमची विश्रांती मिळेल. वाईट काय त्यात ? पण, आपल्यामागे आपलं हे मूल जगेल याची काय वाट ? छे: छे: !" ती मनाला सावरी.

(पुढील मजकूर पान ३०० वर)

रिकामा

मनोहर तल्हार

नोकरीशिवाय भटकण्याची आता त्याला सवय जडते. ते भटकणे अंगवळणी पडल्याने त्याला कशाचेच काही वाटत नाही. खिशात पंधरा–वीस नवे पैसे असले म्हणजे त्याचे भागते. पैसे नसले तरी भागते. कुठे तरी भटकत राहणे. भटकता भटकता विचारांना वाटेल तिकडे भरकटू देणे याचाच त्याला छंद जडतो. या छंदातून त्याने किती तरी शोध लावलेले असतात.

मधाशी अशा विचारातून एक नवा शोध त्याला लागतो. रस्त्यावर स्त्री–पुरुषांची खूप गर्दी असते. रंगीबेरंगी पोषाखातल्या अनेक तरुणी त्याची नजर स्वतःकडे आकर्षित करून घेतात. त्यातल्याच एका आकर्षक पोरीकडे बघून त्याला तो शोध लागलेला असतो. त्या पोरीच्या अंगावरले कपडे अतिशय तलम असतात. उरोजावरून लपेटून घेतलेल्या पदरातून— पदराखालच्या पोलक्यातून तिची ब्रेसियर ठसठशीतपणे दिसत असते. इतकी ठसठशीतपणे की तिने नुसती ब्रेसियरच अंगात घातलेली आहे असे वाटावे.

त्यावरूनच त्याला ती कल्पना सुचते. मागे "बावना डेव्हील" नावाचा 'थ्री डायमेन्शन' चित्रपट लागला होता. तो बघताना विशिष्ट प्रक्रिया केलेला चष्मा डोळ्यावर ठेवला की पडद्यावरील चित्रांना घनता प्राप्त होत असे. प्रत्येक वस्तू प्रत्यक्ष बघावी तशी वाटते. प्रत्येक वस्तूला घनता प्राप्त झाल्याने ती सपाट पडद्यावर असून पडद्याबाहेर असावीसे वाटते.

अशाच प्रकारचा चष्मा असावा. तो डोळ्यावर लावल्याबरोबर समोर असलेल्या त्या तरुणीच्या अंगावरील पोषाख दिसू नये. फक्त ती दिसावी. तिच्या साऱ्या अवयवांसह !

आणि त्या कल्पनेनं तो हुरळून जातो. डोळ्यावर चष्मा नसूनही त्या तरुणीला हवे तसे बघतो. मनोमन सुखावून जातो.

ती तरुणी गर्दीत मिसळून जाते आणि त्याचा चष्मा फुटतो. पण त्याला त्या नव्या शोधाचे खूपच कौतुक वाटते. ती कल्पना रस्त्यात भेटलेल्या आपल्या एका मित्राला तो सांगतो. त्याच्या मित्राला त्याच्या त्या नवीन शोधाची खूप मजा वाटते. तो हसतो. मग म्हणतो—

"तू आता ह्या नवीन शोधामुळे एखाद्या दिवशी पागल होशील ! कुठे तरी नोकरी बघ. पैसा जमव आणि लवकरात लवकर लग्न कर ! त्याची तुला फार गरज दिसते !"

"कशावरून ?"

"उघड्या बाया बघण्यासाठी हा नवीन शोध तू लावला आहेस त्यावरून !"

तो आपल्या मित्राकडे नुसता बघतो.

"आणि उघड्या बाया बघण्यासाठी 'तसल्या' चष्म्याची आता गरजही नाही. आठ–बारा आणे फेकले की तू ते 'वसंत'मध्ये लागलेल्या एका इंग्रजी बोलपटात बघू शकतोस !"

"कोणता इंग्रजी बोलपट ?" तो उत्सुकतेनं विचारतो.

"पॅरिस शॅम्पेन !"

"तो तसा आहे काय ?"

"जवळ जवळ सारेच उघडे दर्शन !"

"अस्सं !"

आणि त्याचा मित्र जाऊ लागतो तसा तो त्याला अडवितो. काही तरी आठवून त्याला म्हणतो—

"ते जाऊ दे. ती झाली आपली एक गंमत. माझे एक काम कर !"

"कसले ?"

"मला एक रुपया हवा आहे !"

"पिक्चरला !" तो मिस्कील बघून हसतो.

"छे. एका नोकरीच्या जागेसाठी अर्ज करायचा आहे. त्यासाठी ! आहे का ?"

"खिशात एक दमडीदेखील नाही. सायंकाळी घरी ये. घेऊन जा. आता मी चाललोय् कामावर !"

आणि तो निघून जातो.

त्याला कसेसेच वाटते. पुन्हा तो भटकतो. भटकताना विचारांना भरकटू देतो. त्याला तीव्रतेने त्या चष्म्याची उणीव भासते. तसला चष्मा अस्तित्वात नसल्याची रुखरुख वाटते. शास्त्रज्ञ वाटेल ते शोध लावतात. पण, असले बारीक बारीक शोध का लावीत नाहीत ? किती फायदा होईल लोकांचा...पण, अशा चष्म्याची किंमत फार राहील नाही का ? पण, ही सारी चैन श्रीमंतांची ! आपण गरीबांनी फक्त त्या चष्मेवाल्यांकडे बघायचं. त्यांनी मात्र भर चौकात आपणाला नागवं बघावं...अगदी नागवं.

तो आपल्या अंगावरले कपडे चाचपडतो. ते जिथल्या तिथेच असतात. त्याला त्यातच समाधान वाटतं. पँट बराच मळलेला असतो आणि शर्ट खांद्यावर थोडासा उसवला असतो. तो त्या उसवलेल्या भागाकडे बघतो आणि त्यातली एक दसडी ओढून काढतो. चावू लागतो. मग चावून त्याचा चोथा करून तो थुंकतो. तसला चष्मा लावून मिरविणाऱ्यांच्या अंगावर थुंकावा तसा ! त्याला वाटतं—असंच बोलता बोलता अनेकांना थुंकी उडवायची संवय असते. अशा माणसांशी बोलत असताना आपण बचावाकरिता ब्लॉटिंग पेपर तोंडापुढे धरावा.

तो त्या कल्पनेनं हसू लागतो. हसता हसता त्याचं लक्ष एका जोडप्याकडे जातं.

उन्हाचा खूप मारा होत असल्यामुळे ती स्त्री डोकीवर पदर घेऊन आपल्या नवऱ्याबरोबर चालली असते. आणि ती नवऱ्याने केलेल्या विनोदावर हसत असते. हसता हसता तिचं त्याच्याकडे लक्ष गेलं असतं आणि त्याचवेळी तो त्या कल्पनेनं हसत असतो तिला वाटतं की तो आपणाला पाहून हसत आहे. चेनचं पाकीट चेन ओढून बंद करावं तसं ती आपलं तोंड बंद करते. त्याला उगीचच आपल्या थोबाडीत मारल्यासारखं वाटतं. तो मनातल्या मनात खजिल होतो. तो पुन्हा त्या तरुणीकडे बघतो. ती मोठमोठे डोळे करून झप् झप् चालू लागते.

तो त्या पाठमोऱ्या तरुणीकडे बघतो. तिची चाल त्याला डौलदार वाटते. चालताना तिचे नितंब वर—खाली होतात. तो डोळे फाडून बघतो. आणि मग त्याला पुन्हा रुखरुख वाटते. तो चष्मा आपल्या डोळ्यावर असायला हवा होता.

त्याला स्वतःचा जीव कासावीस झाल्यासारखं वाटू लागतं आणि मग त्याला जाणवतं की आपल्याला खूप तहान लागलेली आहे. तो समोरच असलेल्या 'घी न्यू आनंदाश्रमा'त जातो. पोऱ्याला म्हणतो—

"पानी लाव् !

चार पाच नोकर इकडे तिकडे फिरत असतात. कोणीच त्याच्या मागणीकडे लक्ष पुरवीत नाही. पाचही बोटे चार पेल्यात बुचकळून नेणाऱ्या एका पोऱ्याला तो म्हणतो—

"पानी लाव् !

"और क्या होना ?"

"पैले पानी लाव् !"

तो पोऱ्या त्याच्याकडे डोळे फाडून बघतो. पेले, चवाचवा खाणाऱ्यांच्या पुढ्यात ठेवतो. म्हणतो—

"बैठो ! खडे मत रहो !

तो तिथल्या एका टिनपाट खुर्चीत मुकाट्यानं बसतो. बराच वेळ बसून राहतो तरी पाणी येत नाही.

तो आपले खिसे चाचपडतो बीस नवे पैसे हाताला लागतात.

" एक चालू लाव् !

ऑर्डरवाला पोऱ्या एक चहाचा पेला त्याच्या समोर ठेवतो. तसा तो डाफरतो—

" जवसे पानी मंग रहा. मगर ओ किसीको सुनायी नही दिया. चाय् माँगा तो झटसे लाके पटक दिया ! इतने यहाँ नौकर है ओ क्या सिर्फ ' शो ' के लिये है क्या ? "

" पानी देना पोट्टे ! काऊंटरवाला ओरडतो.

त्याला एक कल्पना सुचते. इथे इतके नोकर आहेत. फक्त शोभेसाठो. प्रत्येकाला फोटोफ्रेम करून डकवून द्याव. आणि देवादिकांची पूजा करतात तशी त्यांची पूजा करून त्यांना हार घालावेत. त्यांच्या तोंडात हॉटेलात असलेले पेढे दाबावेत. आणि प्रत्येकाच्या डोळ्यात उदवत्यांचा जुडगा पेटवून दाबावा. धूर मात्र त्यांच्या नाकातून निघावा. सिगारेट ओढल्यावर निघतो तसा.

आणि मग त्याला सिगारेट प्यावंसं वाटू लागतं. पोऱ्या त्याच्यापुढे जर्मलचा पेला आदळतो. तसा तो रागानं म्हणतो

और जमके पटको ! "

पोऱ्या खजिल चेहऱ्यानं त्याच्याकडे बघतो.

तो गटागटा पाणी पितो. पुन्हा एक पेला पाणी मागवून रिचवितो. तिसरा पेला पोटात रिचवितो तेव्हा त्याला वाटतं की पोटात सारा चिखल झाला आहे. तो हात घालून उपसून काढावा. विहिरीतील गाळ उपसतात तसा मग चांगले स्वच्छ पाण्याचे झरे लावावेत. विहिर तुडुंब भरावी. आणि नाकातोंडात पाणी यावं. .

तो चहाचा पेला तोंडाला लावतो. लहानपणी एकदा चुकून तो गोमूत्र प्यायला होता, त्या चवीची त्याला आठवण होते. पोटातले सारे आतडे तोंडात आल्यासारखा चेहरा करून तो चहाचा पेला रिकामा करतो आणि दहा नवे पैसे काऊंटरवर फेकून तो धक्के मारून हाकलून दिलेल्या माणसासारखा हॉटेलबाहेर पडतो.

नोकरीसाठी म्हणून कुणाला विचारायला जावं आणि त्यानं धक्के मारून हाकलून द्यावं तसं त्याला वाटतं. तो उगीचंच दाढीवरून हात फिरवितो दाढीचे खुंट चांगले वाढलेले असतात.

दाढी करायची असते—सचैल स्नान करून सुवासिक साबणाच्या वासात मस्त न्हायला हवं असतं. चांगले परिट घडीचे कपडे पेहरून पिक्चरला जाणं आवश्यक असतं. मस्त पिक्चर पॅरिस शॅम्पेन. आणि तो चष्मा. तो खिसा चाचपडून बघतो. खिशात फक्त नवे दहा पैसे असतात.

—आणि तो पुन्हा दिशा नसल्यासारखा भटकतो.

जुलूस

शशिकान्त नारायण केळकर

चौरस्त्यावर रिक्षात विस्कटलेल्या केसांचा व तारवटलेल्या डोळ्यांचा एक अत्यंत हडकुळा लीडर लाउडस्पीकरवर किंचाळू लागला. खरं म्हटलं तर त्याचा स्वतःचा आवाज त्याच्या हडकुळ्या शरीराशी अत्यंत विसंगत असल्यासारखा अगदी कर्कश होता. त्यात तो स्पीकरवर बोलत असल्याने तो आवाज कान फोडून जात आहे असं वाटत होतं.

तो आवाज ऐकताच साऱ्या चौरस्त्याचे लक्ष त्याच्याकडे गेले. ठेल्यावर पान खाणारी, चौरस्त्यावर गप्पा मारणारी, हॉटेलात चहा पिणारी, न्हाव्याच्या दुकानात बसलेली–सगळी माणसं त्याच्याकडे पाहू लागली.

तेवढ्यात आणखी दोन लीडर हातात मोठा फलक घेऊन त्या रिक्षाजवळ आले. त्यापैकी एका लीडरचे शरीर फुटबॉलच्या ब्लॅडरसारखे तट्ट फुगले होते. त्याच्या तेलकट मद्दड चेहेऱ्यावर, त्याचे पान खाऊन लाल झालेले दात दाखवणारे एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंतचे हास्य भळभळत होते. त्याचे काळे मेणचट कपडे महिनोगणती न धुतल्यासारखे वाटत होते. दुसऱ्या लीडरने मात्र पायापासून डोक्यापर्यंत पांढरी सफेद खादी पांघरली होती. त्याचा चेहेरा पहिल्यासारखाच मद्दड होता. अगदी चेहऱ्यावरची माशीसुद्धा हालेल असे न वाटण्याइतका. परंतु तो हसत नव्हता. त्यामुळे चेहेऱ्याचा मद्दडपणा जास्त बटबटीत वाटत होता. त्याच्या डोळ्यात लांडग्याच्या डोळ्यात असतो तसा भाव तरळत होता.

आता ते तिघंही लीडर मिळून जोरजोराने घोषणा देत होते. चौरस्त्यावरच्या लोकांना जुलूसमध्ये सामील व्हायला चुचकारीत होते.

त्या तिघांच्या कर्कश आवाजातल्या घोषणा त्यांच्याकडे टवकारून पहाणाऱ्या चौरस्त्यावरच्या माणसांच्या मनात लहरी निर्माण करीत होत्या. हळूहळू माणसं त्या रिक्षाभोवती जमू लागली. कुणी गंमत म्हणून, कुणाला त्या लीडरबद्दल आपुलकी वाटली म्हणून, कुणाला त्यांच्या घोषणा पटल्या म्हणून, कुणाला त्यांची कीव आली म्हणून, तर कुणी केवळ इतर माणसं जमली म्हणून.

हळूहळू रिक्षाभोवती माणसांची खूप गर्दी जमली. ती गर्दी पाहून आणखी लोक त्या गर्दीत येऊन मिसळू लागले आणि ती गर्दी रस्त्यावर लांबवर पसरू लागली.

त्या लांडग्याची नजर असलेल्या लीडरने एकदा आपली मान उंचावून त्या लांबवर पसरलेल्या जुलुसाकडे पाह्यले व रिक्षाला समोर सरकायचा इशारा केला. आणि त्या रिक्षामागे ती हजारो डोकी असलेली निर्बुद्ध मानवजात एखाद्या सुस्त अजगरासारखी सरपटू लागली.

ते तिघं लीडर हात उंचावत, फलक नाचवीत, त्वेषाने घोषणा देत पुढे सरकत होते. त्यामागून येणारा तो अफाट जनसमुदाय एकमुखाने जोराजोराने प्रतिघोषणा देत होता. तो गजबजाट सगळ्या शहराचं अंग पोखरीत पुढं पुढं घुसत होता.

रस्त्यावरची माणसं जुलूसमध्ये सामील होत होती. जुलूसमध्ये सामील होणाऱ्या प्रत्येक माणसाची स्वतःची जाणीव त्या कर्कश घोषणांत विरघळून जात होती. प्रत्येकाचे स्वतंत्र अस्तित्व संपत होते. प्रत्येक जण निराधार, अनिश्चित होत होता. आणि त्या एकमेकांवर रेललेल्या हजारो निराधार माणसांचा त्या जुलूसमध्ये एकेक जुडगा बांधून ते तीन लीडर आवेशाने कर्कश घोषणा देत पुढे पुढे जात होते.

रस्त्यावर दुमजली घरांच्या खिडक्यांतून, गच्च्यांतून, बालकनीमधून बाया–माणसं तो जुलूस पहात होते. कोलाहल माजवीत पुढं सरकणारा हजारो मानवी डोक्यांचा तो प्रवाह फार गमतीदार दिसत होता.

विष घेतल्यावर माणूस जसा हळूहळू काळानिळा पडतो तशी ती माणसं आता हळूहळू त्वेषानं पेटू लागली होती. त्यापैकी प्रत्येकाला वाटू लागलं होतं की त्याच्यावर भयंकर अन्याय होत आहे. खरोखरच त्याला खायला अन्न, ल्यायला कपडा व राह्यला घर नाही आहे. कुणीतरी त्याची भयंकर फसवणूक करीत आहे. तो उपाशी असताना कुणीतरी पक्वान्नावर हात मारीत आहे, त्याच्या डोक्यावर आकाश फाटले असतानासुद्धा कुणीतरी अनेकमजली वातानुकूल इमारतींमध्ये ऐषआरामात लोळत आहे, त्याला त्याचं शरीर केवळ लज्जेस्तव झाकतानासुद्धा मारामार होत असता, कुणीतरी आपल्या शरीरावर एकाहून एक उंची कपडे लपेटून घेत आहे. त्याच्या अगदी प्राथमिक हक्कांचीसुद्धा पायमल्ली होत आहे. आणि त्यानं जर वेळीच उठाव केला नाही, तर यापुढे कुणीतरी त्याला लाथेखाली तुडवील, त्याच्या शरीरावर पचापच थुंकील असे प्रत्येकाला वाटत होते. त्या हजारो घोषणा. प्रतिघोषणांचे स्वर प्रत्येक जणाची छाती फुलवीत होते. प्रत्येकाला त्याच्या अंगात हजार हत्तींचे बळ दाटल्यासारखे भासत होते. जणू काही प्रत्येक जण त्या हजारो माणसांबरोबर व त्या तीन लीडरबरोबर काहीतरी विध्वंस करायला, काहीतरी जमीनदोस्त करायलाच पुढे पुढे जात होता.

त्या जुलूसच्या पाठीमागून दोन निळ्या व्हॅन्स घरघरत पुढं सरकत होत्या. त्या व्हॅन्समध्ये खाकी कपडे घातलेले, कातडी पट्टे आवळलेले, हातात लाठ्या घेतलेले, डोक्यावर लोखंडी शिरस्त्राण घातलेले पोलीस दाटीवाटीने बसले होते. लोखंडी शिरस्त्राणामुळे कुणाचेच चेहेरे दिसत नव्हते. पण त्या सगळ्या पोलीसांचे चेहेरे अगदी सारखे असावे असे भासत होते.

आता त्या घोषणा–प्रतिघोषणा अधिक तीव्र, जलद व कर्कश होत होत्या. जुलूसाचा वेग वाढत होता. त्या कर्कश घोषणा देत असताना त्या हडकुळ्या लीडरच्या मानेवरचे, हनुवटीखालचे वटवटीत हाड चक्कीच्या पट्ट्यासारखे खसाखस वरखाली होत होते. घोषणा देताना तो फुगलेला लीडर मधूनमधून रस्त्यावर लालभडक पिंका टाकत होता. आणि त्यामागून येणाऱ्या हजारो माणसांच्या पायांना तो लालभडक रंग लागत होता व ती माणसं किती तरी वर्षे चालत राहिल्यामुळेच त्यांचे पाय रक्ताळले असावेत असा त्यांचे लाल पाय पाहून भास होत होता. तिसऱ्या मद्दड चेहेऱ्याच्या लीडरच्या डोळ्यातील लांडग्याचा भाव अधिकाधिक आसुरी होत होता.

एका चौरस्त्यावर येऊन तो जुलूस थबकला. लोखंडी शिरस्त्राण घातलेले, लाठ्या घेतलेले खाकी पोलीस जुलुसाची वाट अडवून उभे होते. त्यांच्या उंच, धिप्पाड, भुरकट भुवयांच्या ऑफीसरशी ते तिघं लीडर बाचाबाची करू लागले. जुलूस पुढे जाऊ देण्यास त्याने सम्मती दिली नाही. त्या तिघा लीडरनी पुन्हा ललकारी दिली. घोषणा–प्रतिघोषणा निनादून उठल्या. त्या निनादाने सगळे आसमंत एकदा थरारल्यासारखे झाले. मग त्या तिन्ही लीडरनी त्या ऑफीसरकडे एकदा आढ्यताखोर तिरस्काराने पाह्यले. त्या घोषणांच्या निनादणाऱ्या ध्वनीत ते तिघं पुन्हा त्या ऑफीसरशी बाचाबाची करू लागले. तो ऑफीसर थोडासा अस्वस्थ होऊन आपल्या भुरकट भुवया आकुंचित करून पण निश्चल उभा राह्यला.

तितक्यात एक दगड भिरभिरत आला नि त्या ऑफीसरच्या उजव्या भुरकट भुवईवर आघात करून खाली पडला. पहाता पहाता त्याची भुरकट भुवई ओलसर लाल झाली व तिथून दाट लाल ओघळ वहात गालावर आला. तो लालभडक रंग त्याच्या डोळ्यातही

चढला. उजवा हात भुवईवर झाकून त्याने डाव्या हाताने इशारा केला.

इशारा होताच हिंस्र जनावरासारखे पोलीस त्या जुलुसावर तुटून पडले आणि हातातल्या लाठ्यांनी त्याला वाटेल तसे झोडपून काढू लागले. आपटताच खळ्ळकन् फुटून इतस्ततः पसरणाऱ्या काचेच्या भांड्या-सारखा तो जुलूस इतस्ततः सैरावैरा पसरला. ते तीन लीडर्स पुन्हा ललकाऱ्या देऊ लागले. आणि सैरावैरा पळणारी माणसं चेटुक केल्यासारखी पुन्हा एकत्र आली. सुडाच्या, त्वेषाच्या भावनेनी मडकली आणि हातात जे सापडेल ते घेऊन पोलीसांवर आंधळेपणी तुटून पडली. पोलीस आणि लोकांमध्ये तुंबळ युद्ध झाले, जणू काही ते एकमेकांचे जन्मोजन्मीचे वैरीच होते, त्यांच्या मनात एकमेकांचा सूड घेण्याची भावना वर्षानुवर्षे धगधगत होती व आज त्या दोघांमधला कुणीतरी एक नामशेष होणार होता घाणेरड्या शिव्या किंचा-ळल्या गेल्या. दात करकरले, हात पिळवटल्या गेले, उखडल्या गेले, डोकी फुटली, गुप्त भागावर प्रहार झाले, प्रत्येक जण दुसऱ्याच्या चिंधड्या करण्याच्या मार्गाला लागला. प्रत्येकाच्या डोळ्यात सुडाची भावना खदखदत होती. एकच हलकल्लोळ सुरू होता. लोकांचा धीर खचू लागला, ते पळू लागले की ते तिघंही लीडर ललकाऱ्या द्यायचे, त्या लोकांना पुन्हा गोळा करायचे. मग माणसं पुन्हा ताठरायची, सापासारखी फुसफुसा-यची व पोलीसांवर तुटून पडायची. गिट्टी, फळ्या, बांबू, पत्रे जे काय हाती सापडेल ते घेऊन पोलीसांवर चढाई करायची. चौरस्त्यावरच्या बाल्कनीमधून, गच्च्यांतून, खिडक्यातून त्या पिसाट कल्लोळाकडे माणसं मयचकित दृष्टीने पाहू लागली.

हळूहळू पोलीसांचा जोर कमी होऊ लागला. त्यामुळं लोक आणखी शेफारले, चवताळले. ते आणखी त्वेषाने चेकाळून उरलेल्या पोलीसांवर तुटून पडले. पण तेवढ्यात आणखी दोन निळ्या व्हॅन्स येऊन थडकल्या. वाह्या सरसावून जमाव त्या व्हॅन्सकडे सरसावला. त्या तिघाही लीडरनी उत्साहाने जोराने ललकारी दिली. भुवईजवळ जखम झालेला धिप्पाड ऑफिसर धावत जाऊन त्या व्हॅन्सजवळ उभा झाला. व्हॅन्समधून लोखंडी शिरस्त्राण घातलेले, बंदुका घेतलेले पोलीस भराभर उड्या टाकून बाहेर आले. त्या ऑफिसरने कर्कश शिटी फुंकली व वॉर्निंग दिल्यासारखे हात उंचावून तो काहीतरी बोलू लागला पण तो पिसाट जमाव त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून, हातात येईल ते पोलीसांवर भिरकावू लागला त्या तिघा पुढाऱ्यांनी केलेली घोषणा पुन्हा निनादली आणि भयंकर सुडाच्या भावनेने तो जमाव पोलीसांकडे सरकू लागला. त्या ऑफीसरने उजव्या हाताने भुवईवरची ओली जखम चाचपीत डाव्या हाताने पोलीसांना इशारा केला. त्याच क्षणी ते तिन्ही लीडर कुणाला नकळत झट्कन कुठंतरी नाहीसे झाले. इशारा होताच पोलीसां-नी बंदुका खांद्याला लावल्या व ठो ठो आवाज होऊ लागला. त्या प्रत्येक आवाजाबरोबर जमावामधला एक एक जण गोळी लागलेल्या जागेवर हात दाबून मुर-गळून टाकल्यासारखा खाली कोसळू लागला. ते पाहून लोक जीवाच्या आकान्तानं इतस्ततः पळू लागले. फांकू लागले, पहाता पहाता चौरस्ता रिकामा होऊ लागला. गच्चीवरून ओणवून पहाणारा एक मुलगा रस्त्यावर धबकन् खाली पडला. खिडकीतून पहाणारी एक बाई कळवळून आपल्या छातीच्या एका बाजूला घट्ट हात दाबून तिथंच आडवी झाली ते पाहून गच्च्या रिकाम्या झाल्या. इमारतींची खिडक्या–दारं बंद झाली. सगळं अगदी रिकामं स्तब्ध झाल. फक्त अधूनमधून ठो ठो आवाज त्या रिकाम्या स्तब्ध वातावरणाला भगदाडं पाडीत होता....

मग काही वेळान चित्कारत दोन अम्ब्यूलन्स तिथं येऊन पोचल्या. चौरस्त्यावर पडलेली कळवळ-णारी, वळवळणारी, लाल ओल्या जखमांनी डागळलेली शरीरं त्यामध्ये चढवण्यात आली आणि त्या गाड्या चित्कारीतच तिथून निघून गेल्या. आता त्या रिकाम्या चौरस्त्यावर इतस्ततः काही रक्ताचे ओले डाग, वहाणा, घड्याळं. चष्मे, लाठ्या व लोखंडी शिरस्त्राणं पसरली होती व पोलीस जाताच त्या वस्तू हस्तगत करण्यासाठी काही लालचावलेल्या नजराही त्यावर टपल्या होत्या...

हॉस्पिटलमध्ये लांबलचक डॉर्मीटरीमध्ये ओळीने ठेवलेल्या बेड्सवर माणसं विसावली होती. एकमेकां-

(पुढील मजकूर पान २५०)

वणवा

प्रभाकर धोटे

त्याला जांभई आली. खूप मोठी. मोठा आवाज करीत त्यानं जबडा मिटला. मग त्याच्या लक्षात चूक आली. तिला ते अजिबात आवडत नसे. पण तो तरी काय करणार. त्याला भयंकर कंटाळा आला होता.

त्याला त्या स्थितीत बसून अर्धा तास झाला. त्याचे पाय अवघडले. अंगाची मोकळी हालचाल देखील करता येत नव्हती. आजूबाजूला गर्दी होती, पण नावाला. उबगवाणी लांबट, फिक्कट, चेहऱ्याची निर्विकार थंड गर्दी. मोकळेपणा यावा म्हणून त्यानं खूब लांब श्वास घेतला, डोके उठवणारा कडवट दर्प पोटात गेला. आणि पोटात ढवळून आल्यासारखं झालं. श्वासाबरोबर कदाचित अनेक रोगांचे जंतू. त्यानं घाई-घाईनं श्वास सोडला.

समोरच्या भिंतीवर गुटगुटीत बाळाचा प्रसन्न फोटो होता. त्याच्याकडे बघता बघता त्याला वाटून गेलं...असलं बाळ...

डॉक्टर अजून आले नव्हते.

कंटाळा घालवायला म्हणून तो आजूबाजूला न्याहाळू लागला. पांढऱ्या रंगहीन, चुन्याच्या भिंती थंड, निर्जीव, निर्लेप, मख्ख कंपाउंडर. बाटल्यासारखेच पेशंट हाताळायचा. फटाफट उघडबंद होणारं झुलतं दार. आतून दिसणारं बेड—वॉशबेसिन, रक्ताळलेलं बॅंडेज, उकळणारं पाणी, स्टरलाईज्ड नीडल्स्, कैच्या, हत्यारं सारी जिवंत राहायची धडपड—

बाहेर हॉर्न वाजला. त्यानं बाहेर पाहिलं. डॉक्टर आले असतील म्हणून.

डॉक्टर आले नव्हते. मोठ्या काळ्या ब्यूक-मधून ॲडव्होकेट लिमसे येत होते. उंच, भरदार बांधा, करारी उग्र मुद्रा, काळा कोट, मोजकी पावलं आणि बुटांचा कुरकुरीत आवाज. एक दमदार दर्जेदार व्यक्तिमत्व. सारे आपोआप दबल्यासारखे झाले थंडपणे वावरणारा कंपाउंडर देखील मोटरपर्यंत धावत जाऊन आला.

डॉक्टर न आल्यानं त्याला सुटल्यासारखं वाटलं. डॉक्टर आल्यावर त्यांना द्याव्या लागणाऱ्या उत्तरानं त्याला दबल्यासारखं झालं. काय उत्तर द्यायचं त्यांना? त्यानं बायकोकडे पाहिलं. सुकल्या फुलासारखी निस्तेज झाली होती. लग्नाआधी कशी रसरशीत दिसायची.

त्याला आश्चर्य वाटलं अर्धातास तो स्वत:च्याच तंद्रीत होता. तिच्याशी एक शब्द न बोलता. पूर्वी न बोलतां अर्धा तास देखील घालवू शकत नव्हता. त्याला एकदम चुकल्यासारखं अपराधी वाटायला लागलं. काहीतरी बोलावं म्हणून तो म्हणाला—

उद्या कळसकरांकडे लग्न आहे. काहीतरी प्रेझेंट द्यावं लागेल. त्यांनी आपणाला दिलं होतं ना – पण मंथ एंड आहे—

त्याला त्याच्या खत्रुडपणाची जाणीव झाली. बड-महिनादेखील रेटता येत नाही. सदा हळहळ कुरकुर आयुष्य असावं तर लिमशांसारखं. जिथं हात टाकतील तिथं पैसा. जो व्यवसाय करतील त्यात नफा. नुसत्या दोन हातांवर, अकलेच्या जोरावर त्यांनी हे सारं ऐश्वर्य मिळविलं आणि इथे साधी प्रमोशन एक्झा-मिनेशन देखील देता येत नाही...

त्याला स्वत:चीच चीड आली.

" हिची बिचारीची ही अवस्था केवळ माझ्यामुळं झाली. डॉक्टरांनी किती बजावलं— 'मुलं व्हायला नको काळजी घ्या--क्षयाची भावना असावी.' पण तरीही दिवस गेले. आता हे सारं निस्तरायचं कसं. कुठून पैसे आणायचे. हे सारे भोग तिच्या नशीबाला येतील. मी बराच आहे मोकळा. हिला त्या लिमशांसारखा नवरा मिळायला हवा होता. डोळ्यातल्या बाहुल्यासारखी जपली असती. शरीराच्या चिंध्या होणं टळलं असतं. फ्लॅटमध्ये राहती. कारमध्ये हिंडती-- खोटं खोटं गोड बोलती." ॲडव्होकेट लिमसे. स्टिअरिंगवर हात ठेऊन स्वस्थ बसले होते. अधून-मधून छाती चोळीत होते.

त्याला बरं वाटलं. शारीरिक आधीव्याधींचा साऱ्यांनाच सारखा त्रास होतो तर. तिथे भेदभाव नाही.

त्या कल्पनेमुळं मोठा शोध लावल्याचं समाधान त्याला मिळालं. पण क्षणभरच. लिमशांचे कर्तृत्व शारीरिक दु:खापेक्षा मोठं होतं. त्यांनी स्वत:चं नशीब बदलवलं होतं. केवढी जिद्द. जगात तर असं. बापाच्या पैशावर काय कुणीही वैभव उपभोगू शकतं. त्याला राहावलं नाही. तो शेजारच्या म्हाताऱ्याला म्हणाला: "एवढा धीराचा माणूस असून देखील दु:खानं बेजार झालाय विचारा—"

त्यानं लिमशांच्या गाडीकडे बोट दाखवीत विचारलं

'कसला धीराचा. पाप भोगतोय—'

'पाप—हं. हं., धंदा आहे वकिलीचा त्याला ते काय करणार—'

'ते पाप नाही बायकोचा शाप भोगतोय'

'बायको, बायकोला तर फुलासारखं जपतात. मी पाहतो ना त्यांना सकाळ संध्याकाळ—'

'ती ठेवलेली आहे. लग्नाची वेडी झाली.'

'कशामुळे'--

'त्याच्याचमुळे;--त्याला त्या अवदसेचा पैसा हवा होता. तिला ती नको होती. वकिली डाव टाकला अन् उठवलं आयुष्यातून तिला—तरी पहिल्या बायकोशी प्रेमविवाह झाला होता. पैशापुढं सारं खोटं बाबा.'

त्याचं लक्ष तिच्याकडं गेलं. त्यांनी पैशासाठी तिचं सुख नासवलं आणि आपण शरीराच्या क्षणाच्या तगमगीसाठी......

त्याच्या बायकोनं क्षीण आवाजांत विचारलं— डॉक्टर अजून आले नाहीत —

त्यानं तिच्याकडं पाहिलं. त्या निस्तेज डोळ्यांना पुन्हा पाहिलं. आजपर्यंत कधी वाटली नव्हती इतकी त्याला ती हवीशी वाटली. त्या दोन डोळ्यांनी त्याचं सुख दिसावं म्हणूनच धडपड केली होती. आणि त्यानं नको असतांना तिच्या ओटीत मूल टाकलं. त्याला साऱ्यांना, त्याच्याकडे घृणेनं बघणाऱ्या साऱ्यांना ओरडून सांगावसं वाटलं—'तो एवढा दुष्ट नाही. घडलं ते नकळत ...अगदी न कळत – त्याच्या विफल मनाला बेहोशी हवी होती म्हणून. कारकुनास बेहोशीसाठी दारू परवडत नाही. फार तर 'स्ट्रॉंग' चहा घेता येतो. पण त्याचं दु:ख त्यापेक्षाही मोठं होतं भयानक होतं... '

त्याची म्हातारी आई वारली होती, म्हातारी माणसं मरतात. त्यांत असं हळहळण्यासारखं काहीच नाही. पण ती गेली. जातांना त्याला अश्वत्थाम्यासारखं चिरंजीव दु:ख देऊन. त्यानं तिच्या मनाविरुद्ध लग्न केलं....आज विसरेल उद्या विसरेल म्हणून वाट पाहिली. म्हातारी जिद्दीची होती. शेवटपर्यंत तिनं त्याला क्षमा केली नाही. मेल्याचंही आठ दिवसांनी कळलं. कळवू नका म्हणून तिनंच सांगितलं होतं म्हणे. पोरगा असूनही ती निपुत्रिकासारखी गेली.

ते उरी फुटणारं दु:ख भयंकर पेटत होतं. त्यानं तो होरपळला त्याच्या मनावर त्यानं कायम डाग दिला होता. रडावसं वाटूनही त्याला रडायला येत नव्हतं. आतल्याआत घुमसत राहिला. कुठल्यातरी थंडगार समुद्रांत बुडावसं त्याला वाटलं

आणि ते समाधान त्याला तिच्या कुशीत मिळालं.

एवढंच त्याला आता आठवलं होतं.

बाहेर पुन्हा हॉर्न वाजला. बहुधा डॉक्टर आले असावे. त्याच्या हृदयाचे ठोके वाढले. हे सारं

डॉक्टरांना सांगणं कठीण होतं. आणि त्यांनी विश्वास ठेवला असता की नाही कोण जाणे. कदाचित ते म्हणाले असते,

" तुम्हालाच मूल हवं होतं— "

" हूं—मुलं हवीत कुणाला—? ज्यांना पोसता येतील त्यांना. ॲडव्होकेट लिमशांना—जगातल्या आम श्रीमंतांना. आम्हाला तर धड बायको मेन्टेन करता येत नाही. मग मुलं कशी करता येतील? एकाची चड्डी दुसऱ्याला, दुसऱ्याची तिसऱ्याला करीत जिवंत राहण्यात काय अर्थ--ना आपल्याला सुख न दुसऱ्याला. आणि मुलं असूनही काय उपयोग? आई मेलीच की नाही निपुत्रिकासारखी--भयंकर लक्झुरियस शौक आहे मुलांचा--

डॉक्टरांनी सगळ्यांत आधी लिमसेसाहेबांची चौकशी सुरू केली. त्याला तेवढंच सुटल्यासारखं वाटलं—

'हं काय म्हणते तब्येत'—डॉ.नी विचारलं.

'छातीत 'पेन' आहे अजून—'

'बघू--'

'मी तेवढ्यासाठी आलो नाही डॉक्टर.'

'मग—'

'हसू नका. पण मला मूलं व्हायची अजिबात आशा नाही का?'

'सॉरी. मी मागेच सांगितलं.'

त्याला आज बरं वाटलं. " छान. म्हणजे आपण मूल होतं म्हणून काळजी करायची. आणि ह्यांना मूल होत नाही म्हणून. गंमत आहे. नाही होत तर नाही. मस्त लाईफ इन्जॉय करायचं. डॉक्टरांना सांगायचंच—ॲबॉरशन करून द्या म्हणून-- पण मागे हिची ॲबॉरशन्स झाली तेव्हा उगाच छातीत कळ आल्यासारखी झाली होती—आताही येईल का?'...

ॲडव्होकेट लिमशांच्या उत्तरामुळं तो तंद्रीतून जागा झाला.

'बरं डॉक्टर—वेडी माणसं बरी होऊ शकतात?

'आज काय झालंय तुम्हाला? कुणाबद्दल विचारता आहांत तुम्ही--'

'सरोज--माझी पहिली बायको—डॉक्टर जिवंत राहायचा कंटाळा आलाय. छातीतली कळ मोठी होऊन प्राण निघून जावासा वाटतो. भयंकर एकाकी वाटतं. सारखी सरोजची आठवण येते. पमी आता पूर्वीसारखं लक्ष देत नाही. अनुपकडे —तिच्या पहिल्या नवऱ्याच्या मुलाकडे-- तिचा ओढा आहे. साहजिकच आहे. माझ्याकडं लक्ष देण्यासारखं काय आहे.--मी म्हातारा झालोय आता--'

'शांत व्हा लिमसे. असे उत्तेजित होऊ नका—तुमचं हार्ट विक आहे—'

'बोलू द्या डॉक्टर. मला भयंकर एकाकी वाटतं. इतका अमाप पैसा असूनही अपराध्यासारखं वाटतं. सरोज बरी झाली झाली की तिच्याबरोबर शेवटचे दिवस घालवायची इच्छा आहे--' काय गंमत आहे पहा. माझ्याजवळ पैसा असून मला उपभोगता येत नाही. हजारो पथ्यं आहेत आणि ज्यांना एन्जॉय करणं शक्य आहे, त्यांच्याजवळ पैसा नाही. Oh—what a paradox--simply—पॅरॉडॉक्स—

'लिमसे आपण बोलू. या, तुमचं ब्लडप्रेशर बघू—"

त्याला लिमशांबद्दल भयंकर कीव आली. बिचारा. अगदी एकटा. आपल्याला कमीतकमी—आधार आहे--मुलं व्हायची आशा—त्याला वाटलं लिमश्यांना सांगावं--

पण तो कुणाच्या तरी भांडणामुळं सांगू शकला नाही. पायऱ्यांजवळ फाटक्या पातळातली बाई आणि मळक्या कपड्यांचा एक इसम भांडत होते. कुणी पाहत आहेत. कुणी काही म्हणेल याचं त्यांना भान नव्हतं.

फाटक्या पातळांतून झिरपणारं अंग गाठींनी झांकून ती म्हणत होती.

'मी दवाई नेत नाई—मरू दे त्याले--'

'कैदासिनी—तोहा पोटचा गोळा व्हय नं, असं बोलनं. लाज नाही वाटत—'

'लाज? कायची लाज? दैवात असल तं वाचन नाही तं मरन —"

'तिच्या नवऱ्याला भयंकर राग येत होता तो डॉक्टरांना म्हणाला—'

'डॉ. साहेब चिच्याची दवाई द्या—'

'नाही जी—'

'काऊन'—तो म्हणाला.

"पैसे कुठून देऊ. दात पाडून का बाकीचे पोट्टे इकून. एखादं मेलं त काही बिघडत नाही. बाकीचे तं जगतीन."

त्याचा भयंकर अपमान होत होता. तो मानभंग सहन होणं कठीण होतं. पण तो षंढासारखा उभा राहिला. त्याला काहीही करणं शक्य नव्हतं.

लिमशांना मनापासून वाटलं पुढं होऊन त्याला पैसे द्यावे, काही मदत करावी. पण ते तसेच अस्वस्थपणे बसून राहिले.

तो पण तिच्याकडे अस्वस्थपणे पाहत राहिला. त्याला वाटलं. सारं जग अस्वस्थपणानं भरलं आहे. बाटल्यात असलेल्या लाल-निळ्या रंगीत औषधां-सारखं. आणि आपल्याला ते प्यायल्याशिवाय इलाज नाही

डॉक्टरांनी त्याला तीनदा हाका मारल्या तरी तो तसाच बसून राहिला. शेवटी त्याची बायको बोलायला लागली, तेव्हा तो तंद्रीतून जागा झाला.

(पान २४६ वर)

वर तुटून पडलेले पोलीस व माणसें शेजारी शेजारीच केविलवाणी होऊन आपापल्या जखमांनी कळवळत होती. त्यांच्यामधील सुडाची भावना विझली होती. आता प्रत्येकजण आपल्या अस्तित्वात परतला होता. मघाचच्या उफाळणाऱ्या त्वेषाचे फक्त ओले लालसर दुखावरे अवशेष प्रत्येकजण आपल्या अंगावर वाळगीत होता. हजारो वर्षांची शिळी केवीलवाणी मानवी विफलता प्रत्येकाच्या डोळ्यात तरळत होती. प्रत्येकजण गलितगात्र होऊन, शून्य होऊन बेडवर पहुडला होता. प्रत्येकाच्या शेजारी त्याची माणसं—बायको, मुलं, मुली, आई, वडील—गोळा झाली होती आणि एवढ्या मोठ्या डॉर्मीटरीत विषण्णता अगदी दाटून आल्या-सारखी भासत होती.

तितक्यात ते तिघं लीडर डॉर्मीटरीत आले. आता त्या हडकुळ्या लीडरच्या हनुवटीखालचं खसाखस वर-खाली होणारं मानेचं बटवटीत हाड स्थिर झालं होतं. त्या लठ्ठ लीडरचं तांबडं पेटतं हास्य विझत आलं होतं. त्या दुसऱ्या लीडरच्या डोळ्यांतील लांडग्याची लालसा तृप्त झाल्यासारखी भासत होती. त्या तिन्ही लीडरनी त्या बेड्स्वर वळवळणाऱ्या जीवांची आपुलकीनं चौकशी केली. त्यांच्या दुखऱ्या भागांना हळुवार स्पर्श केला आणि ती सगळी माणसं, त्या तिन्ही लीडरनी दाखवलेल्या आपुलकीनं, अगदी भारावून गेली, कृतज्ञतेनी गच्च झाली आणि ओलावलेल्या डोळ्यांनी त्या तिन्ही लीडरकडे आदरानं पाहू लागली.

संधी साधून त्या हडकुळ्या लीडरने कर्कश आवाजात पुन्हा एक घोषणा केली व त्या बेड्स्वर विसावलेल्या लोकांनी क्षीणपणे का होईना पण इमान-दारीने त्या घोषणेला साद दिली.

त्यामुळे डॉर्मीटरीत साकळलेली विषण्णता थरा-रली व ती केविलवाणी मानवी मूर्खता पाहून उप-हासाने आणखी गडद झाली.

आणि सोळा वर्षांनंतर....

—सुधाकर धारव

अनंतराव अमरावतीहून परतल्यानंतर विचार-मग्न अवस्थेत आपल्या अभ्यासिकेत फेऱ्या घालत होते. मध्येच ते आरामखुर्चीत पहुडत आणि मध्येच उठून पुनः येरझारा सुरू करीत. एक उमदा माणूस म्हणून गावकऱ्यांची त्यांच्यावर निष्ठा होती. नेहमी प्रसन्न मुद्रा, सहिष्णुतावधी आणि निर्भीड बाणा यांमुळे गावकरी त्यांना अडीअडचणीच्या प्रसंगी सल्ला विचारीत. गावच्या पाटिलकीचा मान वतनदारीने त्यांना मिळाला नसला तरी स्वकर्तृत्वाने त्यांनी तो प्राप्त केला होता. सत्प्रवृत्ततेचा आणि सुसंस्कृतपणाचा आदर्श म्हणजे अनंतराव. पण प्रसन्न मुद्रेचा हा उमदा माणूस आज अगदीच खिन्न अन् चिंतामग्न असल्याचं पाहून त्यांच्या प्रेमळ पत्नीनं त्यांना हळुवारपणे विचारलं—

'बरं नाही का तुम्हाला?'

'हं' एवढाच एक हुंकार देऊन त्यांनी फेऱ्या घालण्याचा वेग वाढविला. पतीची ती बेचैनावस्था पाहून लक्ष्मीबाईही उदासीन झाल्या. त्या जागीच ताटकळत उभ्या राहिल्या. थोड्याच वेळात मान उंचावून अनंतराव पुटपुटले,

'मला तुझ्याशी काही बोलायचं आहे, बैस जरा.'

'काही विशेष आहे का?'

डोक्यावर पदर नीट बसवीत लक्ष्मीबाई बसल्या, पण अनंतराव विचारतंद्रीतच होते. सोळा वर्षांपूर्वीची घटना. कसं काय सांगावं हिला? अनंतरावांचं डोकं गरगरू लागलं. इतक्यात पोस्टमननं हाक दिली, 'पत्र...!'

या खेडेगावात आठवड्यातून केवळ दोन दिवस पोस्टमन यायचा. त्यामुळं स्वाभाविकच गावातील लोकांना त्या दोन दिवसांबद्दल विशेष महत्त्व वाटायचं. आपापल्या नातेवाईकांच्या पत्राबद्दल गावकरी त्या दिवशी आतुरतेनं पोस्टमनची वाट बघायचे. सुख-दुःखाच्या कल्पना त्यांना स्पर्शून जायच्या. गावात पोस्टमनचं आगमन म्हणजे जणू देवदूताची भेट असं गावकरी मानत. अनपेक्षित आलेलं पत्र पाहून अनंत-रावांनाही आश्चर्य वाटलं आणि त्यांच्या चर्येवर नकळत विषादाची एक रेषाही तरळली. कारण कॉलेजमधे शिकणाऱ्या शरदचं पत्र इतक्या लवकर यायचं काहीच कारण नव्हतं. नुकतेच ते वसतिगृहात त्याची भेट घेऊन परतले होते. लक्ष्मीबाईंनी पोष्टमन-जवळील पत्र घेऊन आश्चर्य व्यक्त करीत म्हटलं,...

'कुणाचं पत्र?' ते आलटून पालटून पाहात... दिग्रसहून आलेलं...

स्वाभाविक होतं ते. ज्या गावात आपलं कोणी नाही, ज्या गावचं आपण तोंडही पाहिलेलं नाही तिथून पत्र आलं कसं? आणि हस्ताक्षरही अनोळखी. कुतूहल आणि आश्चर्य!

शरदला अमरावतीच्या कॉलेजात प्रवेश मिळून जवळ जवळ महिना लोटला होता. आता त्याला वसतिगृहातही प्रवेश मिळाला होता. सुखवस्तू आई-बापाचा तो एकुलता एक मुलगा होता त्यामुळे साह-जिकच वडील मधून मधून अमरावतीला येत आणि शरदची भेट घेऊन जात. वसतिगृहातील वरच्या मजल्यावरच्या १४ नंबरच्या खोलीत शरद राहायला

आला तेव्हा तो एकटाच होता. काही दिवसात त्याला एक पार्टनरही मिळाला. सुरेश त्याचं नाव. कर्मधर्मसंयोगाने दोघेही एकाच वर्गात दाखल झाले होते. त्यामुळे त्यांचं वर्गबंधू म्हणून नातं निगडीत होत होतं. जेवायला जाताना ते एकमेकांची वाट पाहात. सिनेमाला जाताना एकमेकांसाठी थांबत. अभ्यासातील हुशारीमुळे आणि खेळातील नैपुण्यामुळं शरद आणि सुरेश हा हा म्हणता विद्यालयीन जीवनात समरस झाले. बरेचदा त्यांच्या वागण्यात, त्यांच्या खाण्यापिण्याच्या आवडीत आणि सवयीत साम्य आढळून येई. अध्यापकांना काय किंवा विद्यार्थ्यांना काय ते दोघे जणू सख्खे बंधूच वाटायचे, इतकं विलक्षण साम्य त्या उभयतात दिसून येत होतं.

दुपारी दुसरा तास झाल्यानंतर, शरदला कॉलेजच्या रजिस्ट्रारनं बोलावून घेतलं आणि म्हटलं—

"तुम्ही ब्रदर कन्सेशनसाठी अर्ज का करीत नाही दामले?"

"मला दुसरा कोणी भाऊ नाही सर."

"मग सुरेश दामले...तुमचा कोण आहे?"

"कोणी नाही सर, तो यवतमाळ जिल्ह्यातून आला आहे."

"बरं...बरं, ठीक आहे. नावावरून साम्य वाटलं म्हणून विचारलं. ठीक आहे जा." शरद तिसऱ्या तासाला वर्गात गेला. पण त्याचं मन विषयाकडे लागेना. त्याला कुठंतरी काहीतरी खटकत होतं— आपल्यात आणि सुरेशमधे असलेल्या साम्यामुळे अनेक लोक आपल्याला भाऊ भाऊ समजतात, ही गोष्ट खरंच स्वाभिमानाची होती. पण कॉलेजच्या रजिस्ट्रारने बोलावून आपल्याला तसे विचारण्याचे काही प्रयोजन? ...कदाचित ऑफिसच्या कागदपत्रावरून त्यांना काही वाटलं असेल—शरद अनंत दामले आणि सुरेश अनंत दामले. इतर गोष्टींशी त्यांना काय कर्तव्य? एवढ्या मोठ्या कॉलेजातील प्रत्येक मुलाबद्दलच्या खाजगी जीवनाशी थोडाच काही त्यांचा संबंध येतो? सुरेशलाही ठाऊक होते की, शरद कोण्या श्रीमंत माणसाचा एकुलता एक मुलगा आहे म्हणून. तेव्हाच त्याच्यासाठी गावावरून वरचेवर निरोप येत. उंची सामान येई. कोणी गावकरी आला तरी शरदला भेटून जाई.

संध्याकाळी टेबलटेनिसच्या दालनामधून शरद आणि सुरेश निघून आपल्या खोलीत येताच त्यांना आपले वडील आपली वाट पहात असल्याचे दिसले. ते अचानक आलेले पहाताच त्यांना आनंद झाला. त्यांनी वडिलांना प्रणाम केला. शरदनेही आणि सुरेशनेही. अनंतरावांनी दोघांनाही आशीर्वाद दिला. आणि आपल्याला महत्त्वाचे काम असल्यामुळे तावडतोब जाणे आवश्यक आहे एवढे सांगून ते त्वरित निघून गेले. एका विचारात, एका तंद्रीत. अनंतराव स्टेशनवर आले. त्यांचे त्यांना काहीच कळेना. शरद आणि सुरेश एकाच कॉलेजात, एकाच वर्गात, एकाच खोलीत, असल्याचे पाहून ते स्तंभित झाले. योगायोग, पण कसा विचित्र योगायोग! कधी ना कधी ते एकत्र ..परंतु कुणास ठाऊक काळाच्या ओघात काय घडेल काय नाही? त्या दोघांचाही मी बाप आहे हे कळलं तर...तर त्यांना काय वाटेल? शरदच्या आईपासून आपण इतके दिवस लपवून ठेवलेली गोष्ट तिला इतक्या दिवसांनंतर कळली तर तिचा आपल्यावरील विश्वास उडेल अन् मग......इत्यादी अनेक प्रश्नांनी आणि शंकाकुशंकांनी अनंतराव भलतेच खिन्न झाले. त्या रात्रीच ते गावाकडे परतले. आणि आज सकाळ झाली तरी ते त्याच विमनस्क स्थितीत इकडून तिकडे फेऱ्या घालीत होते, मध्येच कपाळावर हात ठेवून आरामखुर्चीत बसत, तर मध्येच उठून येरझारा घालू लागत.

मनाचा निर्धार करून अनंतरावांनी शवटी ते सर्व आपल्या धर्मपत्नीला सांगण्यासाठीच तिला बसायला सांगितलं. पण पोष्टमनने पत्र दिल्यानंतर वाचता वाचताच लक्ष्मीबाई कुठे गेल्या हे अनंतरावांना कळलं नाही. पत्र मात्र टेबलावरच उघडं पडलं होतं. तिकडे लक्ष न देता अनंतराव लक्ष्मीबाईंना शोधण्यासाठी तडक घरात गेले. अंगणात पाहिलं पण त्या कुठेच नव्हत्या. इतक्यात गड्यानं निरोप आणला, 'बाई दमनीत बसून स्टेशनावर गेल्यात.'

अनंतराव परत फिरले. आ वासून टेबलावरील पत्र वाचण्यास त्यांनी सुरवात केली. दिग्रसहूनच आलेलं ते पत्र होतं. सुमती. १९४२ साली झालेल्या दंगलीत त्यांनी सुमतीला आश्रय दिला होता. तिची सर्व प्रकारची जबाबदारी त्यांनीच पत्करली होती. आता ती दिग्रसच्या दवाखान्यात परिचारिका म्हणून काम करीत होती. ती अविवाहित होती पण अनंतरावांना तिनं सर्वस्व अर्पण केलं होतं. आणि सुरेश हे त्यांच्या प्रेमातून फुललेलं फूल आता उमलत होतं.

अनंतराव रागरंग पाहून सुमतीकडे जात. पण आजपर्यंत या गोष्टीचा कोणालाही सुगावा नव्हता. ते एक गूढच होतं. सुमतीनं अनंतरावांना पाठविलेल्या पत्रात स्पष्टच होतं सुरेशला अमरावतीच्या कॉलेजमध्ये आणि वसतिगृहातही प्रवेश मिळाला आहे. त्याची दोन्ही-कडील फी भरण्यासाठी त्याला दोनशे रुपयांची गरज होती. तेव्हा परस्पर रक्कम पाठवून द्यावी. माझ्या-पेक्षा तोच आपणास जवळ आहे. वेळ मिळाल्यास मधून मधून त्याची भेट घ्यायला विसरू नका. आपलाच पुत्र आहे ना तो ?...

दुसरे दिवशी लक्ष्मीबाई सुमतीला घेऊन आली. सुमतीला पहाताच अनंतरावानं मान खाली घातली. पण तिनं धाव घेऊन त्यांच्या चरणावर आपला माथा टेकला.

लक्ष्मीबाईनं तिला आपल्या बाहूत घेऊन कुरवाळलं. अन् हसत मुखानं तिनं अनंतरावांकडे पाहिलं. मागोमाग आलेला शरद सुमतीकडे तर सुरेश लक्ष्मीबाईच्या कुशीत दडला.

अनंतरावांच्या नेत्रातून दोन शीतल अश्रुबिंदू ओघळले !

अनुक्रमणिका

कथानक

—सौ. सिन्धू मांडवकर

अतोनात दुःख झालं म्हणजे माणसाची झोप पार उडून जाते म्हणतात. आनंदाचंही तसंच असावं असं आज मला राहून राहून वाटतंय. आणि अनुभवानं ते पटलंही आहे.

कसला एवढा अननुभूत आनंद झाला आहे मला ? विचार करीत केव्हाची मी बिछान्यात ह्या कुशीवरून त्या कुशीवर करतेय्.

सारं कामधाम आटोपून झोपायला रात्रीचे साडेबारा वाजले आज ! वाटलं, शिणला भागला जीव बिछान्यावर अंग झोकताच अगदी चट् निद्राधीन होईल. पण छे ! स्मृतीची पाखरं गरगर गिरक्या घेऊ लागली, नी नीज ? कुठे पार पळाली नकळे !

आज माझ्या स्वतःच्या घराचा वास्तुसमारंभ मोठ्या थाटानं साजरा केला होता मी. सारी सारी ओळखीची मंडळी संध्याकाळी फराळाला बोलावली होती. आणि तोच पसारा आवरता आवरता रात्री साडेबारा वाजले. अगदी दमून गेले होते मी. घरातली इतरही मंडळी थकली होती. पण आवराआवर होताच सगळ्यांना कशा गाढ झोपा लागल्या होत्या.

अन् मी मात्र...मी विचारात गढले होते. का बरं मला झोप येत नाही ? कोणत्या आनंदात मी एवढी दंग झालेय् ?

हं ! आता आलं लक्षात ! खूप खूप दिवसांची माझी मनीषा आज पूर्ण झाली आहे. आज माझे गुरुजी--हो गुरुजीच ! सध्या नसले म्हणून काय झाले ? एकेकाळी मी त्यांना गुरू ह्या नात्यानेच पूज्य मानीत नव्हते का ?--प्रो. भगवंतराव काळे माझ्या घरी प्रथमच आले होते. बऱ्याच दिवसांपासून ज्या ज्या वेळी ते मला भेटत होते, त्या त्या वेळी मी त्यांना घरी येण्याविषयी विनवत होते, आग्रह करीत होते. आणि ते मात्र "येईन हो, लवकरच येईन, आता तुम्ही–आम्ही काय एकाच गावी आहोत, तेव्हा आल्याशिवाय राहणार नाही तुमच्या घरी." अशी आश्वासनं दर वेळी देत होते. आजचा मुहूर्त मला निश्चित लाभदायी असावा. कारण प्रो. काळे एकटेच आले नव्हते; तर सपत्नीक आणि चिरंजीवसुद्धा होते बरोबर.

आज सर सहकुटुंब माझ्या घरी आले आणि त्यांनी यावं अशी माझी फार दिवसांची इच्छा होती ती पूर्ण झाली. एवढंच कारण माझ्या आनंदाला नी झोप उडवायला पुरेसं नव्हतं.

मला माहीत होतं प्रो. भगवंतराव काळे हे मराठीतले एक फार थोर कथालेखक आहेत. माझी त्यांची पहिली ओळख होण्यापूर्वीच मी त्यांच्या कथा आवडीनं वाचत होते आणि अजूनही वाचते. पण इतर प्रोफेसरांपेक्षा ह्यांच्याबद्दल एवढी आपुलकी, इतकी जवळीक वाटण्याचं कारण काय ? होय ! फार मोठं कारण आहे त्यामागे ! आणि तेच माझी झोप पळवायला कारणीभूत झालंय्.

माझा नी सरांचा प्रथम परिचय झाला तो चौदा वर्षांपूर्वी नागपूरला, कॉलेजात ! तेव्हा सर मला ओळखत होते की नाही कोण जाणे ! कारण त्यांच्या हाताखालून किती तरी विद्यार्थिनी शिकून गेल्या

असणार ! ते कुणाकुणाची ओळख ठेवणार ? त्यातूनही त्यांच्या विषयात काही विशेष हुशारी दाखविणाऱ्या किंवा इतर काही कार्यक्रमात चमकणाऱ्या विद्यार्थिनी त्यांच्या लक्षात राहिल्याही असतील. पण माझ्यासारख्या सर्वसामान्य मुलीची ओळख ठेवायचं त्यांना काय कारण ? पण मी मात्र प्रथम त्यांना ते आम्हाला फर्स्ट इयरला शिकवायला आले तेव्हाच पाहिलं आणि आपणाला आवडणाऱ्या कथांचा लेखक पाहून मला मनोमन आदर वाटला त्यांच्याबद्दल ! तसंच आवडत्या लेखकाला रोज पहायला मिळणार म्हणून आनंदही झाला होता मला त्यावेळी. आणि म्हणून घरी त्यांच्या-बद्दल काही सांगताना मोठा अभिमान वाटू लागला होता. पण तरी आमची ओळख एकतर्फीच नव्हती हे मला मागाहून समजलं.

कॉलेजातील कसल्याच कार्यक्रमात मी भाग घेत नसल्यामुळे अभ्यासाव्यतिरिक्त काळेसरांशी बोलण्याचा प्रसंग माझ्यावर कधीच आला नाही. ओळख आमची झाली म्हणण्यापेक्षा फक्त त्या वेळेपासून मी सरांना ओळखू लागले एवढेच म्हणणे योग्य ठरेल.

त्यानंतर सरांचे थोडे खाजगी जीवन मला दिसून आले ते आमच्या काश्मीर ट्रीपच्या वेळी. १९५२ च्या उन्हाळ्यात इंटरची माझी परीक्षा आटोपल्यावर कॉलेजची ट्रीप निघाली म्हणून मीही माझ्या मैत्रिणीं-समवेत त्यात सामील झाले. प्रो. काळे व त्यांच्या पत्नी सौ. कमलताईही त्या ट्रीपमध्ये आमच्याबरोबर होत्या. कमलताई आम्हा मुलींमध्ये खूप मिळूनमिसळून वागत आणि त्यामुळेच सरांशीही थोडीफार चेष्टामस्करी करायला आम्हाला संकोच वाटत नव्हता. तेही अगदी सहजतेने आमच्यात मिसळत. सुमारे एक महिनाभर सहप्रवासी असल्यामुळे कॉलेजातील शिष्यागुरूचे नाते दूर सरून आम्ही जरा सहकाऱ्याच्या नात्यानं वागायला लागलो होतो.

पण झालं ! इंटरच्या परीक्षेनं आम्हाला सह-कार्याचा हात न दिल्यामुळं मी कॉलेज सोडलं नी गावी येऊन राहिले. आणि नित्याच्या दिनक्रमात कधी काळी सरांच्या कथा वाचण्याइतपतच सरांना ओळखू लागले. बाकी पार विसरले म्हटलं तर मुळीच वावगं ठरणार नाही.

—आणि नंतर सरांची भेट अगदी अचानक, अनपेक्षितपणे, सहा वर्षांनंतर मुंबईला एका ओपन थिएटरमध्ये एका नाटकाच्यावेळी झाली. "तुझं आहे तुजपाशी" ह्या नाटकाला मी घरच्या मंडळीबरोबर गेले होते. सहज समोर नजर गेली तर पहिल्या रांगेत प्रो. काळे मला दिसले. बडया बडया नाटककार आणि लेखकांच्या कंपूत ते बसले होते. त्यांचं लक्ष जाताच मी ओळखीचं स्मित केलं. कारण हात दाखवणं किंवा हाका मारणं कदाचित् असंस्कृपणाचं ठरलं असतं. पण सरांनी मला ताबडतोब प्रतिसाद दिला. त्यांनी हसून मला हात उंचावून दाखवला आणि ओळख असल्याचं सूचित केलं. मला थोडसं आश्चर्य आणि खूपसा अभिमान वाटला. कारण माझ्यासारख्या एका अगदी सामान्य मुलीची ओळख एक नामवंत लेखक ठेवू शकतो तर !

नाटक संपून रात्री घरी यायला निघालो. मित्र-मंडळींमधून सरांशी बोलायला निवांतपणा मिळणारच नाही व बससाठी क्यू लावणेही आवश्यक होते म्हणून आम्ही सरळ बस स्टॉपवर निघालो. बसच्या वरच्या मजल्यावर बरीच जागा होती म्हणून वर चढून जरा आरामशीर बसलो. बस सुटली आणि तेवढ्यात काळे सरांची स्वारीही त्याच बसमध्ये शिरली. खूप खूप आनंद झाला मला; चला, आता तरी सरांशी थोडसं बोलता येईल म्हणून.

माझ्या बाजूची जागा रिकामी असल्यामुळे सर माझ्याजवळच येऊन बसले. "हल्ली काय करतेस ? कुठे असतेस ?" वगैरे साधारण चौकशी त्यांनी केली. मीही त्यांना, "तुम्ही नाटकाला कसे आलात ? कमलताईंना का आणलं नाही ?" वगैरे प्रश्न विचारले.

ते म्हणाले, "मला पु. लं.नी आग्रहानं बोलावलं म्हणून मी आलो नी कमलबद्दल विचारता तर ती आता शिक्षिका म्हणून काम करते. तिला रजा नव्हती. आपल्या काश्मीर ट्रीपच्या वेळी ती एम् ए. पास झाल्याची आठवण असेलच तुम्हाला ?" नंतर किंचित खालच्या सुरात ते म्हणाले, "घरात काही करमणूक नाही म्हणून बाहेरचे बरेच व्याप सध्या तिनं वाढवले

बुंदीचे लाडू, चिवडा, पेढे, केळी नी वर लिंबाचं सरबत असा फराळाचा बेत पाहून सर हसत हसत म्हणाले, "अहो घरी स्वयपाक करून ठेवू नका असं का त्या आमंत्रणाच्या पत्रात लिहिलं नाही ? कमलचा थोडासा त्रास तरी वाचला असता नी आम्ही पण लवकर येऊ शकलो असतो."

मी आग्रहानं आणखी एक एक लाडू नी थोडा चिवडा त्यांच्या बशीत घातला.

श्री. पाटील यांची ओळख करून दिल्यावर दोघेही म्हणाले, "साहित्यिक म्हणून आम्ही एकमेकांना चांगलेच ओळखतो; पण प्रत्यक्ष भेट मात्र आजच प्रथम होतेय् !"

प्रो. काळेंयांना माझं लहानसं पण सर्व सोयींनी युक्त असं घर फारच आवडलं. तीन तीनदा त्यांनी तसं म्हणून दाखविलं. कमलताईही खूष झाल्या. त्यांनी आमच दोघांचं अभिनंदन केलं. आणि मग प्रदीप मात्र झोपेला आलेला पाहून त्यांनी घड्याळाकडे पाहिलं.

साडेनऊ व्हायला आले होते आणि काळे पति-पत्नी घरी जायला निघाले. आम्ही दोघंही शिष्टा-चाराप्रमाणे त्यांना 'थँक्स' देत मोटारीपर्यंत पोचवा-यला गेलो. सगळं बोलणं झालं तरी माझ्या मनात घोळंतच होतं की आता तरी सरांना माझ्यावर कथा लिहिण्यासारखं काही आढळलं असेल की नाही ?

ही मंडळी आमच्याकडे येण्यापूर्वीच माझा छोटू झोपला होता; नाही तर मी प्रो. काळेंना नक्की म्हटलं असतं, "सर, आता माझ्यात कथानक पाहायचा छंद तुम्ही सोडून द्या ह्या माझ्या बाळाच्या लीला पाहा नी हे घ्या तुम्हाला अनेक कथा लिहायला खाद्य !"

पण माझ्या मनातले विचार मनातच राहिले आणि मोटारीत चढता चढता काळे सर म्हणाले, "मिसेस पाटील, आज अगदी घरी गेल्याबरोबर कथेचा स्केच तयार करणार हं मी ! माझ्या कथेला अगदी पूर्ण चौदा वर्षांनंतर तुम्ही खाद्य मिळवून दिलं आहे. वाटेल त्या प्रसंगावर नी छोट्याशा सजीव निर्जीव वस्तूवर सहज कथा लिहिणारा मी; तुमच्या बाबतीत मात्र आजपर्यंत हरलो होतो."

मग 'ह्यां'ना त्यांनी आमच्या दर भेटीतल्या कथानक न मिळण्याबद्दल झालेल्या काही गोष्टी सांगि-तल्या. 'हे' नेहमीप्रमाणेच हसले आणि म्हणाले, "ही का तुमच्या कथेची नायिका होणार ? सांभाळा हं ! प्रथितयश लेखक असूनसुद्धा 'साभार परत'चा शिक्का लागेल तुमच्या कथेवर ह्या बाईसाहेबांच्या पायगुणानं ! हिच्या स्वतःच्या बहुतेक सगळ्याच कविता संपादकांच्या केराच्या टोपलीत सापडतात म्हणे !"

सरांनी माझा गोरामोरा झालेला चेहरा पाहिला नी ते चटकन् म्हणाले, "अहो पाटील, नायिका सुखदा-बाई होणार असल्या तरी कथेला साजशृंगार मी चढवणार आहे म्हटलं ! आणि माझ्यासारख्या इतक्या नावाजलेल्या लेखकाची कथा परत करायचं धाडस आहे म्हणता का कुणाच्यात ? छे ! कसलीही फडतूस कथा लिहिली तरी पाठवूनच द्या आमच्याकडे म्हणून तगादे लावताहेत सारे संपादक !" ह्यावर सगळ्यांनीच दिलखुलास हास्य केलं.

ते काही असो ! पण मी नावाजलेल्या लेख-काच्या एका कथेची नायिका होणार हा आनंदच मला छळतोय् सारखा. झोप येणंसुद्धा अशक्य करून सोडलंय् त्या विचारांनी.

कशी असेल सरांची कथा ? कशी रंगवतील ते मला? वास्तव की अवास्तव ? त्या कथेत माझ्या अगदी पहिल्या भेटीपासून लिहितील की फक्त आजचाच प्रसंग रंगवतील ? हेच सारे प्रश्न सारखे सतावताहेत मला ! अर्थात त्यामागे माझ्या मनातला सुप्त आनंदच आहे ना ? म्हणूनच म्हणावसं वाटतं की आनंदसुद्धा इतका अनिवार होऊ शकतो की जो माणसाची झोपही उडवून लावतो !

मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे

प्रा. म. बा. कुंडले

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशी भाषांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोण बदलला आहे. विशेषतः भाषावार प्रांतरचना झाल्यापासून प्रादेशिक भाषांचे महत्त्व अधिक वाढले आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यामुळे मराठी भाषेला शिक्षण, समाजव्यवहार, राज्यकारभार इत्यादी क्षेत्रात माध्यम म्हणून महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. साहजिकच शास्त्रीय व वाङ्मयीन दृष्टीने मराठीची गुणवत्ता व मराठीचे सामर्थ्य वृद्धिगत करण्याची जबाबदारीही आपल्यावर ओघानेच आली आहे. मराठी भाषेच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी राजकीय व सामाजिक धोरणाबरोबरच मराठी विषयाची अध्यापनपद्धती हीही कारणीभूत ठरणार आहे. म्हणून मराठीच्या विकासासाठी विविध प्रकारच्या योजना आखत असताना, किंवा कार्यप्रणाली ठरवत असतानाच मराठी विषयाच्या अध्यापनपद्धतीचाही विचार होणे आवश्यक आहे. मराठीच्या अध्यापनासंबंधी निरनिराळी मते प्रदर्शित केल्या जात आहेत; पण या विषयावर शिक्षणशास्त्रीय दृष्टिकोनातून फारच थोडा विचार होत आहे. जो काही थोडाफार होत आहे, तो प्रशिक्षण महाविद्यालयांच्या (Training Colleges) मर्यादित क्षेत्रात ! प्रशिक्षणाशी संबंध नसलेल्या परंतु अध्यापनाशी संबंधित असलेल्या लोकांना या दिशेने विचारप्रवण करणे हा या लेखाचा उद्देश आहे. या दृष्टीने मराठी भाषेच्या अध्यापनाची उद्दिष्टे काय असावी ? याचा विचार या लेखात केला आहे.

मराठीच्या अध्यापनाचा विचार करण्यापूर्वी शिक्षण किंवा अध्यापन म्हणजे काय हे पाहिले पाहिजे. आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञांच्या मते शिक्षण म्हणजे विकास, सर्वांगीण विकास ! अध्यापन हीही एक विकासात्मक प्रक्रिया होय. विद्यार्थ्यांच्या विविध मनःशक्तींचा व मनःप्रवृत्तींचा विकास घडवून आणणे हे शिक्षणाचे व म्हणूनच अध्यापनाचेही प्रमुख उद्दिष्ट ! केवळ माहिती देणे किंवा ज्ञानसंवर्धन करणे म्हणजे अध्यापन नव्हे. तर विद्यार्थ्यांच्या अनेकविध मानसिक शक्ती व प्रवृत्ती जागृत करणे, त्यांना चालना देणे व त्यांचा विकास घडवून आणून प्रत्येक विद्यार्थ्यामधून एक बुद्धिमान, कार्यक्षम व सुसंस्कृत व्यक्तिमत्व निर्माण करणे हे खरे शिक्षण !

कोणत्याही एका विषयाच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा उपरिनिर्दिष्ट सर्वांगीण स्वरूपाचा विकास होणे अशक्यप्राय आहे. प्रत्येक विषयाची काही वैशिष्ट्ये असतात, तसेच काही मर्यादाही असतात. त्यानुसार प्रत्येक विषय विद्यार्थ्यांच्या काही विशिष्ट शक्ती व प्रवृत्तींना आवाहन करीत असतो व त्या त्या प्रमाणात त्यांचा विकास घडवून आणतो. या दृष्टीने प्रत्येक विषयाच्या अध्यापनाचा विचार विकासात्मक पातळीवरच करायला हवा. मराठीच्याही अध्यापनाला हाच सिद्धांत लागू पडतो. आजच्या विद्यालयीन व महाविद्यालयीन क्षेत्रात होणाऱ्या मराठीच्या अध्यापनाचे अवलोकन केल्यास आपल्याला काय दिसून येते ? नेमलेले पाठ्यपुस्तक शिकविणे, ठराविक अभ्यासक्रम पूर्ण करणे व परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी करून देणे याच मर्यादित व चुकीच्या दृष्टिकोनातूनच बहुसंख्य अध्यापक–प्राध्यापक अध्यापन करीत असतात. वस्तुतः पाठ्यपुस्तक किंवा अभ्यासक्रम हे अध्यापनाचे साधन आहे, साध्य नव्हे. परीक्षा हे मूल्यमापनाचे साधन आहे. परंतु साधनालाच साध्याचे महत्त्व देऊन आपण आपल्या अध्यापनाला अत्यंत संकु-

चित व बंदिस्त करून टाकले आहे. दुर्दैवाने आज आपण मराठीची पुस्तके शिकवतो, मराठी विषय शिकवीत नाही या पाठ्यपुस्तककेंद्री व परीक्षाकेंद्री अध्यापनाच्या विषारी वर्तुळातून बाहेर पडून अध्यापनाचा अधिक व्यापक पातळीवर आपण जितक्या लवकर विचार करायला लागू तो सुदिन !

विकासात्मक पातळीवरील विचाराची पहिली पायरी म्हणजे मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे काय आहेत हे समजून घेणे ! मराठीच्या अध्ययनात विद्यार्थ्यांच्या कोणकोणत्या मानसिक शक्तींचा, वृत्तीप्रवृत्तींचा व कौशल्यांचा विकास होऊ शकतो, होणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊनच आपल्याला उद्दिष्टे निश्चित करावी लागतील. तसेच विविध पातळीवर कोणकोणत्या उद्दिष्टांना प्राधान्य द्यावे हेही निश्चित करणे आवश्यक आहे. अध्यापन हे उद्दिष्टानुगामी असायला हवे. निश्चित दिशा राहणार नाही, पद्धतीचाही विचार करता येणार नाही व अशा दिशाहीन अध्यापनाचा सुयोग्य परिणाम होईल अशी अपेक्षा ठेवण्यातही अर्थ नाही. म्हणून उद्दिष्टांच्या जाणिवेच्या अभावी अध्यापनाला कोणतीही निश्चित मराठीच्या अध्यापनाच्या उद्दिष्टांचा विचार सर्वप्रथम. उद्दिष्टांचा हा विचार सविस्तर स्वरूपात पुढे केला आहे.

या उद्दिष्टांचे ढोबळमानाने पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे

- भाषिक उद्दिष्टे
  - ग्रहणात्मक उद्दिष्टे
    - श्रवण
    - वाचन
  - प्रकटीकरणात्मक उद्दिष्टे
    - भाषण
    - लेखन
- वाङ्मयीन उद्दिष्टे
  - रसग्रहणात्मक उद्दिष्टे
  - सृजनात्मक उद्दिष्टे

भाषिक उद्दिष्टे—

प्राथमिक अवस्थेत आपण विद्यार्थ्यांना मराठी हा विषय शिकवितो. याचा अर्थ आपण विद्यार्थ्यांना मराठी हा विषय शिकवितो. भाषेची प्रमुख कार्ये दोन. (१) भाषा समजणे व (२) भाषेचा वापर करता येणे. यांनाच अनुक्रमे भाषाग्रहणशक्ती व भाषाप्रकटीकरण शक्ती असेही म्हणता येईल. भाषाग्रहणशक्तीमध्ये प्रामुख्याने ऐकलेली भाषा समजणे—म्हणजे ' श्रवण ' व लिहिलेली भाषा समजणे—म्हणजे—' वाचन ' या दोन मूलभूत कौशल्यांचा अंतर्भाव होतो. तसेच भाषाग्रहणशक्तीमध्ये प्रामुख्याने ऐकलेली भाषा समजणे—म्हणजे ' श्रवण ' व लिहिलेली भाषा समजणे—म्हणजे ' वाचन ' या दोन मूलभूत कौशल्यांचा अंतर्भाव होतो. तसेच भाषाप्रकटीकरण शक्तीमध्ये भाषा बोलणे—म्हणजे ' भाषण ' व भाषा लिहिणे—म्हणजे ' लेखन ' या दोन मूलभूत कौशल्यांचा समावेश होतो. अशा रीतीने दैनंदिन जीवनात, व्यवहारात, शिक्षणात इतरांचे अनुभव व विचार भावना ग्रहण करण्यास त्याचप्रमाणे हरतऱ्हेच्या आत्मप्रकटीकरणास आवश्यक असलेले भाषिक सामर्थ्य प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे हे भाषेच्या अध्यापनाचे मूलभूत कार्य ! यालाच आपण भाषिक उद्दिष्ट किंवा उद्दिष्टे म्हणून संबोधतो.

परंतु ग्रहण व आत्मप्रकटीकरण अशा केवळ दोन प्रकारांचा निर्देश करून भागणार नाही. या प्रत्येक प्रकाराचे थोडे अधिक विश्लेषण केले तरच त्यांचे यथार्थ स्वरूप स्पष्ट होऊ शकेल.

ग्रहणात्मक उद्दिष्टे

ग्रहणात्मक उद्दिष्टांचा अर्थ विद्यार्थ्यांच्या भाषाग्रहणशक्तीचा विकास करणे ! विद्यार्थ्यांच्या भाषाग्रहणशक्तीमध्ये कोणकोणत्या उपघटकांचा किंवा शक्तींचा अंतर्भाव होतो हे आपण आधी पाहू. प्रथम पायरी म्हणजे विद्यार्थ्यांना शब्दांचे अर्थ, त्यातील अर्थांच्या विविध छटा, संदर्भानुरोधाने बदलणारे अर्थ, शब्दांच्या मागील सांस्कृतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी समजणे ! या सोबतच वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते इत्यादींचेही अर्थज्ञान त्यांना झाले पाहिजे. दुसरी पायरी म्हणजे लिहिणाऱ्याच्या लिखाणातील किंवा बोलणाऱ्याच्या भाषणातील मध्यवर्ती कल्पना प्रमुख मुद्दा व इतर महत्त्वाचे मुद्दे त्यांना चटकन समजून घेता आले पाहिजेत. परंतु लेखकाचे किंवा बोलणाऱ्याचे केवळ मुद्देच किंवा माहिती समजणे पुरेसे नाही. त्याचा भावाशय, त्यांचा दृष्टिकोण, त्यातील गर्भितार्थ, ध्वन्यर्थ हाही विद्यार्थ्यांना समजू शकला पाहिजे. पुढे

जाऊन आपल्याला असेही म्हणता येईल—सुंदर व कलात्मक लेखन अगर भाषण यातील सौंदर्याची अनुभूती येण्यासाठी आवश्यक असलेली सौंदर्यघटकांची-अलंकार, रस, शैली इत्यादी—योग्य ती जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. वर वर्णिल्याप्रमाणे भाषाग्रहण-शक्तीचा विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती, कल्पनाशक्ती, बुद्धी इत्यादी शक्तींचा विकास होणे आवश्यक आहे, कारण या शक्ती भाषाग्रहण शक्तीला आधारभूत आहेत. या सर्व प्रकारच्या शक्तींना भरपूर प्रमाणात जर अध्यापनातून चालना दिली गेली, त्यांचा विकास झाला तरच भाषाग्रहण-शक्तीचा खऱ्या अर्थाने विकास होईल.

प्रकटीकरणात्मक उद्दिष्टे

आत्मप्रकटीकरण म्हणजे स्वतःचे विचार, स्वतःच्या भावना, कल्पना, मते, अनुभव, दृष्टिकोण इ. प्रकट करणे. हे प्रकटीकरण दोन पातळींवर होते—(१) लेखी व (२) मौखिक. या दृष्टीने शुद्ध लेखन व शुद्ध भाषण ही पहिली पायरी! आपल्या विचार–भावना–कल्पना थोडक्यात, मुद्देसूदपणे व परिणामकारकपणे व्यक्त करता येणे ही पुढची पायरी! हे कौशल्य प्राप्त होण्यासाठी सुयोग्य शब्दांचा, वाक्प्रचारांचा, म्हणी–सुभाषितांचा, प्राप्त ज्ञानातील अनुरूप संदर्भाचा नेमका व यथोचित उपयोग करण्याची पात्रता, तसेच एखाद्या मुद्याचे–कल्पनेचे स्पष्टीकरण किंवा त्यांचा विस्तार करण्याचीही क्षमता निर्माण व्हायला हवी. त्याचप्रमाणे वर्णनकौशल्य, निवेदन–कौशल्य, स्पष्टीकरण व विवेचन कौशल्यही निर्माण व्हायला हवे. लेखनामध्ये हे कौशल्य वाक्यरचना, परिच्छेद लेखन, निबंध लेखन, प्रश्नांच्या उत्तरांचे लेखन, सारांश लेखन, पत्रलेखन इत्यादी स्वरूपात क्रमवार निर्माण केले जाऊ शकते. मौखिक पातळीवर ही प्रकटीकरणक्षमता अनुक्रमे संभाषण, कथन–निवेदन, चर्चा, वादविवाद, भाषण इत्यादी माध्यमांतून विकसित होऊ शकते. अशा रीतीने भाषेचा समर्थपणे, आत्मविश्वासाने उपयोग करण्याचे सामर्थ्य निर्माण करणे म्हणजेच प्रकटीकरणात्मक उद्दिष्ट साध्य करणे!

प्राथमिक व पूर्वमाध्यमिक म्हणजे साधारणतः पहिली सात–आठ वर्षे या उद्दिष्टांना प्राधान्य देऊन मराठीचे अध्यापन करण्यात यावे.

वाङ्मयीन उद्दिष्टे

प्रारंभीची काही वर्षे आपण मराठी हा विषय भाषा म्हणून जरी शिकवीत असलो तरी पुढे तो वाङ्मय म्हणून शिकवीत असतो. येथे आपण मराठीचा मातृभाषा या दृष्टीनेच विचार करीत आहोत. प्राथमिक व पूर्वमाध्यमिक अवस्थेत प्रामुख्याने भाषिक उद्दिष्टांवर–म्हणजेच भाषिक विकासावर भर द्यावा! उत्तर माध्यमिक वर्गांमध्ये भाषिक घटकांसोबतच वाङ्मयीन उद्दिष्टांना देखील अध्यापनात स्थान देण्यात यावे. महाविद्यालयीन पातळीवर मात्र मराठी हा विषय प्रामुख्याने वाङ्मयीन दृष्टिकोनातून शिकविला गेला पाहिजे. वाङ्मयीन उद्दिष्टांचा विचार करताना वाङ्मयनिर्मितीची प्रक्रिया, प्रयोजन व वाङ्मयाचा वाचकाच्या मनावर होणारा परिणाम या गोष्टी आधारभूत मानाव्या लागतील. अर्थात् या सर्व वाङ्मयीन प्रक्रियांचे विवेचन किंवा स्पष्टीकरण येथे करावयाचे नाही. थोडक्यात आपण एवढेच म्हणू या की रस, सौंदर्य, अनुभूती व कलात्मकता ही वाङ्मयीन कलाकृतीची मूलतत्त्वे आहेत, तिचा आत्मा आहेत. जेव्हा रसिक वाचक ही कलाकृती वाचतो तेव्हा त्याने तिचा आस्वाद घ्यावा, या मूलतत्त्वाचा त्याच्या मनावर सूक्ष्म परिणाम व्हावा ही अपेक्षा असते. हे लक्षात घेऊनच आपण वाङ्मयाच्या अध्यापनाचीही उद्दिष्टे निश्चित केली पाहिजेत. या दृष्टीने वाङ्मयीन उद्दिष्टांचेही आपल्याला दोन प्रकार करता येतील–(१) रसग्रहणात्मक किंवा सौंदर्यानुभूतिपर व (२) सृजनात्मक. प्रथम आपण पहिल्या प्रकाराचा विचार करू.

रसग्रहणात्मक किंवा सौंदर्यानुभूतिपर उद्दिष्टे

वाङ्मय वाचनाचा हेतु उच्चतर कलात्मक आनंदाची प्राप्ती! हा आनंद प्राप्त करून घेण्यासही विशिष्ट प्रकारची मानसिक पात्रता निर्माण व्हावी लागते. अशा प्रकारची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हा वाङ्मयाच्या अध्यापनाचा खरा हेतू. रस किंवा सौंदर्य हा वाङ्मयाचा आत्मा असे आपण वर पाहिले. म्हणून रसास्वादाची किंवा सौंदर्यास्वादाची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हे शिक्षकाचे कार्य आहे. वाङ्मयाचा आस्वाद घेण्याची म्हणजेच रसास्वादाची किंवा सौंदर्यानुभूतीची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये केव्हा निर्माण होईल? जर त्यांच्या विचार-

शक्तीचा व कल्पनाशक्तीचा विकास झाला असेल, भावना सुसंस्कारित होऊन भावानुभूतीची क्षमता विकसित झाली असेल तर ! एवढेच नव्हे तर संवेदन-क्षमता, सौंदर्यदृष्टी, सहृदयता, सदाभिरुची, रसिकता या मन:प्रवृत्तींचा व शक्तींचा जर योग्य स्वरूपात विकास झाला असेल तरच ! यासाठी वाङ्मयाच्या अध्यापकाला तो शिकवीत असलेल्या विविध वाङ्मय-कलाकृतींच्या अध्यापनातून तऱ्हेतऱ्हेच्या मानवी भावनांशी व पात्रांशी विद्यार्थ्यांना समरस करवून त्यांच्यात तेवढी सहानुभूती निर्माण करून मानवी मनाच्या गूढतेचा व सखोलतेचा त्यांना प्रत्यय आणून द्यावा लागेल. वाङ्मयातील अनेकविध घटना व समस्या यांच्या दर्शनातून जीवनदर्शन घडवावे लागेल, कला-कृतीतून अभिव्यक्त होणाऱ्या सौंदर्याची प्रचीती आणून द्यावी लागेल व तदंतर्गत श्रेष्ठ मानवी व कलात्मक मूल्यांचे संस्कार जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांच्या मनावर करावे लागतील. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या मानसिक प्रक्रिया जर सुसंस्कारित व संवर्धित केल्या गेल्या तरच वाङ्मयाच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य झाली असे म्हणता येईल. या दृष्टीने वाङ्मयाचा अध्यापक हा प्रत्यक्ष कलाकृती व विद्यार्थी यांच्यामध्ये संबंध प्रस्थापित कर-णारा महत्त्वाचा दुवा असतो, कलाकृतीच्या कलात्मकतेचा साक्षात्कार घडवून देणारा दुसरा कलावंतच असतो.

या उद्दिष्टांसोबतच मराठी भाषा, तिच्यातील साहित्य, साहित्यिक यांच्याविषयी आदर व अभिमान उत्पन्न करणे, साहित्याच्या द्वारे संस्कृतीचा परिचय घडवून देणे व सांस्कृतिक मूल्यांचे संस्कार करणे याही उद्दिष्टांना याच सदरात महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

सृजनात्मक उद्दिष्टे

सृजन म्हणजे नवनिर्मिती, कलात्मक अभिव्यक्ती, क्रियाशीलतेचा स्वतंत्र व मौलिक स्वरूपाचा आविष्कार ! मराठीच्या अध्यापनाची ही अत्युच्च पातळीवरील उद्दिष्टे ! सुंदर, स्वतंत्र, मौलिक व शैलीदार लिखाण करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, त्यांना मार्गदर्शन करणे, भाषासौंदर्यप्रसाधनांच्या विविध अंगांची–सुंदर शब्दयोजना, अलंकार, सुभाषिते, वचने, मांडणी किंवा शैली इ. ची जाणीव देऊन त्यांचे प्रत्यक्ष उपयोजन करायला लावणे व तद्द्वारा आत्माविष्काराचे एक कलात्मक माध्यम त्यांना प्राप्त करून देणे हे सृजनात्मक उद्दिष्टांचे खरे स्वरूप. ज्यांच्या ठिकाणी प्रतिभेची चमक असेल त्यांना कलात्मक निर्मिती करण्यास उत्तेजन देणे व आवश्यक तेथे मार्गदर्शन करणे हेही शिक्षकाचे कर्तव्य आहे. कथा, काव्य, नाटके लिहिणे म्हणजेच सृजनशीलता असे समजण्याचे कारण नाही. असे लेखन करण्याची पात्रता ही नैसर्गिक असते, ती संपादित नसते. परंतु या व्यतिरिक्त किंचित खालच्या पातळीवर सुंदर व शैलदार लिखाण करण्याचे शिक्षण मात्र दिले जाऊ शकते. प्रकटीकरणाची उच्च व कला-त्मक पातळी म्हणजे सृजनशीलता ! रसानुभूती किंवा सौंदर्यानुभूती ही वाङ्मयीन उद्दिष्टांची आस्वादात्मक बाजू, तर सृजनशीलता ही निर्मायक बाजू ! आज पाश्चात्य देशांमध्ये शैक्षणिक क्षेत्रात सृजनशीलतेच्या विकासासंबंधी अनेक प्रकारचे प्रयत्न व प्रयोग होत आहेत. त्या दृष्टीने मातृभाषेच्या उच्च अध्यापनाच्या पातळीवरील उद्दिष्टात सृजनात्मकतेचा अंतर्भाव करणे आवश्यकच ठरते

आज ही उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य होत आहेत ?

उद्दिष्टांची सविस्तर चर्चा केल्यानंतर आजच्या अध्यापनातून ही उद्दिष्टे किती प्रमाणात सफल होत आहेत याचा शोध घेणे अप्रस्तुत ठरणार नाही. उलट पुढील विचाराच्या दृष्टीने उपकारकच ठरेल.

उद्दिष्टांच्या साध्यतेसंबंधी विचार करताना आणखी एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा होता. आपण मातृभाषेच्या अध्यापनासंबंधी विचार करीत आहो. मातृभाषा ही शिकूनच येते असे नाही. शाळेमध्ये जाण्यापूर्वीच मूल मातृभाषा शिकू लागलेले असते. त्याला भाषा समजते व बोलताही येते. शाळेत न जाणारे व न गेलेले अनेक निरक्षर लोक मराठी उत्तम रीतीने समजू शकतात व समर्थपणे तिचा वापरही करीत असल्याचे आपण पाहतो. अर्थात लेखन व वाचन सोडून ! हे शाळेतच शिकावे लागते. तरीही दैनंदिन व्यवहारात नित्य वापर करावा लागत असल्या-मुळे शालेय शिक्षणाव्यतिरिक्तही आपली पुष्कळशी भाषिक प्रगती अनायासेच होत असते. मग अनेक वर्षे शाळेमध्ये भाषेचे शिक्षण घेतल्यानंतर या भाषिक प्रगतीची पुष्कळच वरची पातळी आपण गाठावयास नको काय ? आज प्राथमिक शाळेपासून माध्यमिक

शालांत परीक्षेपर्यंत—म्हणजे दहा किंवा अकरा वर्षे मराठी हा आवश्यक विषय असतो. व पुढे कॉलेजातही विद्यार्थी निदान ३–४ वर्षे मराठीचे अध्ययन करतात. तेव्हा १०–१५ वर्षांच्या कालखंडात विद्यार्थ्यांना मराठी चांगले बोलता येते, लिहिता येते, थोडेफार वाङमय त्याने वाचले आहे एवढ्याच प्रगतीची अपेक्षा ठेवणे रास्त आहे काय ? खर्च झालेला काळ व करण्यात आलेले प्रयत्न या दृष्टीने हे समाधानकारक आहे काय ? म्हणण्याचा अर्थ मराठी ही मातृभाषा असल्यामुळे तिच्या अध्ययन—अध्यापनाची उद्दिष्टे बऱ्याच वरच्या पातळीवरची असली पाहिजेत याच दृष्टीने उद्दिष्टांचा आतापर्यंत उहापोह केला. आता ही कितपत साध्य होतात हे पाहायचे !

भाषिक उद्दिष्टांच्या पातळीवर विचार केल्यास सर्वसाधारणतः भाषा समजण्याची शक्ती विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत असली तरी त्यांची शब्दसंपदा फारच तोकडी असते, दैनंदिन व्यवहारापलीकडील शब्दांचा त्यांचा आवाका फार मर्यादित असतो. तसेच त्यांच्या विचारशक्तीचा व तदा ारित आकलनशक्तीचा विकास होताना दिसत नाही. एखादा परिच्छेद वाचल्यावर त्यातील मध्यवर्ती कल्पना, महत्त्वाचा मुद्दा किंवा नेमका आशय बहुसंख्य विद्यार्थ्यांना सांगता येत नाही. अपठित उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे विद्यार्थी ज्या तऱ्हेने देतात त्यावरून या विचारशक्तीच्या अभावाचा सहज अंदाज येतो. असा विकास न होण्याचे महत्त्वाचे कारण शिकविताना प्रत्येक गोष्ट विद्यार्थ्याला आम्हीच समजावून देतो. त्याला स्वतःला विचार करायला किंवा समजून घ्यायला कधीच प्रवृत्त करीत नाही. त्यामुळे तशी सवयच त्याला कधी लागत नाही. परिणामतः त्याच्या ग्रहणशक्तीचा ज्या प्रमाणात विकास व्हायला पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. स्वयंशिक्षणाची सवय जर विद्यार्थ्यांना लावली, अपठित उताऱ्यांच्या पद्धतीने जर गद्य भागाचे अध्यापन करण्यावर अधिक भर दिला तर ही उणीव काही प्रमाणात भरून काढता येईल.

प्रकटीकरणाच्या बाबतीत मात्र विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा स्तर फारच कमी आहे. महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील शुद्ध, पद्धतशीर व मुद्देसूद लेखन करता येत नाही. याचेही महत्त्वाचे कारण लेखन–विकासाचा पद्धतशीर व क्रमबद्ध विकास करण्याकडे होत असलेले आमचे दुर्लक्ष ! आम्ही विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे लिहूनच देतो व ती पाठ करून विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होतात. स्वतंत्र लेखनाचा विकास करण्यासाठी फक्त निबंध या प्रकाराचा उपयोग केला जातो. खरे पाहिले असता निबंधलेखन ही बरीच पुढची पायरी ! तत्पूर्वी रचनेच्या (composition) विविध प्रकारांचा, विविध प्रकारची वाक्यरचना, कल्पना विस्तार, परिच्छेद लेखन इत्यादी प्रकारांच्या आधारे क्रमाक्रमाने लेखनशैलीचा विकास करीत गेले पाहिजे. प्रारंभी स्वानुभवांच्या अभिव्यक्तीवरच भर देऊन हळूहळू वर्णनात्मक, निवेदनात्मक व नंतर विवेचनात्मक अशा लेखनावर भर द्यावा. सुरवातीला स्वैर लेखनाला वाव न देता नियंत्रित (controlled) स्वरूपाचेच लिखाण करवून घेतले पाहिजे व हे लेखनप्रभुत्व आत्मसात केल्यावरच स्वैर लेखनाला वाव द्यावा. विद्यार्थ्यांकडून आपण किती लिहून घेतो हे महत्त्वाचे नाही, काय लिहून घेतो व कशा पद्धतीने लिहून घेतो हे महत्त्वाचे आहे. कारण निबंध–लेखनात विद्यार्थ्यांना निश्चित मार्गदर्शन मिळत नाही. ते मरमसाट काहीही लिहितात व त्यात त्यांच्या असंख्य चुका होतात. त्या चुका निबंध तपासून सुधारण्याचे कामही शिक्षक करू शकत नाही. साहजिक अशा या लिखाणातून श्रमाचा अपव्यय होऊन पदरात मात्र विशेष काहीच पडत नाही. एकीकडे विद्यार्थ्यांना न झेपणारे मोठमोठे विमर्षात्मक निबंध लिहून घेण्यावर भर तर दुसरीकडे पत्रलेखनादी साध्या व्यावहारिक कौशल्याकडे दुर्लक्ष असे काहीतरी नियोजनशून्य अध्यापन आज होत आहे.

मौखिक प्रकटीकरणाच्या उद्दिष्टांच्या बाबतही आपण उदासीनच आहोत. शुद्ध व स्पष्ट उच्चार, शुद्ध अर्थपूर्ण व भावपूर्ण वाचन ही मूलभूत कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये आज किती प्रमाणात विकसित होतात ? संभाषणचातुर्य, वादपटुत्व, स्पष्टीकरण–प्रतिपादन शैली, कथनकौशल्य, काव्यवाचन, नाट्यवाचन इत्यादी कौशल्ये तर अभावानेच आढळून येतात. वस्तुतः व्यावहारिक जीवनात लेखनशैलीपेक्षा मौखिक प्रकटीकरणक्षमतेचीच अधिक गरज असते. परंतु परीक्षेचे स्वरूप लेखी असल्यामुळे व आमचे सर्व अध्यापन परीक्षेच्या मर्यादित दृष्टिकोनातूनच होत असल्यामुळे या व्यावहारिक परंतु अत्यंत उपयुक्त अशा कौशल्यांची

आज अक्षम्य उपेक्षा होत आहे. व म्हणूनच विद्यार्थ्यां-मधून परिणामकारक व प्रभावी व्यक्तिमत्त्व निर्माण करण्याच्या दृष्टीने आपले अध्यापन अपुरे ठरत आहे.

आता आपण वाङ्मयीन उद्दिष्टांकडे वळू या ! या क्षेत्रात तर अत्यंत निराशाजनक परिस्थिती आढळून येते. वर निर्देशिलेली वाङ्मयीन उद्दिष्टे विशेषतः रसग्रहणात्मक किंवा सौंदर्यानुभूतिपर आमच्या वाङ्मयाच्या अध्यापनातून कितपत साध्य होतात ? माध्यमिक शिक्षणातून तर ती साध्य होत नाहीतच. परंतु महाविद्यालयीन पातळीवर–जेथे प्रामुख्याने वाङ्मयच शिकविले जाते, तेथे तरी ती किती प्रमाणात सफल होतात ? उत्तर न देणेच इष्ट ! बरे, या दिशेने निश्चित स्वरूपाचा प्रयत्न तरी केला जातो काय ? केला जात नाही हे कटू सत्य आहे असे खेदाने म्हणावे लागते. एवढेच काय, ही उद्दिष्टे व ती साध्य करण्याचे मार्ग कोणते याचीही आम्हाला जाणीव नाही. या रसग्रहणात्मक उद्दिष्टांचा विकास प्रामुख्याने भावनात्मक प्रक्रियेतून होत असतो. त्यात वैचारिक अंशाचा अभाव असतो असे नव्हे, तर ही उद्दिष्टे बव्हंशी भावनाधिष्ठित आहेत व म्हणून भावनांच्या द्वारे हे संस्कार मनावर होत असतात. परंतु आम्ही जेव्हा विद्यार्थ्यांना वाङ्मय शिकवितो तेव्हा किती प्रमाणात त्यांच्या भावनांना आवाहन करतो ? अध्यापनातून ललितवाङ्मयांतर्गत रस व सौंदर्य यांची अनुभूती विद्यार्थ्यांना किती प्रमाणात आणून देतो ? आमचा सगळा भर असतो तो अर्थस्पष्टीकरणावर, अनुभूती–संक्रमणावर नव्हे. उदाहरणादाखल कवितेच्या अध्यापनाच्या उद्दिष्टांची व पद्धतींची येथे मला चर्चा करायची नाही. तो एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे. आम्ही कविता शिकवितो म्हणजे त्यातील शब्दांचा, कडव्यांचा अर्थ समजावून सांगतो–सारांश सांगतो, फार तर अलंकार रस–शैली इत्यादींची बौद्धिक चर्चा करून 'रसग्रहण' करतो किंवा लिहून देतो. हे तथाकथित 'रसग्रहण' ज्ञानात्मक पातळीवर (Congnitive) होत असते भावनात्मक (Affective) पातळीवर नव्हे. विद्यार्थ्यांना ते ज्ञान होते—म्हणजे माहिती कळते, पण त्याची अनुभूती येत नाही. समजणे किंवा जाणणे (to know) व अनुभवणे किंवा भावणे (to feel) या दोन प्रक्रियांमध्ये फरक आहे. आमचे वर्गातील काव्यवाचन हा देखील या दृष्टीने चर्चेचा मनोरंजक विषय होऊ शकतो. असो ! जे काव्याच्या अध्यापनात घडते तेच थोड्याफार फरकाने ललित वाङ्मयाच्या सर्वच प्रकारांच्या अध्यापनात घडून येते. म्हणून आमचे वाङ्मयाचे अध्यापन हे नीरस, शुष्क व कंटाळवाणे होते. मग या अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या संवेदनक्षमतेवर, सौंदर्य दृष्टीवर, भावनात्मकतेवर काय संस्कार होणार व त्यांचा विकास तरी कसा होणार ?

सृजनात्मक उद्दिष्टांचे शैक्षणिक महत्त्व मान्य करूनही त्यांच्या साध्यतेबाबत विचार करण्यात फारसा अर्थ नाही. कारण जेथे प्रकटीकरणात्मक उद्दिष्टेच आम्ही करू शकत नाही तेथे सृजनात्मक उद्दिष्टांच्या साध्यतेची अपेक्षा ठेवणे अवास्तव ठरेल. म्हणून या संबंधीचे विवेचन येथे केले नाही.

आतापर्यंत मराठीच्या अध्यापनाच्या उद्दिष्टांची त्याचप्रमाणे ती कितपत साध्य होत आहेत याची चर्चा केली. उद्दिष्टे साध्य का होत नाहीत याची कारण-मीमांसा करताना काही सदोष पद्धतीचा अपरिहार्यपणे निर्देश करावा लागला. परंतु सुयोग्य पद्धतीचा विचार या लेखात करण्याचा मानस नसल्यामुळे तो केला नाही. उद्दिष्टे निश्चित केल्यानंतर ती साध्य करायची असतील तर उद्दिष्टानुरूप अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे व तो करण्यात आला तरच विद्यार्थ्यांचा विविध स्तरावरील मराठीचा दर्जा उंचावण्याची शक्यता आहे. या पद्धतीचा विचार पुढील लेखात करू !

वळण

—बाळकृष्ण बन्नोरे

बऱ्याच लोकांना बसचा प्रवास म्हणजे मळमळायला लागतं; काहींना तर ती शिक्षाच वाटते. मला स्वतःला मात्र हाच प्रवास चिकार आवडतो. रस्त्यावरती नागमोडी, घाटदार, वाकडी-तिकडी वळणं घेणारी बस, ज्या डौलदार दिमाखाने नाचत, लचकत जाते, त्याची लज्जत आगगाडीतून सरळसोट धावणाऱ्या माणसांना मिळतच नाही मुळी.

खरं पाहिलं असता, सरळपणा हा काही विश्वाचा आधार नाही. कुटिलता, वक्रता, वळण..हाच मानवी जीवाचा धर्म, स्थायीभाव. दृश्य जगतातील कोणतंही क्षेत्र घ्या, वक्रतेचं महत्त्व अनन्य असलेलं आपल्याला दिसेल. साहित्य-काव्य-वाङ्मय यांचा पंचप्राण वक्रोक्ति, हे तर कुंतल सरळपणे सांगून गेलाच. जल-लहरींची कुटिलता, भृकुटीचा इंद्रधनुष्य, केसांच्या केरसुणीपेक्षा कचपाशाच्या नागाच्या उलगडत्या फड्याला आलेलं दैवी मूल्य; त्रिवलींच्या चोपदरी घड्या, कटीची लचक .....ही तर सौंदर्याची आगमलक्षणेच. "तन्वी श्यामा शिखरिदशना" सांगणाऱ्या कालिदासाच्या विधात्याची आद्य सृष्टीच. नासिका सरळ असणे हेच थोडं विचित्र वाटतं खरं पण सुंदर युवतींचं फेंदारलेलं नाक चाफेकळीपेक्षा हजारदा सुंदरच. एकूण curves किंवा वक्रता हे सौंदर्याचं 'तत्वमसी'च मानावं लागेल.

आता हेच बघा, ज्यात खासं अक्षर-साहित्य लिहिल्या जातं ते अक्षरदेखील कसं 'वळण'दार हवं, सरळ नव्हे. Italics मधली जाहिरात ओलेतीच्या कपड्यासारखी कशी नजरेला लपेटून टाकते. "वळणावर आंब्याचे झाड एक वाकडे" या ओळीत तर मी म्हणेन रसशास्त्राच्या मौलिक सिद्धान्ताचा पाकच उतरला आहे. इथे लक्षात आलं असेलच की हे आंब्याचं झाड 'सरळ' नाही, 'वाकडं' आहे, म्हणून सुंदर आहे, नगराच्या मध्यभागी शहीदाच्या जयस्तंभासारखे (म्हणजे शुंभासारखे !) उभं ठाकलं नाही, तर 'वळणावर' डोलत आहे म्हणून दर्शनीय आहे. कितीकदा वळून पाहसी आणि पुनः पुनः नजर वळविसी" "डोळे हे जुलमी गडे." सरळ नाही हं किती तरी अशी विधाने मांडता येतील की जी या 'वळणाचे' महात्म्य पदोपदी व्यक्त करतात. दूर कशाला जायचं ? नित्याच्या व्यवहारात, आपण ज्यावेळेस म्हणतो "ती बाई सरळ साधी आहे." म्हणजे काय सुचवितो, तर ती अशीच शामळू गबाळ आहे. कुरुपतेचाच पर्यायी शब्द आहे हा. सुंदर स्त्री ही कधी 'सरळ' राहूच शकत नाही; किंवा फार तर असं म्हणा, तिला सरळ राहून चालताच येणार नाही. तिने दीड-पायावरच उभे रहावे. अन्यथा ती संघर्षात टिकणार नाही किंवा तिच्यावर गंडांतर येऊन सपाट होईल.

मानवी आयुष्य म्हणजे एक प्रदीर्घ प्रवास असं म्हणतात, आणि प्रवास म्हणजे गती व गती म्हणजे 'दळण-वळण' हाच खरा मूळ शब्द, बाकीची धातुसाधिते व्युत्पतिशास्त्राचा मागोवा घेऊन या शब्दावलीची फोड करा की मी म्हणतो त्या 'वळणा'चा, वक्रतेचा गाभाच तुम्हाला गवसेल. 'दलन-वलन आदौ दलनं, पश्चात् वलनं...इति अहम्...' "आधी दळावे, मग वळावे" म्हणजे जीव-धारणेचा जो भौतिक मूलाधार 'पोळी' ती कशी तयार होते, ही प्रक्रिया समजेल. दळणाचे वळण करणे हा स्थायीभाग म्हणून जीवन म्हणजे अविरत दळण-वळण, हे

समीकरण. लहान मुलांना 'वळण' लावावे असं जेव्हा आपण म्हणतो, त्याचा अर्थ हाच असतो. तो जसा 'सरळ' आहे तसा न ठेवता त्याला चाकोरीत वळवा, संस्कृतीची नि सभ्यतेची अंर्तहित वक्रता त्याला शिकवा व तयार करा.

एकंदरीत काव्य, नृत्य, शिल्प, संगीत, शास्त्र, अध्यात्म, इत्यादी इत्यादी विविध कलेच्या वा विज्ञानाच्या विश्वात हे 'वळणच' तुम्हाला ठळकपणे प्रत्ययास येईल. काव्यातील वक्रता, ध्वनी तर पिढीजातच आहे. वर निर्देशिलेल्या काही उदाहरणांना कुणी वावदूक केवळ शारीरिक सौंदर्याचे लेबल लावील. पण 'आंतरिक गुंता' दाखविणारं साहित्य तेच खरं सुंदर व विदग्ध साहित्य असं आपण आता मानतोच ना ? 'एक होता राजा नि एक होती राणी' ही झाली रविवारची सरळ कहाणी पण तीच कलिंग–राणी एका चांदण्या रात्री मगध देशाच्या परक्या युवराजाच्या लताकुंजात सापडली असे 'वळण' ओळ किंवा 'कलात्मक कलाटणी' आली की ती नव–कथा होते. आयुष्य हे 'सूत' नसून 'गोफ' आहे, म्हणून सौंदर्यमय आहे. भावार्थ हा, नवकाव्याचा 'तिरकस आशय' व नव चित्रकलेचा ४ या आकड्याशी असलेला अभिजात लघळपणा हे त्या 'वळणा'चे घवघवीत मासले. व्यंजनाचा 'रस' स्वराच्या अळणी 'सारात' नाही हेच खरे.

आता नृत्य घ्या...वाकडं पाऊल पडल्याशिवाय नृत्यच होत नाही. ट्विस्ट, रॉक ॲन्ड रोल, रोंबा-सोंबा किंवा मणिपुरी, कथकली, गर्भा, मांगडा इत्यादी प्रकार लोकप्रिय होतात ते त्यांच्या आंतरिक वक्रतेमुळे. पायांच्या सरळ उड्या म्हणजे फारच फार त्या रामसेवकाच्या लीला किंवा झिम्मा वा फुगडी या संज्ञेला पात्र होईल. हे ज्या द्रष्टयाने हेरलं, तो खरोखरच धन्यवादार्ह आहे. दिगंबर अशा महादेवाला अर्धनारीनटेश्वराच्या स्वरूपातून "पुरुषांना नुसता पुरुषी आकार असूनच भागत नाही तर नर्तकीची वक्रता त्यात हवी" हेच दर्शविले नाही काय ?

'शिल्प' म्हणजे तर कोरीव वक्रताच. एकसंघ शिलासंघातांतून वाकवलेली वेरूळची लेणी, चैत्यालये, स्तूपे, हेमाडपंथी देवालये, खजुराओ यांची सर तुमच्या बिस्किटपात्रासारख्या असलेल्या घरांना येत नाही. कौलारू घराचं डौलदार वळण, सिमेंटच्या सपाट छताला केव्हाही घर पाडेल, संगीतशास्त्र...आजकालचं भावगीत आपल्या सरळपणाने बरेचदा भाव मारून जाते पण अस्सल खानदानी मैफलीत ते टिकेल म्हणता ? छे...पाच मिनिटात ते धापा टाकीत उठेल. कारण उघड आहे. त्यात वक्रता, वळण नाही. गायकीची अनंत आ–कारी तान व तिची नखरेल, ढंगदार वक्रता भावगीतातल्या सरळ सुस्कान्यात नाही...
विज्ञानाचं क्षेत्र म्हणजे तर नुसतं curves नि wave–lengthsचं अमाप पीकच. प्रकाशलहरी, ध्वनिलहरी, जड परमाणूंच्या चैतन्यमय लहरी... सारी शुद्ध सरळ अखंड वक्रताच, अवकाशाला व्यापत आहे. त्यांच्या दृष्टीने, सरळ रेषा हे एक जणू आकाश-पुष्पच. अनेक बिंदूंचा विवक्षित वक्रतेने प्रगत होणारा समवाय ही सरळ रेषेची सुंदर कल्पना. आणि हा बिंदू किंवा वर्तुळ म्हणजे तर बीज–भूत, गतिशील वाक, वळण. दृष्टिसातत्याच्या नियमाप्रमाणे ही लहरी वक्रता, आपल्याला सरळ भासते अगदी सर्परज्जुवत् व आपण तिला धाडांत सरळ रेषा म्हणतो. परमार्थतः, वक्रता ही प्रकृती नि सरलता ही विकृती. न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने काय सिद्ध केलं असेल, ते हेच की, बापड्यांनो, वर उडालेला चेंडू खाली येतो, वळणं घेतो; वर वर असा सरळ जात नाही कधी. म्हणजे तुम्ही फार सरळ गेले की खालीच वा बाजूला घसरता कारण आपण नेहमीच गोल गोल वाकडे घुमत असतो.

आता ज्ञानियांचे अधिराज्य जे अध्यात्म, ते काय म्हणतं ? या अध्यात्मातील 'ब्रह्मांड' तर जाणूनबुजून अंडाकृतीच तिथे सरळपणाचं नावच कशाला ? सारं ओंकाररूप. आत्माच स्वरूप. ही नेति नेतीच. सरळ मार्गाने तो दिसणारच नाही; भेटला ती तो आत्मा नसून आत्म्याचं भूत असं मानावं. त्याला 'साक्षात्कार' हवा. आत्मा म्हणजे नागाचे वेटोळे न उलगडणारे. "स्थिरचर व्यापुनी दंशामुळे उरण्याचा," पराक्रम परमात्मा करू शकतो ते कशामुळे, तर त्याचे मूळ स्वरूप लवचिक, कुंडलिनीमय, वक्र, म्हणूनच. तो हिमालयासारखा नुसता सरळसोट उभाच असता, तर हे ब्रह्मांड त्याला कसं व्यापता आलं असतं ? म्हणजे व्यापक होण्यासाठी, वक्रतेची जरूरी असते. वक्रता म्हणजे प्रसारण; सरळता म्हणजे संकोच. शून्याकार होण्याची वेदान्तीय कल्पना खरोखरच जगाच्या जन्म:

सिद्ध अनादी-अनंत वक्रतेची, वळणाची समर्थक आहे. त्या त्रिकालज्ञांचा जयजयकार असो, ज्यांनी विद्येचं आराध्य–दैवतही वाकडं ठेवलं, वलाचं उपास्य–दैवत, तेही वाकडं आणि लक्ष्मी तर जात्याच चपलचरणा! ! लंगड्या, सावळ्या बाळकृष्णाला 'पूर्णावतार' म्हणतात ते याच कारणाने. तो गोरागोमटा, सरळ राम निव्वळ मर्यादापुरुष. कृष्णाजवळ आहे ते अखंड फिरणारं सुदर्शन चक्र. त्याचे आयुष्य म्हणजे मानवीय जीवनाच्या अंतर्गामी, अनिवार्य, साक्षेपी वक्रतेचे—वळणाचे अठरा अध्यायच, म्हणून तो त्रिकालदर्शी. एकच सरळसोट बाण फेकणारा, एकच-पत्नी असणारा, सरळ बोलणारा, घोपटमार्गी राम म्हणजे असाधारण, अ–मानवीय. तो आपल्या व्यवहारात प्रिय होणार कसा? तीच कृष्णाची लीला चर्वानं वाचल्या जाते. हाच राम जर कृष्णाच्या काळी जन्मला असता नि अर्जुनाची भूमिका त्याला करावी लागली असती तर निश्चित कृष्णाने १९व्या अध्यायाचा विशेषांक काढून दरडावलं असतं...

> मौर्ख्यं मा स्म गमो राम, नैतत् त्वय्युपपद्यते ।
> रजकस्यैकशब्देन, भार्यां त्यक्तुं न चार्हसि ॥
> प्रजातंत्रं न ते धर्मो, तत्वपालनमेव हि ।
> अजा-पुत्रं बलिं दद्यान्, यज्ञे, न तु पुरोहितः ॥
> ......इत्यादी.

तात्पर्य, हेच की साऱ्या जगाची उत्पत्ती मुळी वक्रतेत आहे ऋषीचं कूळ, नदीचं मूळ, झाडाचं मूळ वाकडंच असणार. ज्या ऊर्जस्वल क्षणी त्या ब्रह्म्याला साक्षात्कार झाला "एकोऽहं, बहु स्यामः" एकाकी सरळ जीवन हे मरण आहे, कुठे तरी चुकलं आहे... मला मायाचार केलाच पाहिजे; बहुधा–कुटिलता, स्वसंवेद्य आर्जवाचा व्यामोह सोडून इंद्रियसंवेद्य वक्रता स्वीकारलीच पाहिजे," तेव्हा त्याला ब्रह्मांडाचं स्वरूप लक्षात आले...साऱ्या प्रकृतीची धर्म; ती आंतरिक, अविभाज्य, अनिवार्य वक्रता वा द्वैत उमगले नी ब्रह्म्याचा हट्टी, एकांतिक, 'मी' पणा सरून 'आम्ही'-पणा आला. अनुसूयेच्या पोटी त्रिमूर्तीरूपानं अवतार घेण्यासाठी, पहिलं वाकडं पाऊल ज्या क्षणी पडलं, तो क्षण भाग्याचा, मोक्षाचा नि सत्याचा. "मायारूप ब्रह्म" हेच सत्य—"निर्मळ, लोणकढं ब्रह्म" हे मिथ्या, वन्ध्यापुत्रवत्, हे 'तत्त्वमसि' गाठणाऱ्या चतुराननाच्या, वक्रतेची आणि ओङ्काररूपाची घडी अजूनही कायम आहे. ज्या विमुक्त ब्रम्ह्यानं, स्वतःला अशा रीतीने आदिमायेत, कुंडलिनीयोगात, वक्रतेत, वळणात, बुद्धयाच, गुंफवून घेतलं, ते काही शंकराचार्यांच्या पांगळ्या हातातून सोडवून घेण्याकरिता खचित नाही...!

सारांश, जीवनाचं परमोच्च तत्त्व 'वक्रता'. महापुराने वृक्ष उन्मळतात पण लव्हाळी टिकतात ती त्यांच्या नम्रतेमुळे हे तुकारामही सांगून गेलेत आणि 'नम्रता' ही वक्रतेची जुळी बहीण. पुनः, ईश्वर हे जर प्रीतीचंच दुसरं रूप मानलं तर प्रीतीची वाट ही जन्मसिद्ध नागमोडीच. प्रेम कधीही आमरस्त्यावर होत नाही, झालं नाही, होणार नाही बसस्टॉपवर जरी ते सुरू झालं तरी वळणावरच्या जाईच्या वेलीखालीच ते मोहरतं...एवढंही करून नाहीच उमललं, तर कुणी उर्दू कवीनी म्हटल्याप्रमाणे..."उसे एक खूबसूरत मोड पर छोडना ही अच्छा"—प्रीतीच्या त्या निर्माल्याला, एका सुंदर नागमोडी वळणावर टाका भर चौकात नको.

मला बसचा प्रवास आवडतो म्हणतो तो या साऱ्या कारणांसाठी. कारण जीवनातील अनादी, अनंत, वळणं ठसठशीतपणे जाणवनं ते तेव्हाच.

काही कविता

गरुड

हा हस्तिदंती गरुड
उंच टेकाडावर पाय टेकलेला
पंख पसरून
उडण्याच्या तयारीत
उंचच उंच.
पण अखेर हस्तिदंताचाच आहे तो
जन्मदात्याच्या इच्छेपलीकडे
न जाणारा—न जाऊ शकणारा.
असाच राहील
फुटेपर्यंत !
…पण म्हणून काय झाले ?
आणखी उंच झेपावला नाही तरीही
टेकाड उंचच आहे
जमीन घुळीहून !
…जपून ठेवला आहे हा
(म्हटला तर गरुड)
माझ्या शो-केसमध्ये
वरच्या कपाटात !

—श्रीधर शनवारे

सनद

सटवाईने खोदलेल्या पायावरच
तुझ्या जीवनाचा कुतुबमिनार
तू उभारणार आहेस. हे खरे ना ?
उभार बाई
उभारणार असलीस तर
नको सोडूस
लाडिक स्त्री हट्ट
सोडणार नसलीस तर
या अग्निदिव्याची दीक्षा नको
विषाची परीक्षा नको
देवलंबी मला
पशुत्वाची चिकित्सा नको
बाई ग,
हजारदा तो भोग मी भोगून पाहिला
जीव शिवाशी जोडून पाहिला
क्रुद्ध दरियाच्या उरावर
सेतु-रामेश्वर बांधून पाहिला
पाचवीच्या अवसेला
प्राक्तन पाटीवर गोंदवलेला
आयुष्याचा अग्रलेख
मोडून पाहिला…
पुन्हा त्या फंदात पडायचे नाही ग
सुलक्षणी पुनवेचा सुमुहूर्त साधून
माझ्या अधःपाताची अनादी सनद
मला बदलून घ्यायची आहे ग.

——श्याम सोनारे

खिडकी खुळी

खिडकी खुळी पापणी जरी सोडते स्वप्नांच्या नावा
दूरची झाडी हिरवी वाडी निघाली रंगांच्या गावा
पांढरी अजान जाळत लुभान शब्दात साठवी मन
वाटेच वासरू रुपाचं तारु चावते हिरवे क्षण
पिवळ्या कांतीचो ओंबो गव्हाची स्मरते चंद्राचा चांद
झुळझुळ पणी रानाची गाणी तोडती जिवाचे बांध
स्पर्शाच्या जाळी झुलती तळी पाकळी पानाशी डुले
मातीचा मोहर मौनाचा निखार फुलात अस्मान भुले
वाऱ्याच्या ओठात पहाडी मठात कयेचा श्रावण बोले
खिडकी खुळी पापणी जळी मिजवी सुरांचे शेले !

— राजा महाजन

पालखी

साळुंकी साळको, तुझो माझी पालखी ।।
तू कोण मी कोण नाचतो आहो अंधारात
तल्लीन होऊन गातो आहो षडज् पंचम गांधारात
कुठला षडज कुठला पंचम सूर सारे एक आहेत
सारे स्वर एक तरी अखेर ते एकेक आहेत
मोलनाच्या व्यामोहात रागदारी पोरकी ।।
साळुंकी साळकी ।।

विषयाच्या विलासात विषाद जातो करपून
कामनांच्या किमयेत जीव जातो हरखून
रात्रंदिवस भाया, आपल्या खांद्यावरती पेलतो आहे
सळसळणाऱ्या पिंपळपानात चंद्रबिंब झेलतो आहे
दिव्यत्वाच्या दीमतीला दिले गाजर पारखी ।।
साळुंकी साळकी ।।

कुठले पाप कुठले पुण्य बेभान होतो मनोमन
तेवता तेवता हासत असते नेणीवेचे नीरांजन
इंद्रियांची धाव आहे शुद्धाकडून वद्याकडे
विनाशाची हाव आहे अंताकडून आद्याकडे
कुठला आदी कुठला अंत मध्य राजपारखी ।।
साळुंकी साळकी ।।

तुझ्या माझ्या पालखीला वाट पाणंदीची
पंढरीला निघते वारी देहू आळंदीची
कुठले आम्ही माहीत नाही 'भलंरं भाई' म्हणायचे
कुठे जायचे माहीत नाही धागे मात्र विणायचे
नेणीवेला जाणीवेची आस झाली पारखी ।।
साळुंकी साळकी ।।

अथलाच इतीचे कोडे नाही उलगडत
अंधाराच्या उतारावर अहं जातो गडगडत
'गेले होते शेता विसरले कोयता' गाणे असे घोकते
उतारवय अजूनसुद्धा बाळमुठी चोखते
बेभानीच्या वेहोषीत वेडे मन फसते आहे
पालखीमधलं परब्रह्म तुला मला हसते आहे
झाकलेल्या बाळमुठीला सुखदुःखे सारखी ।।
साळुंकी साळकी ।।

तूं मी दोघीजणी आहो तरी दोन का ?
वर्तुळाला एकाएकी आला नवा कोन का ?
चुटक्या वाजवीत, गिरक्या घेत पालखी पुढे जाते आहे
कुणी म्हणतात, काय जाणे, आपले जुने नाते आहे
प्रकाशाच्या प्रासादात भिंगरीसारख्या फिरत आहो
उन्मादाच्या वेहोषीत अनंतात विरत आहो
क्षणामध्ये मूक होते वागीश्वरी बोलकी ।
साळुंकी साळकी ।।

असेच जायचे गिरक्या घेत सांताकडून अनंतात
ज्ञाताच्याही पलीकडच्या प्रकाशाने भरू रात
खांद्यावरच्या भाया, पण खांद्यावरती पेलत नाहीत
ओझी आपल्या खांद्यावरची चुटक्या–
वाजवून खेळत नाहीत
नेता नेता पालखी दूर जीव होतो मांदा
'नेती नेती' म्हणून आपण बदलून घेतो खांदा
तेवढ्यावरती भागत नाही, बदलून घेतो भाई
तरी आपल्या उत्साहाला उसंत कुठली नाही
भाई आपण, भोई आपण, पालखी सुद्धा आपण
अद्वैताच्या तेजात सरते अंधाराची रापण
सूख सगळं पळून जातं, व्यथा काही जळत नाही
तू मी विरून जातो, काय, काही कळत नाही
आनंदाच्या वेदनेची कथा कोणती काय की ।।
साळुंकी साळकी तुझी माझी पालखी ।।

—सौ. उषा लिमये

पहिला बळी

मृदंगावर पडलेल्या थापेचा पहिला बळी
हवेच्या थारोळ्यात सूसाटून पडला
तशी तबल्याची धिक् धिक् धिक्—
आवाजाने फटफटली......
आणि स्वरालयात अडकलेले माझे मन
भयानक आरोळी ठोकित सुटले.
पायांचा थयथयाट डबडबला
अनंताच्या विस्मृत लहरी
हृदयाचा थरकाप उडवितात
जेव्हा माझ्या स्वरांचा पोशिंदा असतो...

— मृदंग

——पुंडलिक आर. नेमाडे

चाफा

अध्याहृत उभे
ओठावर स्तोत्र
आरतीत नेत्र अनुरक्त.

इच्छेच्या धुक्यात
बावरला जीव
हरवली शीव जीवनाची.

आशयाचा डोह--
पान्हावली वाणी,
न्हाली इंद्रायणी इंद्रियात.

अद्भुत ह्या क्षणी
देह झाला चाफा
सुगंधाच्या वाफा रोमरोमी !

--उ. रा. गिरी

स्पर्श

स्पर्श तुझा लागताच
झाली हळद पिवळी
आणि तुझ्या सौभाग्याने
आली कुंकवास लाली.

--बजरंग सरोदे

अबोला

गेली टळून दुपार
उन्ह केव्हाच कलले
पुन्हा पळस-फुलांनी
निळे आभाळ रंगले

दूर आंबे-मोहराला
आले गंधाचे उधाण
पायाखालच्या धुळीला
झाले ठेंगणे अस्मान

वठलेल्या चिंचेच्याहि
चिंचा गाभुळल्या काही
तुझा अबोला परंतु
नाही...नाही फिटलाच नाही !

--बाबा मोहोड

एक मधला माणूस

हातात हात मिळविले म्हणजे
(हातचे धरून) ते कोटीकोटी होतात
मग मुंग्या मेरु गिळू शकतात.
दोन्ही ध्रुवावर कुठेही जा
या गणिताचे उत्तर वेदुनी चार.
(असली जरी मनेच अद्राव्य
पाण्यातील वाळूप्रमाणे आणि व्हाईस व्हर्सा.)
सूर्याखालील मुंग्यांमधली
अशीच एक मनूची शहाणी मुंगी
(मुंगळा आणि मुंगी या दोहोमधील
पंख फुटलेला तेलमुंगा.)
त्याच्या बुद्धीचा स्थितप्रज्ञ कॅटॅलिटिक एजंट
डोळ्यावर काड्यांचा चष्मा लाऊन
खिळा माठतो आणि स्वतःच विचारांच्या
क्रूसावर जातो. (ते पुन्हा विचारासाठीच)
'अमुक अमुक हे तमुक तमुक आहे काय ?'
(अमुक तमुक हे कुठल्याही गहनाचे प्रतिनिधी.)
आणि तरीही जेव्हा चिमटीतून निसटणाऱ्या
अचपळ पाऱ्यावर क्रांतिशास्त्रे जन्मतात
तेव्हा लिहिणारेच बनतात फॉल्स प्रॉफेट.
मधला कधीच 'बनविल्या' जात नाही.
(पुन्हा जन्मतो की बनतो हा वादच.)

*

मागाहून एखादी शेवरलेट आली म्हणजे
त्याच्या मनात अशा येते.
प्रॉव्हिडंट फंडात आपणही मोटार घेऊ.
पण बनीचे लग्न व्हायचे असते.
अशोक यंदा पोष्टग्रॅज्युएशनला जाणार असतो.
कुटुंबाच्या कॅंसरचे ऑपरेशन.
एक ना हजार. (पुन्हा रुपयाचे अवमूल्यन)
रस्त्यात चपलेचा अंगठा तुटला म्हणजे
त्या हातात घेऊन चालणे त्याला बरे दिसत नाही,
भोंग्याच्या आवाजावर धावणाऱ्या मजुराप्रमाणे.
असा हा (बीच मे मेरा...)

*

हजार माणसांचा जुडगा बांधला म्हणजे
कुणा एकाकडेच न पाहता तो शिव्या देऊ शकतो.
(भ्रष्टाचारी–सत्तापिपासु ब्लॅकमार्केटियर अशा अर्थाच्या.)
पण जुडग्यातील एकेकटं नाना, काका,.बाबा,
तात्या (हे सर्वसाहेब)
त्याच्या दृष्टीने कुणी उदार, कुणी त्यागमूर्ती, कुणी
देशभक्त असे असतात.
ही विसंगती त्याला बोचत नाही.

*

वर्तनादर्शाचे एक पुस्तक असते.
त्यातील पाने चाळायची असली म्हणजे
त्यावर त्याला शिडी लाऊन चढावे लागते.
मग तो निर्धोकपणे सनावळ्या पाहू शकतो
(वधस्तंभ, चाकू, रिव्हॉल्वर आणि त्या त्या
मयतांची संगतवार नावे आणि पंचनामे.)
तरी त्याला भावाकुल होऊन चालत नाही.
तसा त्याला शापच आहे.
पुन्हा उःशापावर त्याचा विश्वास नाही.
(बायको गणपतीला गेली तर काही बिघडत नाही.
तिचे आणि आपले खाते कॉमन म्हणून.)

*

डार्विन म्हणाला होता
त्या पुस्तकात माकडांच्याच श्रेष्ठ पूर्वजांची नावे असतात.
पण मधल्याच्या मते
माणसेच मरून या पुस्तकात देव बनून येतात.
(हा त्याने केलेला बावीस कॅरेट मध्य.)
त्याला भूक लागली म्हणजे
(त्याला भूकही लागते)
तो आपल्या मुलाच्या शोधात असतो.
(पुस्तकात यालाच ईश्वराचा शोध म्हणतात.)
पण गर्दीत बहुधा
त्याचा मुलगा त्याला सापडत नाही
मग तो मुलासाठी नैवेद्य अलग काढून ठेऊ शकतो.
(आणि खरे म्हणजे मग शास्त्रार्थ करावा लागत नाही.)

—वामन इंगळे

निळी लाट ही

निळी लाट ही कशास येते
इंद्रधनूचे स्वप्न घेउनी
किनारवेडी ओढ लागते
रोज अशी का जगावेगळी ।

इथे कोरडे जीवन सारे
तिला न का हे कळून येते
उगा जिरावे इथे येउनी
उगा वाटते उरी फुटावे ।

निळी लाट ही अशीच येते
अशीच येइन सांगुन जाते
निःशब्दाच्या खडकावरती
शब्दरूप ही सतार गाते ।

—शरद वाघ

ध्यास

असा तुझा ध्यास
अवेळीच यावा
घट्ट पानामधे
पारवा मिटावा

असा तुझा ध्यास
मऊ पिसापरी
अंगणात झिम्मा
सरी वरी सरी

असा तुझा ध्यास
थंड थंड वारा
यमुनेच्या काठी
तुटलेला तारा

असा तुझा ध्यास
गाठोडं चिंधीचे
पिंजून पिंजून
पक्के बांधायाचे

—मधुकर जामकर

त्रिवश

नक्षत्रांना ओंजळीनं पिऊन,
निळ्या नभांचं रांजण मी रितं करू शकतो;
नि सूर्यगोलाला काखेत कवळून,
साऱ्या भूमंडळाला फुटबॉलसारखं उंचच उंच
उडवू शकतो...
सप्तसिंधूंच्या गर्भाला चिरून
रत्नांच्या मुंडावळीनं क्षितिजाचं भाळ मढवू शकतो !
दिक्कोनाच्या माजोऱ्या गवाक्षातून बघणाऱ्या,
स्वर्गांगनेचा लहरी पदरही ओढू शकतो,
व हिमाद्रीच्या केसांची गाठ बांधून,
उत्तरध्रुवाच्या पल्याड त्याला भिरकवू शकतो...
माणसांच्या फुप्फुसात,
माकडांचं आतडं बसवू शकतो...
नि लाकडांच्या कडांना विजेचे कोंब फोडू शकतो
पण हाय !...
माझ्या या पापणीवर रेंगाळणारा,
द्वंद्वाचा हा लहानसा फुगा,
मी फोडू शकत नाही....
आणि तुझ्या डोळ्यातील नितांत शांत
निरांजन मला पिता येत नाहीत...
व या व्यथांना तुझ्या स्निग्ध
अधारावरचं मंदमृदुल हसू वेचता येत नाही...

—बाळकृष्ण बन्नोरे

आवाहन

एकदा तुझ्या डोळ्यात वादळी
काजळी आभाळ दाटले होते
एकदा तुझ्या स्फोटक शब्दांना
विजांच्या ध्वनीने भारले होते.

एकदा तुझ्या गीतांच्या गतीत
सागरी थैमान गर्जत होते
एकदा तुझ्या दुर्दम्य चालीत
जमीन अस्मान वाकत होते.

एकदा तुझ्या अजस्र बाहूत
क्षितिज थिटे भासत होते
एकदा तुझ्या अथांग प्राणात
अनंतावकाश स्फुरत होते.

एकदा असा तू उद्गाता होतास
येथील अवघ्या अस्तित्व-गर्भाचा
आज असा तू कसा निपचित
आलिप्त साक्षी महाप्रलयाचा ?

——गुणाकर देशपांडे

वैभव——

(दौलताबादच्या किल्ल्यास उद्देशून)

जेव्हा बुरुज ढासळू लागतात
अन् तटबंदी शिथिल होत जाते
निर्मनुष्य होत जातात
आतले वाडे...
पुरातन वृक्ष राखण करीत असतात,
इमानदारीने......
गतवैभवाचे स्तोत्र गात
सोबत वारा घेऊन
एकटे अंधारात...भयाण एकान्तात
सांज होताच अवकाशात
काळोखाची कठोर नजर फिरत जाते
दालनादालनातून
आपला दरारा दाखवित,
तेव्हा कुणिच नसते तेथे
इतिहास जमा झाले असते सारे वैभव.

* * *

तेव्हा दिवा जळत असतो मात्र
कोपऱ्यात ! संतांच्या समाधीजवळ
तेवत स्निग्ध प्रकाश
सोज्वळतेची प्रभा उजळित
अचेतनातून चेतना देत
अचेतनाला जाग आणित.

——श्रीपाद गंगाधर कावळे

लोकवाङ्मयाचं एक उपेक्षित लेणं...!

दंढार

—अविनाश वरोकर

छम्···छम्···छम्! घुंगुरांचा आवाज··· संगीताचा साज···शृंगार रसराज···ढोलकीवरची थाप··· डफावरची थाप··· कमरपटचाची ढंगदार कमान···. कमरेची किंचित पण कलात्मक लचक··· कंचुकीची कसदार गाठ··· नीटनेटके लावूनही निसटलेले चारदोन केस··· अधरपुष्प परागातील परिमल उधळीत निथळणारे लावणीचे लकवदार स्वर, अन् यातून ध्वनित होणारा लोकवाङमयाचा अभिजात नूर···दुसरं नाव 'दंढार'. विदर्भाच्या कोन्याकोन्यातून वास्तव्य असलेलं लोकसाहित्याचं एक अभिजात, अक्षर पण आज उपेक्षित लेणं···

पितृमोक्ष अमावस्या येते.—पितृपूजा होते··· विगत आत्माविषयी श्रद्धा व्यक्त केली जाते. नामस्मरण केलं जातं. जुनं ते सोनं···तन, मन, धन अर्पण करून पुजल्या जातं···गोड धोड खाऊन साऱ्यांची पोटं–किंचित वर आलेली असतात··· अन् मग सायंकाळी गावातील रसिक पोरांपासून थोरांपर्यंत··· एकत्र जमतात... एकाजवळ ढोलक, दुसऱ्याजवळ डफ, तिसऱ्याजवळ तुणतुणं... चवथ्याजवळ मंजिरा... पाचव्याजवळ पंचारती,... सहाव्याजवळ श्रीफळ... अन् सातव्याच्या पायात घुंगरू...फडाचा एक मर्यादित आकार...!

ढोलकीवर बोटं फिरू लागतात... डफावर थाप पडते. तुणतुण्याच्या नाजूक अन् साजूक तारा छेडल्या जातात. मंजिऱ्यातून मोहक ध्वनी बाहेर पडतो. लावणीचे नखरेल स्वर ओठांवर तरळू लागतात. जिलकरी जिल ओढतात. पायाला चोळ बांधून नाचणाऱ्या पोराचे पाय आवर्त अन् प्रत्यावर्तात आकार घेऊ लागतात. आशय शोधू लागतात. सर्वांचा संमिश्र ध्वनी कानाला गोड वाटतो. टाळ रोवला जातो. पूजा केली जाते. श्रीफळ फोडलं जातं. तोंड गोड होतं. पंचारतीच्या प्रकाशात शपथ घेतली जाते....

हे श्रीकृष्णा प्रभू बालकांना आधार ।
दिवाळीला ठोकुनी पाल करू दंढार ॥

दिवाळीला दंढार करण्याची ही अलिखित शपथ. दिवाळी आणि दंढार, दोहोंचा संबंधही फारच जवळचा अन् परस्परपूरक. पहिल्याशिवाय दुसऱ्याला स्थान नाही. अन् दुसऱ्याशिवाय पहिल्यास मान नाही. दोनही आनंदोत्सव. वाणी आणि लेखणीचा यात फारसा संबंध नाही. साक्षर, निरक्षर सर्वत्र यात भाग घेतात. साक्षरापेक्षा निरक्षर दंढारीचे जास्त शौकीन. पितृमोक्ष अमावास्या आली की खेडचापाडचातून दंडारीचे वेध लागतात. आठ वर्षांच्या पोरापासून तर ऐंशी वर्षांच्या आजोबापर्यंत सर्वांना आतुरता...ओढ...उत्कंठा सारखीच..हा टाळपूजनाचा कार्यक्रम म्हणजे दंढारीच्या तालमीचा मुहूर्त. या दिवसापासून विदर्भाच्या अंतरंगात खेडचापाडचांतून तालमी सुरू होतात. लावणीचे मस्त स्वर आसमंतात तरळू लागतात. शेतावरच्या गवतीगोठचांत, गावातील मोडक्या घरात, सार्वजनिक मठात किंवा कोणाच्या खाजगी घरात तब्बल महिना-

मर नियमित तालमी सुरू असतात. लावण्या, झडत्या, पोवाडे, झगडे, इत्यादी काव्यप्रकार अत्यंत ग्रामीण स्वरूपात हाताळले जातात. गणगौळणी अन् लावण्यांनी सभोवतालचं संपूर्ण वातावरण स्वरमय होऊन जातं. लावणी आणि गणगौळणी मराठी काव्यातलं एक उपेक्षित शिल्प आहे. रसराज शृंगाराच्या निवासाकरिता निर्माण केलेलं 'लावणी' हे एक अप्रतिम सुंदर अन् मस्त दालन आहे. विषयाची विविधता आणि कल्पनांची विपुलता यातही आहेच. विषयावरोवरच विरक्तीही आहेच. विशेष रूपापासून तर विश्वरूपापर्यंतच्या विषयांचा परामर्ष अत्यंत ग्रामीण अन् साध्या पण परिणामकारकरीत्या यातही घेतला जातो. चिलिया बाळापासून तर हरिश्चंद्र—तारामतीच्या वाटचाला आलेल्या विजनवासातील अमाप आसवांचा अन् विकल व्यथांचा विमर्ष यातही घेतला जातो. रायगडावरच्या राज्याभिषेकापासून तर कालपरवापर्यंतच्या चीनपाकच्या आक्रमणापर्यंतचे सर्व विषय विविध स्वरूपात कधी प्रत्यक्ष कडाम्नी सोंग काढून तर कधी लावणीचे स्वर लावून आकर्षक रीतीने समोर येतात. मोहनाबटाऊपासून तर 'बुगडी माझी पडली ग' पर्यंतचा शृंगार अगदी ऐकल्यावरोवर विषयसंवेदना सर्वांगातून संचार करीत इतक्या उठावदार रीतीनं प्रदर्शित केला जातो. नाटकाला लागू होणारं 'श्रुतिमनोहर काव्य आणि नयनमनोहर दृश्य' हे विधान येथेही शतप्रतिशत लागू होण्यात प्रत्यवाय असू नये, असं मला प्रामाणिकपणे वाटतं.

पितृमोक्ष अमावास्येपासून तर दिवाळीपर्यंत विदर्भाचं ग्रामीण अंतरंग विद्युन्मय होऊन जातं. वऱ्हाडातील वर्कीचा कण् न कण् बोलका होतो. घरादारात अन् शिवारात दंढार हाच एक विषय. लावणी, गणगौळणी, झगडे हेच एकमेव काव्य. ढोलक, डफ, तुणतुणं व मंजिरा ही वाद्ये अन् यातून रुळणारा गोड अन् बोलका आवाज. यांच्यासमोर इतर सर्व फिकं. कुणाशी जरी वोललं तरी विषय हाच. स्वर हेच. वाद्ये हीच. रात्रभर तालमी चालतात. अन् दिवसभर डवरे, डुंडे, निंदण, अन् भूईमूग काढणे. पण डवरावर अन् निंदणावर गाणी मात्र हीच. शिवारात तालीम असंच म्हणाना! दिवसामागं दिवस जातात. रात्रीमागून रात्री. सासुरवासिनी सुना 'दंढार, पाहण्यासाठी मोठ्या आतुरतेनं 'त्यांना' घेऊन आपल्या माहेरी येतात. अन् अखेर दिवाळी येते...!

प्रभाकराची दिव्य लावणी
लावण्याची अखंड झरणी
शृंगाराची मस्त पेरणी
घुमते कंठोकंठो...मंगलमाय मराठी...!

या मराठी मायचं लावणीच्या रूपात रंगणारं शृंगारिक रूपडं घेऊन दिवाळी आली...दिवाळी आली. हा एकच जयघोष. आनंदाला उधाण येतं.

तांबेवरडीच्या पंखात एखाद्या पिलाप्रमाणे दडून बसलेलं माझं चार हजार वस्तीचं लहानसं खेडं गाव.! पारडसिंगा त्याचं नाव. गाव लहान पण कीर्ती महान्. सर्वच बाबतीत पुढं. अगदी जवळ जवळ जाल तरी वेटं दिसायचं नाही. अन् मग एकदम दिसायचं. नवीन माणसानं सहज उद्‌गार काढावेत.. "अरे..वेटं भलतच चलाख दिसते. आपल्याला वाटलं, अजून खूव दूर आहे." नाटकातील उत्कंठा आणि विस्मय म्हणतात तो हाच. हे नाटयतंत्र आत्मसात केल्यामुळेच की काय आमच्या गावात नाटकाचा अन् दंढारीचाच शौक फार. पुऱ्या वऱ्हाडात या बाबतीत याचाच पहिला नंबर. हा नंबर या क्षणापर्यंत यानं खाली जाऊ दिला नाही. ही त्याची जोपासना त्यांच्या कलासक्तीची भरपूर साक्ष आहे. लोकसाहित्य–दर्दी अभ्यासक आणि अधिकारी प्रा. वामन कृष्ण चोरघडे आणि श्री. वामन इंगळे याच परिसरात वाढलेले अन् वावरलेले. कै. श्री. गणपतराव इंगळे यांच्या ढोलकीच्या निनादाला अन् फक्कड आवाजाला आजही हा परिसर पारखा झाला नाही, हे मोठ्या अभिमानाने नमूद करावेसे वाटते. थाटुरवाड्यास भारत सेवक समाजाचा कॅंप असताना प्रा. वामनराव चोरघडे जवळ जवळ महिना दीड महिना याच परिसरात होते. बोलता बोलता ते मजजवळ बोलले ..'वरोकर, तुमचं गाव भैया! दंडारीचं भलतचं शौकीन दिसते.' हा त्यांचा सहजगत्या बाहेर पडलेला अभिप्राय आमच्या गावाचं अंतरंग दाखविण्यास अपुरा पडू नये. क्षेत्रफळ

लहान पण दिवाळीला दंढारी तीन . . . एक दिवाण-वाड्यात. . . दुसरी . . . बाजार चौकात आणि तिसरी विठ्ठल रखुमाईच्या मंदिराच्या पटांगणात . . . 'पट्ट्याचानं ठोकला पाल केली दंढार' म्हणणारे पठ्ठे पाल ठोकतात. असा . तसा नाही तर शहरातल्या पेंडॉलनं हार पत्करावी असा. कारण सभोतालच्या बारा कोसा-वरचे शौकीन बसावयास पाहिजे ना ? चार हजारांच्या गावात पंधरा हजार लोक मावणार कसे ? तरीपण या सर्वांना सामावून घेण्याची ताकद त्या पालात त्या वेळी कोठून येते कोणास ठाऊक. पण येते नक्की. दिवाळीचा पाडवा दंढारीचा दिवस. आल्यागेल्याची वर्दळ अन् पाहुण्यांचा सुकाळ. घरोघरी पुरणाची पोळी. दुसरा कोरडा सण नाही. पोटभर जेवले पालात जाऊन बसले. उठायचं नाव नाही. जवळजवळ रात्री दहाच्या सुमारास दंढार मारुतीजवळ जावयास निघते. पहिला मान मारुतीचा. ढोलकीवर बोटं, डफावर थाप, घुंगरांचा नाद, अधरावर साद अन् प्रतिसाद...नाच्या तालावर नाचतो. हातात लाकडी टाळ घेऊन नाचणारी पोरं बारा. सहा पुरुषवेषात तर सहा स्त्रीवेषात, या टाळांतून ध्वनित होणारा ध्वनी फारच मनोवेधक असतो. (यालाच विनोदानं आम्ही 'बारा बैलांची पाथ' असंही म्हणतो.) ओठावर स्वर...

हातीं सेंदुराची वाटी चला जाऊ मारुतीच्या भेटी
हातीं सेंदुराचे पान अंजनीसुता पहिला मान...
किंवा
टाळचा टुळचांची दंढार..। देवावरी सर्व भार...।

अशा प्रकारची गाणी (दंढारीच्या भाषेत उडान) म्हणत दंढार मारुतीजवळ जाते. पूजा होते. प्रसाद वाटला जातो. नंतर दंढार पालात येते. प्रेक्षकांच्या आनंदाला अन् सोंगाड्यांच्या उत्साहाला उधाण येतं. प्रथम गणेशस्तवन होतं. सूत्रधार म्हणजे श्रीकृष्ण "या रंगसभेच्या ठायी" हा शब्दप्रयोग करतो. याला फार अर्थ आहे. दंढारीला आध्यात्मिक आणि पौराणिक आधार आहे. 'रंगसभा' म्हणजे हे विश्व ब्रह्मदेवाने अगोदरच निर्माण केले. कृष्ण हा विष्णूचा अवतार. चित्रकार! तो या जगात बहुविध रंग भरतो. आकर्षक स्वरूप देतो. या विश्वाचं मूर्त स्वरूप म्हणजे 'दढार' जे समाजात ते दंढारीत. ज्याप्रमाणे समाजाचं चित्र नाटकात रेखाटलेलं असतं...त्याप्रमाणे समाजाचं चित्र दंढारीत दिसतं, हा विश्वाचा खेळ मोडण्यासाठी श्रीकृष्ण महेशाला पाचरण करतो. यालाच आपण 'लय' म्हणतो. म्हणजेच विश्वाची तीन रूपं . . उत्पत्ती . . स्थिती . . . आणि 'लय' दंढारीत दृढ आहेत. या रूपाचं प्रतिबिंब दंढारीत पडतं. परब्रह्माची तीन रूपं ब्रह्मा . . . विष्णु . . . महेश आपल्यास या दंढारीच्या स्वरूपात वावरताना दिसतात. दंढारीत नवरस व दहावा भक्ती म्हणजेच प्रेमाचे उत्कट स्वरूप याचेही दर्शन होतेच रसराज शृंगार आणि भक्ती यांच्या सीमा अस्पष्ट होतात. गौळणी एकनाथाने लिहिल्या. त्या गौळणी दंढारीतही आणि भजनातही मनसोक्त आळविल्या जातात.

म्हणजेच दंढारीला पौराणिक, धार्मिक आणि आध्या-त्मिक आधार भरपूर आहे, हे निर्विवाद सत्य आहे. त्यातून नाटचकलेचं मूळ स्वरूप...थोडं ओबडधोबड का होईना...पण ते दंढारीत आहे हे निश्चित. नाट-कात जे नवरसदर्शन होतं...त्या नवही रसांचं दर्शन दंढारीतही होतं. पण नाटचकला ही जशी . . . समाज राजाश्रय . . . कलावंत . . . व रसिक . . . या सर्वांकडून जोपासल्या गेली, तिच्या विकासासाठी जसे हेतुपुरःसर प्रयत्न झालेत तसे दंढारीसाठी झाले नाहीत. आजही होत नाहीत व पुढे होतील किंवा नाही याबद्दल मी आज तरी साशंक आहे. हीच दंढारीची खरी शोकांतिका आहे. एक शब्दातीत व्यथा आहे.

राधाकृष्णाच्या रासक्रीडेचं रंगीन चित्र असलेला भव्य दर्शनी पडदा वर वर जातो. टाळावर टाळ पडू लागतात, समूहनृत्य सुरू होतं. हे दृश्य फारच मनो-वेधक असतं. अवघ्या दहा मिनिटातच सूत्रधार प्रवेश करतो नाटकाला जशी नांदी आणि सूत्रधार त्याच-प्रमाणे दंढारीतही असतेच. सूत्रधार . . . जय . . . जय रामचंद्र रघुवीर . . . जय जय रामचंद्र रघुवीर . . हे स्तवन करीतच प्रवेश करतो. हे स्तवन सुरू अस-तानाच एक 'विदूषक' डोक्यावर लिंबाच्या फांद्या बांधून वेड्यावाकड्या उड्या मारीत प्रवेश करतो. विषदूकाची विचित्र भूमिका वठविणारा . . . 'फकिऱ्या कुंमार' किंवा कधी कधी 'खसाऱ्याचा बाज्या . . .'

प्रेक्षकांची हसता हसता पुरेवाट करतो. यावेळी 'सूत्रधार आणि विदूषक' यांच्यामधील संवाद येथे देणे जास्त सयुक्तिक होईल.

सूत्रधार— (विदूषकास विचारतो) . . . 'मी येथे या रंगसभेच्या ठायी गणेशस्तवन करीत असता ह्या वेड्यावाकड्या उड्या मारणारा तू कोण ? तुझे नाव काय ?

विदूषक—(विकट हास्य करीत) अरे बाबा . . . मी माझे नाव . . . आताच घाटावर रवाना करून आलो आहे.

सूत्रधार—अरे बाबा तसे नव्हे . . . तुझ्या या देहाला कोणत्या नावाने ओळखतात ?

विदूषक—तुम्ही लोक दिल्लीचे छाकटे . . . अन् पुण्याचे मामटे . . . आमचे नाव विचारून घेता व आपले नाव सांगत नाही. आपले नाव सांगा मग गोष्टी होतील.

सूत्रधार--बरं. तू येथे उभा का ?

विदूषक--सभेची शोभा, हळदीचा गाभा, पाऊस आला नवा, म्हणून मी येथे उभा रे बाबा.

सूत्रधार--मला सूत्रधार म्हणतात . . .

विदूषक--सू . . . ले मू . . . लावला तर काय होते? (हास्य करीत).

सूत्रधार--अरे बाबा . . . माझे नाव 'भागवत' आहे.

विदूषक --भा . . . नाम . . . भाकरी . . . ग . . . नाम . . . गव्हाच्या . . . आणि तुपाविना नाही गिळा-यच्या . . . असे तुम्ही भागवत. (पुन्हा हास्य)

विदूषक—कैलासीच्या पलिकडे कोणता शेख !

सूत्रधार--शालिवाहन शेख !

विदूषक--त्याच्याच पलीकडचा मी 'विदूषक'.

(विदूषक सूत्रधाराला गणेशस्तवन सुरू ठेवण्यास सांगतो).

सूत्रधार— हे गजानना अगाध तव करणी . . . हे गजानना अगाध तव करणी

(गणेश प्रसन्न होतो. व सूत्रधारास 'शारदा स्तवन' करावयास सांगतो. नंतर 'शारदा' प्रगट होते.)

गणपती राजा . . .
आली रंगणी सारजा . . .
आली व आली सारजाबाई . . .
आली व आली सारजाबाई . . .
सारजा ब्रम्ह्याची कुवरी . . .
आली ती मोरावर बसुनी—. . .
गळ्यामध्ये चंद्रहार घालुनी . . .
काय मांगू रे भोळ्या देवा ?
चंद्रसूर्याच्या सोळा कळा . . .
एक कळी मजला द्यावी . . .
जा देल्ली सारजाबाई . . .
सारजा गेली कैलासपुरी !

या धार्मिक व पौराणिक सोंगांनंतर दंढारीला खरी रंगत चढते. इतर रसांचा आविष्कार होऊ लागतो. नाच्याच्या नाचाला आणखी बहर येऊ लागतो. ही घरगुती स्वरूपाची ओळख देणारी एक लावणी त्या दृष्टीने उद्‌बोधक ठरावी.

. . . बाई माझा ईन्हाई आला . . .
थाटानं सैपाक केला
पुरणाची पोळी, अनरसे, भजे
बुंदीचा लाडू पात्रावर साजे .
सीरा खूब गोड झाला
बाई माझा ईन्हाई आला . . . !
भेंडी, गवार, चवळ्याच्या शेंगा . . .
काही लागन तर तोंडानं मांगा
ऐकू येत नाही मला
बाई माझा ईन्हाई आला . . . !
सैपाक केला मी बाणीनं
जेवा ईन्हाई आनंदानं . . .
सण दिवाळीचा आला
बाई माझा ईन्हाई आला !
वरण, भात, भाजी, ताकाची कढी
पोथीच्या पानाची केली मी वडी
लवकर बसा भोजनाला
बाई माझा ईन्हाई आला . . . !

दुसरा एक प्रसंग . . . म्हातारा शेतात जातो. म्हातारीला मागाहून शिदोरी आणावयास सांगतो . . . म्हातारी शिदोरी घेऊन जाते.

स्वयंपाक केला वा बुढीनं
भाकर गेली ती घेऊन . . .
बुढा जेवण करतो नंतर . !
बुढ्याचे दादा जेवण झाले . . .
अन् डलिसा तंबाखू मागे बुढीले . . .
बुढी किचकावून बोले हो
कालपासून नस नाही मले

त्याचप्रमाणे 'करुण रसाचे' उदाहरण म्हणून आपणास आणखी एक उडान समोर ठेवता येईल

इंद्रजित . . . पडला रणात
झाला अपघात . . . पुत्र रावणाचा . . !
मारला लक्षुमनाने वैरी रामाचा . . !

त्याचप्रमाणे शृंगारातून सौंदर्य कसे निर्माण केले जाते व चित्र कसे बोलके होते याचे एक उदाहरण

सुंदर गोरी . . . सुबक ठेंगणी
गळ्यामध्ये एकच दाणी
त्याच्यावरती मंगळसूत्र
लोंबत आहे तिच्या गळ्यात

याप्रमाणे सोंगामागून सोंगं येतात. काही 'लावणी' तर काही 'कडासणी' तर काही 'संभाषणी'. आजकाल फक्त संभाषणी सोंगांची संख्या बरीच कमी होत आहे. फक्त बोलण्याला अर्थ नाही, तर सोबत कृती हवी, हाच याचा एकमेव उद्देश असावा. याप्रमाणे पहिल्या दिवशी रात्री १० वाजता सुरू झालेली 'दंढार' दुसऱ्या दिवशी सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालते. दिवसभर काही फड गावातही फिरतात. सारे गाव गजबजलेले असते. फडातील प्रमुख व्यक्तीच्या नावाने फड ओळखला जातो. उदा. महादेव गणोरकरचा फड, वसंताचा फड, सदाशिवचा फड याप्रमाणे . . . ! जवळ जवळ पूर्ण गावात पाउणशे तरी फड असतातच.

नंतर शेवटी दुसरे दिवशी सायंकाळी सहा वाजता नंदीवर बसून श्रीभगवान शंकरजी येतात. सूत्रधार श्रीकृष्णाने मांडलेला हा दंढारीचा म्हणजेच विश्वाचा खेळ मोडण्याचे कार्य शंकराचे.

छाया रूपी भगवान आले महादेव चालून . .
ढवळ्या नंदीवर बसून . . . संगे पार्वती घेऊन . .
छायारूपी भगवान . . आले महादेव चालून! . .

शंकराची पूजा होते. शेवटी आरती होते. नारळ फोडला जातो. प्रसाद वाटला जातो आणि राधा–कृष्णाच्या रासक्रीडेचा भव्य दर्शनी पडदा पुन्हा खाली येतो. . . . . 'दंढार' संपते.

'दंढार' हे लोकवाङ्मयाचं...लोककलेचं...एक उपेक्षित लेणं आहे. एक अप्रतिम सुंदर पण आज उपेक्षित शिल्प आहे. भारतीय संस्कृतीचं प्रतिबिंब यात आहे. आजच्या नाटक वगैरे सारख्या प्रगत कलांचं मूळ दंढारीत आहे. म्हणून ही 'कला' 'कला' म्हणून जोपासल्या जावी. तिच्या विकासासाठी सहेतुक प्रयत्न करावयास हवा. इतर कलांना जी संधी दिल्या जाते ती 'दंढारी'लाही देण्यात यावी. खरा भारत खेड्यात आहे, असं आपण नेहमी म्हणतो अन् ऐकतो. मग खेड्यांतील जनतेच्या जीवनाशी अत्यंत जवळचा संबंध असलेल्या आणि त्यांच्या मनोरंजनाचं एकमेव साधन असलेल्या या 'दंढारीला' तिच्याच माहेरी हा सासुरवास का ? तिची उपेक्षा का ? इतर कलांवर भरमसाट पैसा खर्च करणारं आपलं रसिक महाराष्ट्र राज्य 'दंढारी'ला दूरची कला का मानते ? इतर कलांप्रमाणे तिला 'राजाश्रय' का नाही ? इतर कला अविरत, अविश्रांत आळविणारी आमची 'आकाशवाणी' दंढारीच्या बाबतीत इतकी अनुदार का ? 'दंढारी'सारख्या कला 'आकाशवाणी'वर ध्वनिक्षेपित का केल्या जात नाहीत ? उच्चस्तरीय कलावंत या बाबतीत उदासीन का ? इ० एक नव्हे हजारो प्रश्न, शंका आज माझ्या अंतःकरणात निर्माण होतात या शंकांचं निरसन व्हावं असं वाटतं. यावर सखोल चर्चा व्हावी. या कलेचं पुनरुज्जीवन होणे आवश्यक वाटते. या लेखाच्या निमित्ताने या विषयावर पुन्हा संशोधन होणे जरूर आहे. संशोधकांना, कलावंतांना, रसिकांना....हे एक आवाहन आहे.

आप्पा

—कुंदा पारसनीस

माणसाचा मेंदू मोठा विलक्षण ! सगळ्याची नोंद करून ठेवतो म्हणतात. वाटतं, हे क्षण गेले, त्यांची स्मृतीही निसटणारच. पण मेंदूच्या-मनाच्या कप्प्यामधे त्यांचे फॉसिल्स् (fossils) लावून ठेवलेले असतात. कधीतरी आपण ते फॉसिल्स् निरखतो आणि मग स्मृतींच्या गाळीव अर्कामधून त्या क्षणांचं शिल्प आपल्या नजरेसमोर उभं करतो.

आज आप्पा नाहीत तरीदेखील ते आहेत. हे असे पटकन् नजरेसमोर उभे राहतात. वाटतं, कुठच्याही क्षणी आता ते मुलांना हाकारीत येतील, उपरण्यात बांधलेला जिन्नस जमिनीवर ओतीत म्हणतील, " या लौकर या, बघा काय आणलंय ते." हरभरा, मुड्-मुगाच्या शेंगा, मटार, पेरू, आंबे त्या त्या हंगामात त्यांनी हटकून आणायचेच, सबंध ऊस दातांनी सोलून खात ते आपल्या नातवंडांना बजावायचे, " हा असा ऊस खायचा असतो, समजलात ? त्या तुझ्या म्हाताऱ्या बापासारखा करवे करून नाही खायचा."

मुलीबाळी लहानथोर मंडळी कोंडाळं करून बसली आहेत, गप्पागोष्टी हास्यविनोद चालला आहे, पिपातल्या शेंगा टोपल्या भरभरून फस्त होत आहेत हे दृश्य त्यांना फार सुखवायचे. पूर्वीची कुटुंबं गेली म्हणून खोल कुठंतरी सळणारा दुःखाचा काटा बोथट होत असावा.

स्वतःच्याच मुलांना म्हातारं म्हणून चेष्टा करण्याचा त्यांनी हक्कच मिळविला होता. प्रकृती अशी टणक नि चिवट की पेन्शनीत जाऊन तीस वर्षे झालीत हे कुणाला खरंच वाटू नये ! रोज पहाटे बागेत झाड-लोट करायची, बंबासाठी ढलप्या फोडायच्या, सकाळ संध्याकाळ फिरणं, अगदी वाघ पाठीमागे लागल्यासारखे भराभर चालायचे ते.

" मनुष्याला व्यायाम हा पाहिजेच. व्हेरी इसेन्शियल (हे असे अधून मधून इंग्रजी बोलण्याचे भारी वेड) नियमित आहार, नियमित झोप आणि नियमित व्यायाम, म्हणजे काही तक्रार उरत नाही. आता कधी नाटक, गाणं असलं तर--तो भाग निराळा ! पण तात्पर्य काय की नियमितपणा हवा. आता आमची डायजेस्टिव सिस्टिम कशी शार्प आहे ! इतर म्हाताऱ्यांच्या असतात काही तक्रारी. मित आणि शिस्त ही दोन तत्त्व तू अगदी ध्यानात ठेव."

आप्पा हे अस्से सारखे 'ध्यानात ठेव', 'लक्षात ठेव' असं बजावून सांगत असत. वेळ आणि शिस्त याबाबत अगदी कमालीचा काटेकोरपणा. "तुम्ही हल्लीची मुलं म्हणजे एकदम कंडम, यूसलेस ! टाईम-सेन्स नाही, मॅनर्स नाहीत--बिलकूल नेटिव ! तुम्हाला प्रत्येकाला वर्ष दोन वर्षं इंग्लंडात नाहीतर जर्मनीत नेऊन ठेवलं पाहिजे. कसा तो इंग्रज कर्तबगार ! उगाच नाही तुमच्यावर राज्य केलंन् ! ह्या तुमच्या गबाळग्रंथी कारभारामुळं सगळा बट्याबोळ होतो. समजलात ?"

आप्पांना गबाळेपणा बिलकूल रुचला नाही कधी. कपडे स्वच्छ, व्यवस्थित. चपला, बूट, पंपशू, कॅनव्हास शूज, रायडिंग बूट काय काय तरी प्रकार होते त्यांच्याजवळ. "करू दे पयाशन. माणसानं कसं नीटनेटकं असावं. विशेषतः मुलींनी. आपलं त्या

अनुक्रमणिका

हिच्या मुलीसारखं कंट्री काम नाही उपेगाचं !— रेडकू आहे नुस्तं ! हां. प्याशन हवी. पण पदराचा पत्त्या नाही. तू इथं पुण्यात, तर पदर पार तिकडे दिल्लीत ! असलं नको ! "

एका दिवाळीला झाडून सारे नातेवाईक गोळा झाले होते. आप्पांचा ऊर कसा भरून आला. " कसलं ते टिनपाट घरातनी राहणं ! साताऱ्याचा आपला वाडा कसा आहे ! पण हे पोट मोठ वाईट आहे बरं ! तू लक्षात ठेव. नोकरीसाठी जावं लागतं त्यांना, त्याला आता मी तरी काय करू ? " पण सगळे आले. पूर्वीच्या दिवसांना लपेटून आले. कुणाची तरी गाडी उशीरा आली. त्यावेळी आप्पांच्या आतबाहेर येरझाऱ्या चालू होत्या. सतरा वेळा जाकिटाच्या खिशातले घड्याळ काढून बघत होते. " ओ माय गॉड ! इतके वाजले का ? गाडीचा करेक्ट टाईम काय ? छ्याः, छ्याः ! हा लेकाचा कधी वेळेवर आलाय का ते तू मला सांग "—" अहो पण आप्पा, गाडी लेट झाली त्याला तो काय करणार ? "—"ते काही तू मला सांगू नकोस! नेहमीचंच असं—अगदी यूसलेस ! " मंडळी गाडीवरून आली आणि आनंदाने उत्साहाने स्वतः सामान उचलायला आप्पा धावले. पण जरावेळाने मात्र " आलात ? मारा आता गप्पा, चालू द्या तुमचं. " अशा थाटात आपल्या खोलीमध्ये पुस्तक वाचायला निघून गेले. हे असं आपुलकी आणि अलिप्तता याचं मिश्रण—म्हटलं तर सगळ्यात रस, म्हटलं तर निर्विकार. छोकरीने दिलेलं कॅडबरी चवीनं चघळीत म्हणाले, " हे-हे काय आहे ते बरं लागतं की. (नाव त्यांना चांगलं माहीत होतं) पाहू बरं आणखी. दे एखादं. " पण जेवणाच्या वेळी अत्यंत आवडती पुरणपोळीही एकापेक्षा अधिक नाही. धाकटा मुलगा आग्रह करायला लागला. " खा हो आप्पा, कधी नव्हतचे आपण सगळे जमलो आहोत. अर्धी पोळी घ्या जास्ती. "

आप्पा विनोदी गंभीरपणाने म्हणाले, " मित्रा, आता तू मोठा झालास, बरोबरीच्या मुलाला मित्र म्हणायचं—तर मित्रा, तू मला काही सांगू नकोस, माझं मला कळतं. एक पुरणपोळी म्हणजे रेट झाली. मला शिकवतोय् ! लॉर्ड फॉकलंड आहेस नुसता तू ! "

कुणी शिष्टपणा किंवा आकडूपणा करायला लागला तर आप्पांची ही पदवी ठरलेली, लॉर्ड फॉकलंड ! लॉर्ड फॉकलंड नंबर वन, लॉर्ड फॉकलड नंबर टू अशी वर्गवारीही असायची त्यांची ! सुना घराकडे दुर्लक्ष करतात असं वाटलं तर म्हणायचे, " करा, समाजकार्य करा, नि घराची वेटिंगरूम करा. मंडळात जा, भजनी मंडळं स्थापा नि आळंदीत बसा ' येग ये ग विठाबाई ! ये ग ये ग विठाबाई !' ही विठाबाई म्हणजे सैंपाकीण बरं ! तिच्याशिवाय कसं निभणार यांचं ? "

पण हे सारं बोलणं विनोदाचं. आपल्या वेळपेक्षा वेगळ्या असलेल्या ह्या जीवनाला ते समजून घेत असत, त्यामधे सामावण्याचा यत्न हा चिरतरुण म्हातारा नेहमी करीत असे.

एकटेपणाच्या आयुष्याला कंटाळून कधी कधी म्हणायचे, " आमची बायको गेली पुढे. पण यम आम्हाला मात्र म्हणतोय–' म्हातारपणची पथ्यं सांभाळशील (आप्पांची म्हातारपणाची पथ्यं म्हणजे म्हाताऱ्या माणसांनी कसं वागावं, बोलावं, राहावं याची यादी), मुलांची बोलणी खाशील, नातवंडाच्या लाथा खाशील तेव्हा तुला स्वर्गात जागा मिळेल. तेव्हा करता काय. आम्ही आमच्या नाटकातल्या संवादाच्या क्यू (cue)ची वाट पाहतोय्. यमराजाची पहिली घंटा ऐकल्यावर रागालोभाचा पसारा आवरलाय् आणि आता मी एंट्रीची वाट पाहात बसलोय्. "

आपल्या मृत्युसंबंधी नाटकाच्या भाषेतच त्यांनी विनोदानं म्हणावं हे साजेसंच आहे. कारण आप्पांना नाटक–गाण्याचा विलक्षण नाद. आयुष्यभर त्यांनी सातसुरांची उधळण केली. मंद्र, तार, कोमल, तीव्र–विविध प्रकारच्या सुरांनी ते आयुष्य खेळले. रात्रीच्या रात्री रंगायच्या. आप्पा नुसते रसिकच नव्हते तर दर्दी जाणकारही होते. खास मैफलीमध्ये स्वतः तवला घेऊन बसत. खूप शौक केला—इथे माफक प्रमाण नाही— पण अगदी स्वच्छ, उजळ माथ्याने. इतरांसारखे चोरून नायकिणीच्या माड्या ते कधीच चढले नाहीत. खोटेपणाचा, दांभिकपणाचा स्पर्शसुद्धा त्यांना नव्हता. "आम्हाला गाणं आवडतं त्यात वाईट काय ? " असा ठोक सवाल. त्यातून गजाननबुवा, त्यांचे वडील अनंत

मनोहर कोल्हटकर अशी मंडळी संगतीला ! दोन्ही हातांनी भरभरून त्यांनी आनंद घेतला आणि दिला. मैफलीतली मजा आप्पांबरोबरच लुटावी ! नाटकं बघताना रसास्वाद घ्यायला आप्पांचीच संगत हवी ! एवढंच काय, नाटकाच्या तालमींना आप्पांशिवाय रंग भरत नसे — 'बाळकोबा (म्हणजे आप्पा) आल्याशिवाय काही खरं नाही बुवा !' अंबूजींच्या सातारकर स्त्री नाटक मंडळीत तर आप्पांना एक खास स्थान होते, मानाचे.

नव्वदीला आले तरी नवी जुनी नाटके बघतील, नव्याचं चांगलं वाटल्यास कौतुक करीत पण शेरा मात्र मिळायचा, "बरी नाटकं गेलीत ! ही आताची तुमची टिनपाट नाटकं–त्यांत काही दम नाही." गाण्याच्या बैठकीला कुणी नेलं तर रात्र रंगून जागवायची त्यांची तयारी !

एवढे वय झाले तरी त्यांचा उत्साह अपार ! लोकांना वाटायचं यांचं देव देव फार असेल, पण आप्पांची पूजा पाच मिनिटात आटोपायची ! त्या अगोदर दोन दोन तास बाग झाडतील, फुलं आणतील, पण देवघरात देव बरे, ही वृत्ती. तुकाराम, ज्ञानेश्वर हाती धरले, पण केसरी, नवनीत, निबंध, चरित्र यांचं वाचन अखंड होतंच. फर्ग्युसनच्या, वाडियाच्या लायब्ररीतून नवे नवे ग्रंथ आणून आधुनिक विचार समजावून घेत. म्हणावयाचे, "अरे बाबा, अभंग ओव्या वाचतो ते कशासाठी ! प्रेम, दया, माणुसकीचा व्यवहार सगळं सापडतं मला यामधे. मी काही मोक्षप्राप्तीसाठी वाचीत नाही, बरं. हे तू नीट लक्षात ठेव. मोक्षासाठी मला काही करायला नको. मागे मी आमच्या सोहवाकडे गेलो होतो. तो बागेत लाकूड ताशीत बसला होता. विचारलंन् 'well Mr. Ramchandra ?'—तो मला नेहमी नावानं हाका मारायचा. मी म्हटलं, 'साहेब, माझ्या अपॉइंटमेंटचं'. त्यावर आमचा साहेब म्हणाला, "मि. रामचंद्र, ड्राफ्ट युअर ओन अपॉईंटमेंट लेटर अँड आय वुइल साइन इट (Mr. Ramchanda, draft your own appointment letter and I will sign it")तसं यम मला स्वर्गाच्या पासासंबंधी म्हणेल, हे तू लक्षात ठेव ! काही काळजी करू नकोस.

असे होते आप्पा ! चिरतरुण "अजून यौवनात मी" म्हणणारे, त्यांच्यापुढे आपण एक जुनाट फॉसिलस आहोत असं वाटायला लावणारे.

मद्य आता ओत, माझा रिक्त प्याला ठेवू नको

माझ्याकडे तू साजणे रोखून अशी पाहू नको
माझ्या हिरव्या मनाला शहारून तू जाऊ नको—

तुझ्या पाहण्याला का वास यावा पारिजातकाचा
गडे अस्तित्व माझे दर्वळात त्या बुडवू नको—

वासंतिक संगीताची का धूनही त्यात घुमावी
छेडून माझे अंगअंग त्या झंकारून जाऊ नको—

तुझ्या पाहण्यात मी हाक अनामिक एक ऐकावी
अशी बोल तू अबोल मग बोल मला लाउ नको—

पाझरे अमृतहि श्रावणसरीपरि दृष्टितूनी
उमलते तारुण्य वर्षुनी मजला भिजवू नको—

पाहण्यातूनी ओसंडू दे मद्यशाला द्राक्षातली
परि त्यात खय्याम माझ्या जीवाचा झिंगवू नको—

नाचवून डोळे असे पुरे झाले इशारे तुझे
मद्य आता ओत, माझा रिक्त प्याला ठेवू नको—

—विठ्ठल भिकाजी वाघ

पाब्लो पिकासो*

अलौकिक व्यक्तित्वाचा एक महान चित्रकार

—धनंजय नाकाडे

आधुनिक काळात जे काही महान चित्रकार आपल्या अभूतपूर्व प्रतिभेने जगासमोर आहेत, अशा थोर चित्रकारांत ज्याने आपल्या अचाट बुद्धिसामर्थ्याने आणि असामान्य प्रतिभेने जगाला वारंवार आश्चर्याचे धक्के देऊन विस्मयचकित करून सोडले, त्यात पाब्लो पिकासो यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागेल.

पिकासोचे नाव आज अनेक लोकांच्या तोंडी आहे. साहित्य, शास्त्र, कला आणि जीवन या सर्वांशी त्याचा घनिष्ट संबंध आहे. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षापासून आजतागायत मोठमोठ्या ठिकाणी त्याच्या चित्रकृतींची अनेक प्रदर्शने झाली. आजही हा ८५ वर्षांचा म्हातारा आपल्या विलक्षण बुद्धिबळावर टीकाकारांना सतत आव्हान करीत आहे. विसाव्या शतकात त्याच्या इतका बोलबाला कोणत्याही व्यक्तीचा झाला नाही व त्याच्याएवढी जागतिक कीर्ती आणि वैभव दुसऱ्या कोणत्याही चित्रकाराला लाभले नाही. कलेच्या दुनियेत अभूतपूर्व नवलाई साकार करून आपल्या दुर्दम्य प्रतिभेने त्याने कलासंसारच बदलून टाकला व त्यामुळे टीकाकारांच्या नजरेसमोर तो सतत अर्ध शतकापर्यंत तसाच राहिला, अशा ह्या विश्वविख्यात चित्रकाराच्या जीवनावर रोलंड पेनरोज या त्याच्या लेखक मित्राने प्रकाश टाकला आहे.

या स्पॅनिश कलावंताचे वास्तविक नाव पॅब्लो दी गोजोसे फ्रांसिस्को द पाल जाँ नेपोमुसेनो क्रिस्पीं क्रिस्पिमानो द ला सान्तीस्सी मा त्रिन्दीदाद रूइज पिकासो. बापाचे नाव रूइज असून ते ड्राईंगमास्तर होते व चित्रही काढीत असत. आईचे नाव पिकासो. आजही पिकासोला त्याच्या पित्यानी काढलेली चित्रे आठवतात. बारीक रेषा चित्रणात काढण्यास जेव्हा त्याचे वडील असमर्थ ठरले तेव्हा त्यांनी सर्व चित्रणाचे सामान आपल्या लहानशा मुलास बहाल केले व त्यांनी या क्षेत्राचा कायमचा संन्यास घेतला.

पिकासोचा जन्म मलागा (स्पेन) येथे १८८१ मध्ये झाला. पण नंतर तो बार्सीलोनाला आला. शाळा शिक्षणातून तो बरोबर पळत असे, परंतु १५ वर्षांच्या त्याच्या वयात आपल्या पित्याच्या देखरेखीखाली त्याने बार्सीलोनाची ॲकेडेमी ऑफ फाईन आर्टस्मधून डिझाइनची ॲडवांस कोर्सच्या निमित्ताने एन्ट्रन्स परीक्षा पास केली. त्यानंतर पिकासोने मॅड्रिडमधून रॉयल ॲकेडेमीचीही परीक्षा पास केली. १९०१ मध्ये तो पॅरिसला आला, तेव्हा त्याने बार्सीलोनामध्ये आपल्या कलेत ख्याती प्राप्त केली होती. स्पेनमध्ये जन्माला आलेला हा कलाकार एवढा महान होईल असे कोणालाही वाटले नसेल. एका प्राध्यापकाचा हा मुलगा लहानपणापासून चित्रकलेचे पाठ गिरवू लागला. अभिरुची वाढविण्यास त्याच्या सभोवतालचे वातावरणही कारणीभूत झाले. पण ह्या दोन्ही गोष्टी जरी सत्य असल्या तरी शेवटी त्याने आपल्या बुद्धीलाच आव्हान केले. हा चित्रकार परंपरागत चित्रणाच्या पद्धतीत तरुणपणी रंगलेला होता. वास्तववादी चित्रणाच्या लाटेत तो वाहात गेला. आजही त्याच्या ह्या

* २५ आक्टोबर पाब्लो पिकासो या विख्यात कलावंताचा जन्मदिवस. त्या निमित्ताने हा खास लेख.

कलाकृती अद्वितीय अशाच आहेत; पण संस्काराला चिकटून असलेला हा कलाकार एकाएकी बेसुमार बदललेला दिसून आला.

वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी त्याने आपल्या मायदेशी छोटयाशा चित्रकृतींचे प्रदर्शन एका लहानशा छत्र्यांच्या दुकानात भरविले. लगेच वयाच्या एकोणविसाव्या वर्षी तो जेव्हा जन्मभूमी सोडून पॅरिसला कर्मभूमी समजू लागला तेव्हापासून आजतागायत सतत कलासंसारात रमून तो विजेता ठरला. परिवर्तनाला त्याने अधिक मोलाचे स्थान दिले. आधुनिक दुनियेतील 'अमरावती' पॅरिस (पॉरी) म्हणजे सर्वांगसुंदर कलांचा आविष्कार घडविणारी नगरी समजली जाते. या नगरीच्या वातावरणात पिकासोला आपले आयुष्य वेचावे लागले. पॅरिसला शासकीय विशाल संग्रहालयाव्यतिरिक्त १३०० पेक्षाही अधिक आर्ट गॅलरीज आहेत. प्राचीन आणि अर्वाचीन चित्रकारांच्या कलाकृती त्यात बघावयास मिळतात. जगप्रसिद्ध कलावंतांच्या जगविख्यात कलाकृती तेथे विक्रीस तयार असतात. कित्येक संग्रहालये म्हणजे तर यूरोप-अमेरिकन कलाकारांचे विक्रीस्थान आहे. या ठिकाणी अनेकविध कलाशैलीचे आणि विषयांचे चित्रण केले जाते. चित्रकलेच्या अभ्यासाला दुनियेतील हे एकच स्थान सर्वांगसुंदर आहे. जगविख्यात कलावंत पॅरिसलाच आपली कर्मभूमी मानून रहात आहेत. विश्वाचे मोठे चित्रसंग्रहालय 'लूव्र' येथेच आहे. लिओनार्दो-द-विन्सी, मायकेल एंजिलो, रेम्ब्रांट वगैरेंची चित्रे याच संग्रहालयात बघावयास मिळतात. त्या वातावरणात पिकासोला अत्यंत मोलाचे स्थान प्राप्त झाले आहे. मातिस, ब्रेक, बुके हे सर्व पिकासोला समकालीन समजले जातात. परंतु असल्या ठिकाणी पिकासोचे पहिले चित्रप्रदर्शन असफल ठरले, आणि दुसऱ्याच वर्षी त्याने परत दुसरे प्रदर्शन भरविले. अर्थातच त्याचीही तीच वाट लागली. यावेळेच्या आत त्याने पॅरिसच्या सर्व प्रमुख कलाकारांशी, साहित्यकारांशी तसेच कविसारख्यांशी मित्रता स्थापन केली होती. यातील प्रमुख समीक्षक गस्टाव कोकोत, कवी मॅक्स जॅकब, लेखक कास्तो, अपोलिनेयर, गर्टट्रियूड स्टीन, चित्रकार ब्राक, दिरे, मातिसे, रूसो आणि मारी लारेंसी वगैरेंचा समावेश यात होतो.

लवकरच पिकासोने आपला रंग पॅरिसला जमविला. पिकासोची चर्चा सुरू झाली. या अवधीत रूसी बॅले—नर्तकी ओलगा कोक्लोवा बरोबर त्याने विवाह केला. तिच्यापासून त्याला एक मुलगाही झाला, परंतु लवकरच त्यांच्यात वितुष्टता आली व संबंध तुटला. मित्राशीही त्याने मिळणेजुळणे बंद केले. त्याच्या देशात स्पेनमध्ये गृहयुद्ध सुरू झाले. तेव्हा त्याच्या कलेवर याचा प्रभाव अत्यंत भावस्पर्शी आणि दूरवर पडला. ही गोष्ट १९३६ मधली आहे. दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी समोर आली होती. राजकीय डावपेच समोर खेळले जात होते. सामाजिक तथा राजकीय क्रांतीचे वातावरण भेसूर रूप धारण करीत होते. जिकडे तिकडे अंधःकार पसरलेला होता. त्याचा परिणाम व्यक्तिमनांवर होणे अर्थातच स्वाभाविक होते. पिकासोसारखा कलावंत यातून सुटणे शक्य नव्हते. त्याच वेळी त्याने गॅरनिका नामक एका फॅसिस्ट भिंती चित्राची भव्य अशी निर्मिती केली. जे आज विश्वख्यातिप्राप्त चित्र झाले आहे.

आधुनिक चित्रकलेच्या बाबतीत लोकांत उत्सुकता, जिज्ञासा आणि रुचि दिसून येते. आत्मानुभूती, कल्पकता, रंगरूप, तंत्र यांत कितीही भेद असले, तरी आजच्या जीवनाचे आणि काळाचे ती प्रतिनिधित्व करीत आहे. आधुनिक कला आजच्या काळाची असली तरी जीवनसमस्या सोडविण्याचे वैशिष्टच ती साध्य करीत आहे व म्हणूनच ती दुर्बोध आहे. युरोपमध्ये पालगोगा, पालसिजानी प्रमाणे विन्सेंट वॅन्गो, सेजा, वगैरे कलावंत आधुनिक चित्रकलेचे प्रणेते समजले जातात. पण पिकासोने त्यांच्याही पुढे पाऊल टाकले व तिला अधिक शाश्वत आणि संपन्न करून बळकटी आणली. वैचारिक स्वरूप देऊन मानसशास्त्रीय विश्लेषणातून चित्र घडविण्याचे कार्य त्यानंतर झाले. त्यातही साहित्यिक प्रेरणा आणि बौद्धिक अधिष्ठानावरच पिकासोने अधिक चित्रण केले. पण घनवाद चित्रशैलीच्या जन्मदात्यात त्याचे नाव मात्र विसरता येण्यासारखे नाही.

घनवाद चित्रशैलीत दिसणारे दृश्य भूमितीच्या मर्यादेत बांधलेले असते. या शैलीचा जन्म फ्रांसमध्ये झाला. पिकासो या शैलीचा जन्मदाता समजला जातो. यावर त्याने आपले सुंदर विचार मांडले आहेत. त्याचे

म्हणण असे की, "प्रकृति आणि कला या स्वतंत्र सत्ता आहेत. विपर्यान्तरालाच विकास समजू नये." घनवाद शैली काही नवीन कला नव्हे ती तर चित्रणाची एक शैली असून तीत प्लेटोचे शाश्वत सिद्धांत काम करीत असतात. प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणे "रेषा, वक्रता, चौकोनाकृति आणि घनरूप यात निरपेक्ष सौंदर्य आणि त्याची आनंदानुभूती चिरस्थायी आहे. पिकासोनंतरही या शैलीत ग्रासवर्ग, मोन्दिया आणि लेंगर यांनी आपआपले सुन्दर विचार यावर मांडले आहेत. जर्मनीत कॅंडिन्सकी—याने केवळ यात चित्रणच केले असे नाही, तर यावर आपले मौलिक विचारही पटवून दिले आहेत. ह्या सर्वांनी हे सिद्ध केले आहे की, हे चित्र-निर्मितीचे एक चांगले माध्यम आहे. ते एक साधन आहे, साध्य नव्हे. पिकासोने एके वेळी स्वतः असे सांगितले की, "मी पूर्वीपासूनच काय चित्रित करण्यास घेत आहे, हे मला सांगता येत नाही. जसे की मी हे सांगू शकत नाही की कोणते रंग मला चित्रात प्रयोजित करावयाचे आहेत. काम करताना मी याची परवा करीत नाही. मला काही निर्माण करावयाचे आहे तेव्हा मी चित्रण करण्यास घेतो असे नाही, तर जेव्हा मी चित्र काढण्यास घेतो तेव्हा मला असे वाटते की मी आपणालाच एका महान खोल अंधकारात फेकित आहे."

सहा वर्षांपूर्वी म्हणजे ऑगस्ट १९६० मध्ये लंडनला पिकासोच्या चित्रांचे जे भव्य चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले, ते सप्टेंबर अखेरपर्यंत सर्वांना खुले होते. त्यात पिकासोच्या हातून उतरलेल्या अनेकविध कलाशैलींच्या नमुन्यांपैकी कित्येक शैलींचे अगम्य नमुने मांडण्यात आले होते. गेल्या पन्नास वर्षांत त्याने निर्मिलेल्या चित्रांचे प्रदर्शन म्हणजे प्रचंड खटाटोपच ! चालकांनी रोलन्ड पेनरोज याला संयोजक म्हणून नेमले होते. मोठमोठ्या धनिकांकडून आटापिटा करून व संग्रहालयांतून त्याची चित्रे मोठ्या प्रयासाने निरनिराळ्या स्थानांवरून लंडन शहरी आली. यात चित्राची विभागणी, कॅटलॉग निर्मिती, चित्र बरोबर टांगण्याची जबाबदारी वगैरे मोठ्या कौशल्याने केली होती. दुनियेतील कलावंतांना ती एक पर्वणीच होती. अपूर्व नेत्रदीपक असा हा सोहळा पाहण्यास हजारो लोकांची गर्दी उडाली होती. त्यात दुर्बोध, अनाकलनीय, विक्षिप्त अशीच चित्रे अधिक होती. अगडबंब व अक्राळविक्राळ मासाची अशीही बरीच चित्रे त्यात होती. त्यामुळे "भेसूर कृतींचे भयानक चित्र प्रदर्शन" असेच अजाण लोक त्याला पाहून म्हणाले, तर नवल कसले !

हे सर्व पिकासोच्या प्रयोगशीलतेचेच नमुने होते. नवे विचार, नवे वाद, नवीन शैली, निराळे तंत्र व नव्या पद्धतीने चित्रांची उभारणी, त्यातच रंग थोपटण्याची तऱ्हा, विचारांचे लेप, भावनांचे संगीत; पण या सर्वांची उभारणी पिकासोने आपल्या बौद्धिक सामर्थ्यावर मोठ्या चातुर्याने केली आणि यातूनच पिकासो जन्माला आला. आजच्या व कालच्या जागतिक घडामोडींचे राजकीय, सामाजिक व आर्थिक समालोचन पिकासोने आपल्या चित्रणात केले. कारण कोणत्याही कलाकारावर तेथील भौगोलिक परिस्थितीबरोबर इतरही गोष्टींचा परिणाम सामाजिक आणि राजकीय मताबरोबरच झालेला दिसून येतो. पिकासो याला अपवाद ठरू शकत नाही. आचार-विचारात आजचे जागतिक राजकारण खेळत असते. त्याच्या जोडीला आजचे निरनिराळे वाद व त्यांचा परिणाम कलावंतावर आणि त्याच्या कलासंसारावर झालेला दिसून येतो. दुसऱ्या जागतिक महायुद्धापूर्वीपासूनचे युद्धाचे आणि दुनियेचे राजकारण पिकासोच्या लक्षात आले होते. 'गैरनिका' नामक एका 'फासिस्ट' भिंती चित्रात त्याने हेच व्यक्त केले. गैरनिका पिकासोची फासिज्मच्या प्रती घृणेची जीवंत अशी कलाकृती आहे. चित्र हे जर भावनेचा अविष्कार आहे, तर स्पेनच्या यादवी युद्धात फासिस्टांनी तेथील निष्पाप प्रजेची जी अमानुषपणे कत्तल उडविली ती पिकासो विसरू शकला नाही. यासारखे अनेक विषय याच पार्श्वभूमीवर रेखाटले. त्याच्या प्रदर्शनात अनेक वाद-विवाद उठले. काहींनी त्याला महान ठरविले तर काहींच्या मते त्याच्या कलाकृती निकृष्ट प्रतीच्या ठरल्या. परंतु एवढे मात्र सत्य की त्याच्या असल्या क्रांतिकारी कलाकृतींमुळे त्याची चर्चा सर्व जगभर पसरली. आजपर्यंत स्पेन, फासिस्टांच्या पंजातील बाहुले होते. पिकासोने त्यामुळे तनमनधनाने आणि आपल्या कलेतून विरोध प्रदर्शित केला. त्यांनी आपली चित्रे विकून बराच धनसंचय केला. स्पेनवर तो बेहद प्रेम करीत होता, म्हणून त्याने आपल्या रिपब्लिकची सहायता केली. जेव्हा स्पेन स्वतंत्र झाला तेव्हा

पिकासोने आपण कम्युनिस्ट आहे अशी घोषणा केली. त्यामुळे साऱ्या युरोपात त्याची परत चर्चा सुरू झाली. पिकासो त्यावेळी म्हणत असे " मी कॅम्युनिस्ट याकरिता झालो आहे, कारण फ्रान्स, रूस आणि स्पेनमध्ये ते सर्वात बहादूर आहे. जोपर्यंत स्पेन माझा स्वीकार करीत नाही, तोपर्यंत मला फ्रेंच कम्यूनिस्ट पार्टी माझ्याकरिता पितृभूमीच्या रूपात राहील."

जो चित्रकार प्रथमतः फुलाफळांचे चित्र रंगवित होता तो आता घोडयांच्या झोपड्या आणि काटयांनी भरलेल्या वाळलेल्या झाडांच्या फांद्या रंगवू लागला. जीनपेरे सालताने पिकासोच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने, एका लेखांत लिहितात—" ···आणि आज जेव्हा आम्ही आता पिकासोची ७५ वी जन्मगाठ मनवली आहे, तेव्हा हजारो सोवियट कलारसिकांनी मास्को आणि लेनिनग्राडमध्ये झालेल्या त्याच्या चित्र-प्रदर्शनावर फार मोठे वाद उठविले. तेव्हा पिकासोच्या विरोधकांनाही हे मान्य करावे लागले की त्याची कला एक अद्वितीय यश संपादन करीत आहे." मी त्यांच्या शब्दात परत सांगतो की त्या पिकोसोच्या स्टूडिओला जेव्हा सोवियत कवी मायाकोवेस्कीने १९२२ मध्ये भेट दिली आणि निरीक्षण केल्यानंतर तो लिहितो— "तो कलावंत क्षमता आणि महत्त्व दोन्ही दृष्टीनी साऱ्या जगात सर्वश्रेष्ट आहे" चार्ल्स सी० वर्टेन बेकरनीही आपल्या लेखात 'पोट्रेट ऑफ द ऑटिस्ट-मध्ये' पिकासोच्या कम्यूनिस्ट होण्याची चर्चा केली आहे. "पिकासोने आपल्या कम्यूनिस्ट मान्यतेच्या नंतर सुद्धा त्याने आपले व्यक्तित्वाला जरा देखील धक्का लागू दिला नाही. त्याने आपल्या पार्टीला आपल्या नावाचा भरपूर उपयोग करू दिला; पण कदाचितच तो पब्लिक मीटिंगला गेला असेल. पाच सहा वर्षापूर्वीच्या उन्हाळयात जेव्हा 'प्रावदा' नावाच्या रशियन वृत्तपत्राने सोवियट रूसमधून कलेच्या आधुनिकतेला बहिष्कृत करण्याचा घनघोर प्रकार पिकासोबद्दल केला, तो बुर्सट आणि सडलेला कलाकार आहे, अशा शब्दात त्याची निंदानालस्ती केली आहे.

पिकासोचे व्यक्तित्व एवढे मोठे आहे की, त्यावर निरनिराळ्या देशात निरनिराळ्या भाषेत उदंड लिखाण लिहिले गेले. स्वतः पिकासोनेही विपुल साहित्य निर्माण केले. आपल्या चित्रांवर आणि पद्धतीवर अनेक लेख त्याने लोकांसमोर मांडले, शिल्पकलेतही त्याने असामान्य लौकिक संपादन केला. १९३० साली त्याने जी चित्रे निर्माण केली, त्यात त्याने विविध प्रयोग यशस्वी रीत्या पार पाडण्याचा प्रयास केला. त्यात त्याने धातूचे तुकडे, लोखंडाच्या पट्या आडव्या उभ्या जमवून त्रिकोण चौकोन अशा ब्लॉक्समध्ये त्यांचे रूपांतर करून चित्रे चित्रित केली. हा काळ युरोपातील चित्र-कलेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा होय. भरभराटीच्या या कलासंसारात, पारंपारिक तत्वांवर अधिष्ठित बाजू आणि नियमांच्या बंधनाने जखडलेली चित्र-निर्मितीची तन्हा असल्यामुळे ती या पद्धतींच्या चाकोरी-बाहेर जातच नव्हती. पण पिकासोने तिला नवे रूप दिले, नवे वळण लावले, तिचे स्थित्यंतर केले. क्रांतीचा एक भाग समोर उभा झाला. पिकासो यांचा नेता ठरला, कित्येक पर्वांपासून हा चित्रकार एवढ्या मोठ्या चमत्कारिक कलाकृती अव्याहत चितारीत आहे. यात त्याच्या व्यक्तिमत्वाचा प्रभावच अधिक दिसून येतो. मातीचेही काम त्याच्या हातून झाले. सिमेंट, माती, रंग, दगड आदींचाही वापर त्याने आपल्या चित्रात मोठ्या कौशल्याने केला.

पिकासोने आत्मनिष्ठ सौंदर्यावरच अधिक भर दिल्याने विसाव्या शतकातील महान चित्रकार म्हणून तो गाजला. त्याची जीवनविषयक लालसा प्रयोग-शीलता दिवसेंदिवस वाढतच आहे. ती थोडीही मंदाव-लेली नाही किंवा कमी झालेली नाही.

आजच्या आधुनिक चित्रणात पिकासोने प्रभाव-वादी, घनवादी व अमूर्तचित्र शैलीचा वापर करून चित्रांची मांडणी केली. निसर्गाचेही चित्रण त्याने आपल्या विशिष्ट शैलीत करून अभूतपूर्व असा ठसा उमटविला. सुन्दर कल्पना, उपयुक्त चित्ररचना, रेषा, आकार, बिंदू, रंग व इतर साहित्य यांचे सूक्ष्म निरीक्षण करून चित्रनिर्मिती पिकासोनेच करावी, म्हणूनच पिकासोची चित्रे ख्यातिप्राप्त व दृष्टिगोचर आहेत, याबाबत दुमत होणार नाही.

स्पेनचा हा कलावंत क्वचितच आपल्या देशात गेला असेल. पॅरिसलाच घर करून राहतो. परंतु

आपल्या मातृभूमीबद्दल त्याला नितांत श्रद्धा आणि आदर आहे. वेळप्रसंगी आणि वेळोवेळी त्याने आपल्या देशाला मदत करून हातभार लावलेला आहे. पॅरिसला जाणारांमध्ये कदाचित अशी व्यक्ती असेल की ज्याला पिकासोची भेट घेण्याची इच्छा नसेल. तो पॅरिसमधील सर्वाधिक चर्चित व्यक्ती आहे. त्याचा स्टूडिओ बघण्यास जितके लोक जातात तितके कदाचित इतर सार्वजनिक स्थानांना भेट देण्यास जात असावेत. पण पिकासोचे दर्शन घेणे एवढे सोपे काम नाही. तो पॅरिसमध्ये नदीकिनारी लॅटिन क्वार्टरमध्ये राहतो. त्याला भेटण्यास 'क्यू' लागलेला असतो. तरी पण तो सर्वांनाच भेटत नाही. पॅरिसचा तो नागरिक नसताना त्याला पॅरिसचा प्रमुख नागरिक मानतात. पॅरिसमध्ये राहून पिकासोने जेवढे धन कमविले तेवढे कदाचित दुसऱ्या एखाद्या कलावंताने कमाविले असेल. त्याचे एकएक चित्र दोनदोन लाख पौंडाला विकले गेले आहे.

पिकासोने व्लूरिस नावाच्या एका लहानशा कसब्याला आपले कलाकार्यक्षेत्र बनविले आहे. व्लूरिस याचा अर्थ 'सोनेरी घाटी' असा आहे. ही फ्रेंच आल्पस् पर्वताच्या काठी वसली आहे. तेथे मातीची भांडी घडविली जात, परंतु ही कला हळूहळू नष्ट होत चालली होती पिकासोने त्याला परत उजाळा दिला, रंगविले आणि घडविले, यातूनच या कलेला उत्तेजन मिळाले. एका प्रकारे व्लूरिस पिकासोचे कलाधाम बनले आहे आणि हे स्थान त्याला अत्यंत प्रिय आहे. तेथील एक जुन्या मिलच्या जागी त्याने आपले कार्यक्षेत्र चालविले आहे. याच कलासंसारात त्याचे दोन जगप्रसिद्ध अधिक चर्चित चित्रे 'गॅरनिका' आणि 'वार अँड पीस' येथील एका दालनाची शोभा वाढवीत आहेत. व्लूरिसच्या बाबतीत पिकासो म्हणतो, "हे माझे एक स्वप्न आहे. जेव्हा मी मिलच्या दगडांच्या जागी कबुतरांची मूर्ती प्रस्थापित करीन आणि त्या मंदिराचे द्वार उघडे करीन, तेव्हा प्रेक्षक हातात फुले घेऊन तेथे येतील. ते केवळ माझी चित्रे पाहण्यास येणार नाहीत. ते फेरफटका मारण्यास येतील. त्यातूनच मित्रता आणि प्रेमाच्या गोष्टी करतील. जीवनाच्या असामान्य सुखाचा रसास्वाद घेतील. माझ्या चित्रांचे रंग जर यात सामावून झाले तर मी आपले जीवन सार्थ झाले असे समजेन."

आणि दुसऱ्या शब्दात पिकासो आज म्हणतो, "आजपर्यंतची माझी चित्रे म्हणजे एक प्रकारचा माझा विदूषकी खेळच होय." आपल्या एका मुलाखतीच्या वेळी पिकासोने आपल्या वक्तव्याने परत जगाला हादरा दिला. परंतु ८५ वर्षांची चित्रकला, संसारातील त्याची तपश्चर्या, केवळ त्याच्या एवढ्याशा बोलण्याने नष्ट होणार नाही. वादळ उठविण्याची पिकासोची हातोटी दुसऱ्याला साधावयाची नाही.

पिकासोच्या एका मित्राने त्याला त्याच्या घरी त्याचेच चित्र टांगलेले दिसत नाहीसे पाहून त्याला प्रश्न केला की, "आपले चित्र आपल्या येथे दिसत नाही." तेव्हा पिकासोने मोठे मार्मिक उत्तर दिले आहे. तो म्हणतो, "मी इतका श्रीमंत नाही की पिकासोचे चित्र मी आपल्या घरी लावू शकतो," आणि हे खरेही आहे दोन दोन लाख पौंडाला जर त्याचे चित्र विकले जाऊ शकते तर त्याचे चित्र साधारण ठिकाणी थोडेच लागणार आहे?

मला असे वाटते की, पिकासो एक असामान्य व्यक्ती असून त्याची प्रतिमा अनन्यसाधारण, म्हणूनच तो आज रूबेन्स, टर्नर, रॉफेल, लिओनार्दो द विन्सी, सेजा, व्हनगॉफ यांच्या बरोबरीने जाऊन बसतो. याचे कारण त्याचे असामान्य बौद्धिक चातुर्य, साहस आणि व्यक्तित्व. शेवटी असेच म्हणावे लागते की, पिकासोसारखा तोच, पिकासो युगप्रवर्तक ठरला तो याचमुळे !

अनुक्रमणिका

न्याहारीचा वखत

—दिनकर नीळकंठ देशपांडे

सकाळ करपली. सूर्य माथ्यावर आला. झाडा-झुडपाच्या सावल्या आपले ताणते पाय आखूड करून मुळामातीच्या आत निपचीत पडल्या. उन्हाच्या वाढत्या कडाक्यानं दमछाक झालेले पक्षी झाडाच्या आडोशाला आले. वाऱ्याची कानशीलं तापली होती. गारव्याच्या मगोव्यासाठी तो सुसाट पळत होता.

गना आपल्या शेतात मोट हाकलत होता. विहिरीच्या मेरेवर लांब फांद्या पसरून उभ्या असलेल्या वडाच्या झाडावर कावळे कोकलू लागले. कावळ्यांच्या पोटातच कावळे कोकलू लागले होते. गनाच्या न्याहारीची वेळ झाल्याची दवंडी ते पिटीत होते. गनानं खाऊन उरलेल्या कटकुरावर त्यांना ताव मारायचा होता. त्यासाठी त्यांची वडपड चालू होती. मोटेचा आवाज कावळ्यांच्या आवाजाशी दोस्ताना करीत होता.

कावळ्यांची कावकाव वाढली तसा गना थांबला. त्यानं मोट निरीच बांधून ठेवली. बैलांना जुवाचं सोडलं आणि वडाच्या झाडाखाली आणून बांधलं. त्यांच्यापुढे पेंड, खांड, कडवा टाकला. प्रेमानं बैलाच्या पाठीवर थाप मारली. बैल थरारले. त्यांच्या पाठीवरल्या गोमाशा उडून पोटाशी गेल्या. पुढे पडलेल्या कडव्यावर त्यांची नजर वळली. तसा त्यांनी कडवा खायला सुरवात केली.

गनानं आपला हात डोळ्यावर झापडीसारखा धरला आणि गावाकडून येणारी पायवाट तो हेरू लागला. डोळे ताणून दूरवर पाहू लागला. पण त्याची न्याहारी घेऊन येणारी व्यक्ती त्याच्या नजरेस पडली नाही. टाका उंचावून त्यानं पाहण्याचा प्रयत्न केला. पण छट...—काही पत्ता लागेना. जवळ पडलेल्या मातीच्या ठिगुळावर तो चढला, दूर पाहू लागला पण ढेकुळ भारानं पार भगरल्या गेलं, गना खाली सटकला. त्यानं वाट हेरण्याचा नाद सोडून दिला.

झाडाच्या बुंध्याजवळ बसून त्यानं आपली चिलीम काढली. त्यात तंबाखू भरला. तिला फडकं गुंडाळलं. चिलीम पायाच्या अंगठ्यात धरली. दोन्ही हातानं चकमक झाडली. धुगधुगी झालेला काटसावरीचा कापूस चिलिमीवर ठेवला. चिलीम हाती घेतली. आणि गालाची खवदाडं करीत त्यानं जोरदार दम मारला. सनकाड्या घालून चूल धुरकटावी तसा साठलेला धूर तोंडाबाहेर भपदिशी सोडला. चिलिमीच्या एका दमानं त्याला हुशारी वाटू लागली. कावळ्याची कावकाव क्षणभर त्याच्या कानाआड झाली. पोटाची आग काही काळ शांत झाली.

न्याहारीची वेळ झाली होती. परंतु अजूनही त्याची घरधनीन वावराच्या मेरेवर त्याला दिसत नव्हती. गनाचं मन चलबिचल झालं. शंका-कुशंकांची अनेक पाखरं त्याच्या डोक्यात घिरट्या घालू लागली.

सीतावर गनाचा भारी लोभ होता. आपल्यापरिस तो तिला जास्त जपत असे. सीता गरीब–गुऱ्याची लेक होती. गनाच्या संसारात ती एकरूप झाली होती. कांदा मिरचीच्या ठेच्यावर त्यांचा संसार सुरू झाला होता, त्यात सीतानं सुख मानलं होतं. गनाच्या कष्टानं ती रमत होती. दुसऱ्याची जमीन वाहणारा गना आता स्वकष्टानं स्वतःच्या सहा एकर जमिनीचा मालक

झाला होता. दोन बैलाचं पोट त्याला साथ करीत होतं. आपण बरं नि आपलं काम बरं असा गनाचा खाक्या होता. सीतादेखील कुणाच्या भांडणाकुंडणात रहात नसे. नवऱ्यामागं छायेप्रमाणं फिरायचं तिला ठाऊक होतं.

एकलारा गावच्या परिसरात गना–सीताचा संसार सुरळीत सुरू होता. त्याला कुणाची दीठ लागत नव्हती. आता त्या संसारात कमी होती एकाद्या तान्हुल्याची. अन गना रिकामा असला की त्याचाच विचार करायचा. लग्न होऊन पाच वर्षं झाली होती. पण गनाच्या घरात पाळणा हलला नव्हता.

सीता तर बोलून चालून बाई...रिकामी असली की तिचा वेळ जाता जाईना. सारं घर कसं सुनं–सुनं वाटायला लागायचं...न समजणारं दुःख वाटायचं. सुखी संसारात काहीतरी कमी असल्याचा भास व्हायचा.

चिलिमीचे दम छाटीत गना आपल्या विचारात हरवला होता. कावळचांची कावकाव वाढली होती. तेवढचात गनाच्या पुढचात मातीचं ढेकुळ येऊन पडलं. गना दचकला. विचारातून जागावला. त्यानं आजूबाजूस पाहिलं. पण कुणाचा पत्ता नव्हता. पुन्हा त्यानं दम मारला. धुरावरोबर विचारात फिरू लागला. तसा लहानसा खडा त्याच्या पाठीवर बसला. गनानं चमकून मागे पाहिलं. आणि त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचं पीक भरून आलं—

'अवा...तू व्हे का'? गना चिलीम विझवीत पुटपुटला.

'व्हय...तुम्हास्नी कोन वाटलं...भूत...का हडळ!' सीता त्याच्या जवळ येत बोलली.

'आज लगीत वेळ झालानं! का गेली व्हती कुठं याख्यान द्यायले!' गना तिच्याकडे रोखून पाहत बोलला.

कधी नव्हती त्यापेक्षा सीता आज त्याला विशेष सुंदर दिसू लागली. तो एकटक तिच्याकडे पाहू लागला. सीता भांबावली. आपला पदर तिनं सावरला. डोक्यावरचा शेव नीट केला. ओठाच्या कोपऱ्यातून हसली. बोंडातून कापूस हसतो तशी! पांढरी स्वच्छ हसली.

'सीता...!' गना पुटपुटला.

'का...धनी...' सीता बोलली. स्वतःशीच लाजली. आजूबाजूला पाहू लागली. झाडाच्या फांदीवरला कावळा तिच्याकडे वाकडी मान करून मिष्किल चेहऱ्यानं पाहत होता. पायाच्या चिमटीत तिनं दगड उचलला अन् हाती घेऊन कावळयाच्या दिशेनं भिरकावला.

'अव, माहा राग त्या पाखरांवर काढून काढतेस!' गना लाडावला.

'हं घ्या! लाडावू नगा... कुटका खा!' सीता त्याच्या पुढचात बसत पुटपुटली.

...तिनं शिदोरीचा पालव सोडला.

'आज का रांधलंस?' गनानं विचारणा केली.

'चून–भाकर!'

'तोंडी लावाले का आणलं?'

'आंब्याचं रायतं हाय!'

'तुहा झाला का कुटका खाऊन?' गनानं विचारलं.

'ऊं! आज मशी जेवायचं नाय?

'का! उपास करणार नाय का?'

'नाय!'

'मग जेवत काऊन नाय?'

'जेवावंसं वाटलं नाय!'

'आस्सं! तेबी बराबर हाय! एकलीले जेवन बराबर वाटणार कसं? चाल ये घे दोन कुटके खाऊन. अशी उपास तापास नकं करत जाऊ. नाहीतर तुहा बावा म्हनन पोरीले खराटचावानी वाळवून टाकली म्हणून! चाल ये न्याहारीले.'

'तुम्हीच करा. आज माही जेवनावर विच्छाच नाय!'

'मग राह्यलं! माहीबी जेवनावरून वासना उडली समज! दे हे बैलाले लावून! थंडगार पाणी पिऊनशान लागतो मी कामाले.' गना शिदोरीचा पालव बांधू लागला.

'तुम्ही न्याहारी करा...'

'नगं, मरलं महाबी पोट.'

'म्होरच्या अन्नाले पाठ दावू नका!'

'शानपन नगं शिकवू...तू काऊन नाय खात कुटका?'

'माह्या जिवाले बरं नाय'

'माह्याबी जिवाले बरं नाय असं समज.'

'तुम्हाले माहा म्हननं नाय पटायचं! देवा—आन आज माही अन्नावर विच्छाच नाय!'

'कावून, आज तुह्या त्या बायकाच्या मंडरात सकारी सकारी काही पाहुनचार झाला का?'

'नाय.'

'मंग?'

गनाच्या अग्रहापुढं सीताचा नाईलाज झाला. तिनं गनानं गुंडाळून ठेवलेली शिदोरी सोडली.

पालवाच्या आत भाकरी हसत होत्या. तेलदार चुनाचा खमंग वास वाऱ्यावर भिरभिरला. आंब्याचं तिखट रायतं भाकरीच्या कोपऱ्यात बसून तोंडाला पाणी सोडत होतं. सीतानं एक कोरभर भाकर स्वतःसाठी घेतली.

'हं—खावा आता.'

तिच्या कृतीकडे एकटक पाहणारा गना भानावर आला. अन लहान मुलाच्या घाईनं तो बकाबक बोकणे भरू लागला.

'वा! अव्वल झालं चून! रायतं बी मोठं बाकं हाय!' तोवरा भरलेल्या तोंडानं गना बोलण्याचा प्रयत्न करीत होता. सीताला त्याच्या हालचालीचं मोठं कौतुक वाटत होतं. तिची जेवणाची गती सावकाश होती. प्रत्येक घास ती घोळून आणि पुरवून पुरवून खात होती. आपल्या बायकोच्या सुग्रणपणाचा गनाला भारी अभिमान वाटत होता.

कोरभर भाकर सीतानं कशीबशी घशाखाली घातली. हात झटकून ती उठली. जवळच पडलेला पोहरा घेऊन विहिरीवरून तो भरून आणला. गनाच्या बाजूला ठेवला. स्वतः दोन आंजुळा पाणी प्याली.

गनाची न्याहारी संपली. त्यानं समाधानानं दीर्घ ढेकर दिला. बादलीतील पाणी घटाघटा प्याला. हात धुतले. सीतानं शिदोरी सावडली. आणि पालवात पडलेले कुटके बाजूला नेवून टाकले. पडलेल्या कुटक्यावर झाडावरील दोनचार कावळे झेपावले.

सूर्य माथ्यावर उभा राहून सर्वांची हालचाल निरखीत होता. बैलांनी बसकण मारली होती. डोळे मिटून अडवा रवथ करण्याचं त्याचं काम सुरू होतं.

सीतानं सुपारीचं खांड काढलं. गनाला दिलं. गनानं चिलीम पेटवून एव्हाना दम मारण्यास सुरुवात केली होती. त्याची नजर आपल्या शेतावर भिरभिरत होती. वावरात उभं असलेलं पीक समाधानानं डोलत होतं. ह्या सहा एकराचे साठ एकर कसे होतील याची चिंता गनास लागली होती. पण एवढी जमीन पैदा करून आपण कुणास देणार? असा प्रश्न त्याच्या मनात आला. तो स्वतःच शरमला. दोन जीवासाठी त्याला सहा एकर जमीन पुरेशी होती. पण त्यात त्याचं समाधान नव्हतं. त्याला वाटलं दिवसभर उन्हातान्हात राबायचं, खपायचं अन् पोटापुरतं कमवायचं! बस...त्यापेक्षा शेती विकून टाकावी. शहरांत जावं. मिळात नाहीतर कुण्या सरकारी दप्तरात नोकरी करावी अन सीताला घेऊन तिथे रहावं. आता शेती करण्यात त्याला काही ढंग वाटत नव्हता. दोन वर्षांपूर्वी शहरात रहावयास गेलेल्या श्रीपत वाढचाचं त्याला जीवन आठवलं. आज श्रीपत शहरात मोठ्या खुषीत होता. बस...आपणही तसं करावं. अन हा विचार तो सीताला बोलून दाखविण्यासाठी तोंड उघडणार तोच सीता बसल्या जागेवरून उठली आणि बाजूला जाऊन बसली.

'सीता!' गना बोलण्याचा प्रयत्न करू लागला.

'वाईच थांबा! माहा डोकं गरगरायले लागलं हाय! जीव घाबरा होतय! तरी म्या म्हनलं, मले कुटका खावाले लावू नका! पन तुमाले कायबी समजत नाय.'

'आता, मलेच दोस देते, सुपारी आन लवंग धर तोंडात, आता बरं वाटन!'

'काही नगं! तुम्ही करा आपलं काम गुमान. मी येथं बसून राह्यते!'

(पुढील मजकूर पान २९२)

खळ्याचे दिवस

—प्रा. अनंतराव पाटील

खरं म्हणजे सरत्या श्रावणाच्या पावसाने पाठ फिरविल्याबरोबर खळी तयार करण्याचे वेध लागतात. वावरात बाजरीच्या पिकाला विळा लागला की इकडे खळ्याची तयारी सुरू होते.

...नवरात्रात पावसाच्या सरी आल्या किंवा सकाळचे दंव खूप पडले की खळे तयार करण्याचा मुहूर्त लागतो चार महिने पावसाचा मारा खात पडलेले खळे, गवत, झाडझाडोरा यांनी भरून गेलेले असते. हे सर्व गवाळ साफ करून प्रथम जमीन चांगली पक्की करायला हवी. पावसाच्या हैदोसाने खळ्याची भुई टाके घातलेल्या जात्यासारखी खडबडीत झालेली असते. ओल्या भुईवर ८।१० बैलांची पात ३।४ घंटे चालविली की खळ्याची कच्ची भुई टणटणीत होते. बैलांच्या खुरांनी तुडविलेली जमीन चांगल्या माजलेल्या मडक्यासारखी टणटणीत होते.

त्यानंतर कठाणीची पेरणी सुरू झाली की खळ्याकडे थोडे दुर्लक्षच होते त्यातून अवेळी पावसाच्या सरी आल्या की खळ्याची टणटणीत भुई नासून जाते. गव्हाची वलवणी, पेरणी व कांद्याची लागण संपली की मग मात्र खळ्याच्या तयारीला कुठे उसंत मिळते. बाजरीच्या वावरात गऱ्या घालून पडलेल्या असतात शेतात कडब्याचा गूड रचून पडलेला असतो. मटकी तयार झालेली असते. उलगलेल्या रानात आता फक्त गऱ्या व कडब्याचा गूड असतो. चोरचिलटे, आग व मोकाट जनावरे यांची भीती मनात बाळगीतच शेतकरी कठाणीची कामे उरकतो. रानातला माल केव्हा एकदा सुरक्षीतपणे खळ्यात आणून टाकू असे शेतकऱ्याला झालेले असते.

त्यातून विहीरमळेवाल्यांची तर खूपच धांदल उडते. विहीरमळ्याच्या कामातून सवड मिळाल्याबरोबर त्यांचे सारे लक्ष खळ्याकडेच लागते. एके दिवशी भल्या पहाटे गाडाभर शेण, घागरी, बादल्या पाण्याची पिपे व बैलांच्या ५।६ जोड्या व गडीमाणसे एवढ्या जय्यत तयारीनिशी खळ्याची जमीन तयार करायला सुरुवात होते. प्रथम गडीमाणसे जमिनीवर भरपूर पाणी शिंपतात अन् मग त्या ओल्या जमिनी वरून बैलांची पात चालते. बैलांच्या खुरांनी जमीनटणक होत जाते. मग त्या टणक भुईवर शेणकाला अंथरतात. खळ्याची खडबडीत जमीन दारापुढे सडा टाकलेल्या अंगणासारखी आपरुक दिसू लागते. परंतु हा साजरेपणा यायला बैल, गडी यांना किती घाम गळावा लागतो !

एकदाची भुई तयार झाली की काटयाच्या वडांगाचे कुंपण लावायला हवे. ते सुद्धा जिकिरीचे काम. जमिनीत दर खोदून काटेरी झुडुपे त्यात पक्की रोवायला हवीत. त्यातून डुकरे, मोकाट जनावरे यांचा शिरकाव व्हायला नको. अनेकदा कायमचे निवडुंगाचे कुंपणच लावतात. पण सर्वांनाच ते जमते असे नाही. कुंपण झाले की त्याला फाटक वगैरे आलेच. कारण वावरातील सारी धनसंपदाच इथे आणून टाकायची असते ना ?

गावालगतच्या पांढरीत ही सारी खळी उभी राह्यची असतात. कुणीतरी आधी खळे उभे करतो. मग ती गावात एक बातमीच होते. अमक्यातमक्याचे खळे तयार झाले ही बातमी गावभर पसरते. मग प्रत्येकजण आपापले खळे कधी होईल याच्या विवंचनेत

असतो. पुरेशा बैलजोडया, मजूर वा पाण्याकरता घागरी मिळतीलच याची शाश्वती नसते. हा हा म्हणता गावाबाहेरच्या पांढरीत खळयाची वेगळी दुनिया उभी राहते.

एकदाचे खळे उभे राहिले की शेतातला माल खळयात आणून टाकायची घाई सुरू होते. वावरातल्या गन्या उचकटून त्या बैलगाडयातून खळयात आणण्याची घाई सुरू होते. बाजरी, ज्वारी, कडवा, तूर, मटकी यांचे प्रचंड भारे वागवत बैलगाडयांची रीघ खळयांच्या दिशेने सुरू होते. रिकामी खळी मालांनी भरून जातात. शाकारलेल्या झोपडयांच्या आकाराच्या गन्या डौलदार बैठकी मारून खळयात बसतात. चांगली गरी मांडणे कौशल्याचेच काम. गावात असे राउच आसामी असतात. या काळात त्यांना भारी मागणी असते गोलाकार व लांबट रचलेली गरी तो इतक्या कौशल्याने रचतो की वरून कितीही वादळ वा पाऊस येवो गरीचा एक भारा न उचकटला पाहिजे की तिच्यात पाणी न शिरले पाहिजे खाली तळाशी देखील पाणी शिरले न पाहिजे.

वावरातला सारा माल खळयात आणून टाकला की शेतकरी निर्धास्त होतो. आता त्याला थोडी उसंत मिळते. विहीर बागायतवाल्यांची मात्र धावपळ सुटत नाही. तीन-तीन, चार-चार लहान असामी मिळून एक खळे तयार करतात. मोठी असामी असली तर त्याला एक स्वतंत्र खळे हवे. आता ४ महिने इथेच मुक्काम. खळयाच्या आवारातच बैलांकरता गोठा, छप्पर तयार करावे लागते. दुभती जनावरे पण इथेच आणलेली बरी. पाण्याकरता नवा माठ, खाट या पण गोष्टी आल्याच.

कामाच्या या भाऊगर्दीत मधेच कांद्याच्या व गव्हाच्या पाण्याची पाळी येते. खळयाचे काम तसेच टाकून मळयात जावे लागते. खळयाची कामे तशीच खोळंबतात.

—मुख्य मळणी सुरू व्हायच्या आधी चिल्लर कामे उरकून टाकलेली बरी. तुरीची मळणी व मटकी, अंबाडीची मळणी ही कामे चिल्लर सदरात मोडतात. खरं म्हणजे कामे रेंगाळतच चालतात.

—होळीचे वारे भन्नाटू लागले की, खळयाच्या कामाला वेग येतो. एकदा होळीला नैवेद्य दिला की, बाजरी, ज्वारी वा गव्हाच्या मळणीला सुरवात केलेली बरी. ही मळणी सुरू करण्यापूर्वी खळयाच्या भुईला पुन्हा एकदा शेणाचा हात दिलेला बरा. एकदा मळणीची कामे सुरू झाली की गडीमाणसांना, बैलांना व मालकाला डोके वर काढायला फुरसतच नाही. न्याहारी, दुपारची व रात्रीची भाकरी इथेच. पोरांच्या परीक्षा आटपलेल्या असतात. भाकरी आणायला व इतर चिल्लर कामाला पळवायला पोरे हाताशी असतातच. गरी विचकटली जाते. गोलाकार पातीवर १०-१५ बैलांची रांग फिरत असते. पहाटेपासून जुपी धरली जाते. बैलांच्या खुराखाली बाजरीची कणसे तुडविली जातात. उन्हं चांगली निबर होईतो ते काम चालतं. त्यानंतर गरमगरम भाकरी, चटणीची न्याहारी होते. न्याहारीनंतर लगोलगच पुन्हा जुपी होते. नंतर सूर्यनारायण चांगला डोक्यावर येईतो काम चालते. पातवाल्याच्या पोटात कावळे ओरडतात. उन्हाने जीव लाहीलाही होतो. बैल बिचारी फिरून फिरून भेंडाळून जातात.

पायाखाली सावल्या आल्या की पात सुटते. जनावरांना पाणी दाखवून गव्हाणीला बांधतात. गडीमाणसे दुपारची भाकरी कशीबशी पोटात रिचवून व घडाभर पाणी पोटात घेऊन मांडवाखाली ताणून देतात. दुपारच्या वेळी खळयात सर्वत्र सामसूम असते. दिवस कलल्यावर खळयांना पुन्हा जाग येते. दुपारची झोप ताणलेला गडी ताजातवाना होतो. बैलाची पात पुन्हा सुरू होते व ती चांगला काळोख पडेपर्यंत चालते.

मळणी चांगली झाल्यावर त्याचा डोंगराएवढा ढीग एका कोपऱ्याशी जमतो. आता यापुढचे काम सारे वाऱ्याआधीन. वारा चांगला चालला तर काम झटपट उरकते. नाहीतर त्याची मनधरणी करत गडयांना चाहूरावरच बसून रहावे लागते. वारा

मनासारखा असला तर पाटचा देणाऱ्या पोरांना श्वास घ्यायला उसंत नसते. शाळकरी पोरांच्या परीक्षा आटपलेल्या असतात व सुटीत या खळयाच्या कामाला त्यांना वेढीला घरण्यात येते. वारा एकसारखा व धीमा वाहत असला तर रात्रीच्या जेवणालाही वेळ मिळत नाही. पाटचा देणाऱ्या पोरांचे डोळे पेंगुळतात पण चाहुरावरचा गडी त्याच्यावर खेकसत असतो. गार वाऱ्याच्या झुळकीची गहिरी मिठी त्यांच्यावर अंमल चालविते.

पण हे नेहमीच चालतं असं नाही. कधी कधी वाऱ्याची खपच मनधरणी करावी लागते. गट्टी फू केल्यासारखा वारा रुसून बसतो. झाडाची पत्ती हालत नाही. मग मात्र चाहूरावर वसलेला गडी कंटाळवाणे-पणाने पेंगू लागतो. व अशा वेळी पाटचा देणारी पोरे मळणीच्या ढिगाऱ्याला पाठ टेकून चक्क झोपी जातात. मधेच वारा सुटतो. चाहूरावरचा गडी उठून उफणणीला लागतो. व पेंगुळलेल्या पोरांना उठवून कामाला लावावे लागते. गडी पाटचा सरसावून उफणणीला उभे रहातात. पण वारा नुसताच हुलकावणी देतो. कधी कधी एकाद्या व्रात्य मुलासारखा स्वतः भोवती गिरक्या घेतो. अशा वेळी उफणणी शक्य नसते. कंटाळा आलेला गडी शीण घालवण्याकरिता लावणीची वा पोवाडयाची लकेर सोडतो. रात्रीच्या शांत वेळी ही लकेर सर्व खळयामधून घुमते. पाटचा देणाऱ्या पोरांची झोप मोडते. मग रंगेल लावण्या व मर्द पोवाडयाच्या मैफली रंगतात. शेजारच्या खळयातून साद मिळते. रात्रीच्या निस्तब्ध वातावरणात लावण्या व पोवाडयाचे सूर घुमू लागतात.

कष्टाच्या, जिकीरीच्या या दिवसात सुखाचे व मजेचे दिवस पण असतात. चांदण्यारात्री खळयाच्या सारवलेल्या भुईवर मैफल जमते. ढोलकी, चोणके व लावणीचा सूर जमतो. गावाबाहेरच्या खळयांचे सारे वातावरण या संगीत चांदण्यात न्हाऊन निघते.

कधीं कधी गप्पांच्या मैफली रंगतात. तरणे गडी व नुकतेच परणलेले तरणीबांड पोरे आपल्या पहिल्या रात्रीच्या गमती रंगवून सांगतात जुन्या बापयांच्या जुन्या आठवणी हिरव्याताज्या होतात. थट्टामस्करी चालते. अनिर्बंध वाष्कळ गप्पांच्या पुरात सारे डुंबून जातात. कधी कधी चहाचा बेत पण जमतो. गावातल्या हॉटेलातून अॅल्यूमीनमच्या कळकट केटलीतला चहा मोठा गोड वाटतो.

याच दिवसात जत्रा, उरुस, तमाशे यांना ऊत येतो. कामाच्या रगडयात मालक त्यांना जायला कुठली परवानगी द्यायला. पण जवळपास तमाशा असला की शौकीनगडी निसटतो व पहाटेचा पुन्हा कामावर हजर होतो. कुठल्यातरी जत्रेत चाललेल्या तमाशातल्या शृंगारिक लावण्या खळयात झोपलेल्या गडयांना बेचैन करून सोडतात. कधीकधी जत्राउरसाला जायला परवानगी मिळते देखील परंतु खळयातील कामे रेंगाळली की धन्याचा जीव वरखाली होतो. पुन्हा लग्नसराईचे हेच दिवस लगीनसराईला जावच लागते. -नव्यानेच लग्न झालेला गडी इतरांचा डोळा चुकवून घरी झोपायला सटकतो. दुसऱ्या दिवशी वरोबरचे गडी त्याला चिडवून ओशाळे करून टाकतात.

ह्याच दिवसात डांगर, टरबुजांचा मोसम असतो. नदी, नाले, ओढे यांच्या पाण्याच्या आधाराने डांगर-वाडया उभ्या राहतात भुरकट वाळूच्या अंगावर, शेवाळलेल्या पाण्याच्या सान्निध्यात डांगरांचे व टरबु-जांचे पोपटी हिरवे वेल रांगत असतात. हां हां म्हणता त्यांच्यावर मुलांच्या डोक्याएवढी फळे दिसू लागतात. पिकलेल्या डांगरांचा घमघमाट पहाटेच्या वाऱ्याबरोबर घुमत असतो. हे डांगर, टरबुजे तयार झाले की त्यांच्या भरलेल्या डाल्या डोक्यावर घेवून भोई व भिल्ल खळयाखळयातून फिरतात. ताज्या सर-रशीत डांगरं टरबुजांच्या पाटयाच्यापाटया खरीदल्या जातात. मग रात्रीच्या शांत वेळी खळयाच्या सारव-लेल्या भुईवर बसून पार्टी रंगतात. आजूबाजूचे सवंगडी पण येतात. डाल्याच्या डाल्या खतम होतात. किती खाल्ले तरी तृप्ती होत नाही. आज या खळयात तर उद्या दुसऱ्या खळयात अशा पार्टी रंगतात.

एखाद्या वेळी एखाद्याचे काम रेंगाळले की शेजारचा मदतीला येतो. शेजाऱ्याचे बैल, मजूर मदतीला जातात. या दिवसात सहजीवनाचा आदर्शच निर्माण होतो. हे अनेक पिढया चालत आले आहे.

पावसाळा उराशी आलेला असतो. शेते मशागतीची वाट पहात असतात. इकडे खळयाची कामे बिनाउसंत चाललेली असतात.

शेवटी धान्याची रास खळयात पडली की खळयाचे काम संपले असे समजावे. मग राहिलेल्या बारीक सारीक कामाची कोणी फिकीर करीत नाही. इतर किरकोळ कामे पावसाच्या पहिल्या सरीपर्यंत चालतात.

सारवलेल्या खळयाच्या मध्यावर धान्याची रास पडली की शेतकरी कृतकृत्य होतो. बारा महिन्याच्या कष्टाचे, जिकीरीचे दृष्य फळ बघून त्याच्या अंगात बळीराजा संचारतो. गाडया भरभरून ते धान्य घरातल्या कणग्यांत बंदिस्त होते.

खळे संपल्याची वर्दी कारूनारूंना जाते. मग खळयावर सोनार, न्हावी, शिंपी, सुतार, महार, भिल्ल, लोहार यांची रीघ लागते. एकेकाच्या पदरात धान्य पडते. पदरात पडलेल्या धान्याने कुणाचे समाधान झालय का ? 'मालक पाठीवर मारा पण पोटावर मारू नका' अशी याचना सुरू होते. मग त्यांच्या पदरात पुन्हा धान्य पडते. असे सर्वांचे नंबर लागतात. अशा वेळी गावात आलेले भुलेभटके पण खळयावर गोळा होतात. त्यांना पण विन्मुख पाठविले जात नाही. बैरागी, माकडवाले हे पण पदर पसरून तयार असतात.

यानंतर खळी अगदी निर्जीव होतात. चारा वहाणे वा इतर अशीच कामे रेंगाळत चालतात. मोसमी वारे वाहू लागतात. शेतकऱ्याचे लक्ष पुन्हा शेताकडे जाते. खळयामधील वर्दळ कमी होते. एकेक-जण खळी सावडू लागतात. खळयातला मांडव, कुंपण आवरली जातात. खळी भकास दिसू लागतात. गावातली चुकार जनावरे व गाढवे कचरा फुंकीत तेथे जमतात. गजबजलेली खळी कळाहीन व दीन दिसू लागतात.

पहिल्या पावसाच्या जोरदार सरींनी सारवलेली खळयाची भुई केविलवाणी दिसू लागते व थोडयाच दिवसात गवत व झाडझडोरा तेथे तरारून फोफावू लागतो व खळयाचे सारे वैभव व दिमाख कुठल्याकुठे निघून जाते.

(पान २८८ वरून)

'आता वाफ्यात पाणी कोन वळवणार!' गनानं पुन्हा विचारलं!

'तुम्हीच करा समदं...' सीता एवढी बोलली आणि तिला मळमळून आलं.

'लयी विघडली दिसते तुही तबीत! जा झोप काढ! आता आराम पडेल.'

आपल्या नवऱ्याच्या मोठेपणाची सीताला मौज वाटली. तशी ती जागेवरून उठली अन् त्याच्या कानात कुजबुजली.

एखाद्या लहान पोरागत गनानं उडी मारली. त्याचा चेहरा आनंदानं भरून आला.त्याच्या मनातील शहरात जाण्याचे खुळे विचार पिकल्या बोराप्रमाणे गळून पडले.

गना जागेवरून उठला बैलांना उठवलं मोट जुंपली. आनंदाच्या अतिरेकानं तो आपल्या भसाडया आवाजात गात होता. आपल्या धुंदीत रममाण झाला होता.

न्याहारीची वेळ टळत होती. वाऱ्यावर पिकं हलत होती. सूर्य बुडतीकडे सरकू लागला होता.

आणि गणा—

सीताच्या चेहऱ्यात त्या जमिनीच्या भावी वारसाला पाहात होता.

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने)

चालविलें मज ज्ञानेशानें !

चालविलें मज ज्ञानेशानें
हें तर जन्मभराचें देणें
हें तर जन्मभराचें लेणें !!

होतें उरलें स्मृतिशेष जणूं मी
उध्वस्त घराची
उठलेल्या संसाराची
वठलेल्या हरित जगाची.

जाणिवहि उरली नव्हती मजला
विश्रब्ध सुखाची
निर्वृत्त जगाची
त्या स्निग्ध निवाऱ्याची.

उरलें होतें माती, पुरती माती
मागील घडीची
खचलेल्या खिडाराची
ग्रामवधूच्या घरकामाची.
पाहत होतें खिन्न वाटुली
माती मातिस मिळण्याची
नामशेषहि न उरण्याची
झिजुन झिजुन मरणाची
होती सोबत रोजघडीला
रासभ, श्वानाची.
मानित होतें सरतें शेवट
ऋतुचक्रांच्या दात्यांमधुनी
दिनरजनीच्या द्वंद्वामधुनी
हेंच आपुलें अटळ जिणें
चालविलें मज ज्ञानेशानें

होतें जडदेहाची, ठिसुळ मनाची
ऐकत होतें नवल कहाणी
द्वापरत्रेतामधली
शिळा अहिल्या तरली.

वाटे ती तापसकन्या धन्या
मज मात्र अनन्या
शापभ्रष्ट ती पुरती होती
चैतन्याची मूर्ति
मी तर होतें येयुन तेयुन
माती माती माती,
आरंभाला–विलयाला, माती !
होती मजसाठी एक सद्गति – माती !
जाणुन हें हृदयाशीं होतें अपुल्याशीं बसलें
कृष्णेसम तो कधि न प्रार्थिला हरी
कुब्जेसम मी कधि न तिष्ठलें घरीं
नटनागर, कधि येईल गिरधारी,
नव्हतें बसलें हरिपायांशीं
घेउन कसलें धरणें
कसलें मजला अधिक उणें
माती मातिस मिळणें !!
चालविलें मज ज्ञानेशानें

मी होतें घटका मोजित पडलें
हें कसलें स्वप्न मला पडलें !
निर्वृत्तीवर होतें माझें सर्व
ज्ञानाचा नव्हता गर्व
कुठला मज सोपान खुला
अवचित अन् मुक्ताई !
हें कसलें स्वप्न मला पडलें
मी होतें घटका मोजित पडलें !
मजभवती पुण्याई
अवतरली कोठुन बाई !
अवचित झालें बाई
अघटित झालें बाई
पुरी नवलाई !
मी होतें घटका मोजित पडलें
अंगीं अन् संजीवन संचरलें

प्रतिवादातील, संतांनीही काळ ओळखला होता हे म्हणणे जरी खरे आहे तरीपण संतांच्या विवेचनाचे प्रमुख लक्ष काळाबाहेर पाहणे हेही होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय डॉ. देशपांडयांची भूमिका ही सरधोपटपणे कालविरोधी आहे असेही नाही. ती एका व्यापक नीतिशास्त्रावर आणि पारस्परिक सामंजस्याच्या कल्पनेवर आधारलेली आहे.

माझी स्वत:ची अडचण अशी आहे की डॉक्टरसाहेब जेव्हा शांतरसाची आळवणी व्हावी असे सुचवितात तेव्हा त्यांना नक्की काय म्हणायचे आहे हे मला कळू शकत नाही. शांतरसाची आळवणी व्हावी म्हणजे पुन्हा नेमकी ज्ञानेश्वरीसारखी आणि इतर संत काव्यांसारखी निर्मिती व्हावी असे त्यांना म्हणावयाचे आहे काय ?

शांतरसाचा रसाविष्कार असे जरी त्यांनी स्वच्छ म्हटलेले असले तरी त्याचा अर्थ विशिष्ट विषय असाच होऊ शकणार नाही काय ? तो तसा होत असेल तर डॉक्टरसाहेबांचे हे सर्व विवेचन निर्मितीला लागणाऱ्या केवळ एका विषयाची सूचना करण्यापलीकडे काय साधत आहे असा प्रश्न उभा राहतो. शांतरसाऐवजी आज जागतिक वाङ्मयात जीवनातील विविध प्रवृत्तींचे, विसंगतींचे Human Nature आणि problem यांचे जे विराट दर्शन घडत आहे, ते वाङ्मयीन परिणामांच्या दृष्टीने त्यांना पुरेसे आणि पर्याप्त वाटत नाही काय ?

एकटया शांत रसावरच केवळ भर दिल्यामुळे शृंगार आणि वीर आणि आयुष्यातील इतर असंख्य प्रेरणा यांना गौणत्व येईल आणि त्यामुळे मानवी आयुष्यातील एका विशिष्ट केंद्रापुरतेच वाङ्मयनिर्मितीचे माध्यम मर्यादित केल्या जाईल.

शांतरसाची योजना केल्यामुळे जगातील सर्व दु:खांना उपाय सापडू शकेल असे जर त्यांना म्हणावयाचे असेल तर शांतरसाने न्हाऊन निघालेल्या ज्ञानेश्वरीने स्वतः ज्ञानेश्वरांच्या काळच्या समाजजीवनावर (की ज्या काळात संन्याशालाही वेदाध्ययन अशक्य झाले होते.) निश्चित कोणता प्रभाव गाजविला ? आणि त्याच्या आलेखनाची नक्की कोणती रीती असू शकते ?

ज्ञानेश्वरी निर्माण होऊनही आज आठ नऊ शतके लोटली असली तरी दरम्यानच्या काळात उच्च वर्गावर केवळ Academic Research आणि खालच्या वर्गावर केवळ सांप्रदायिक तत्त्वज्ञानाचा पगडा, या नात्यांशिवाय संपूर्ण जनमानसात बदल घडून येण्याच्या दृष्टीने कोणत्या प्रभावांचा शोध घेता येऊ शकतो ?

ज्ञानेश्वरीप्रमाणेच इतरही शांतरसांची काव्ये निर्माण झाल्यानंतरही आज विसाव्या शतकात पुन्हा शांत रसासाठी डॉक्टरसाहेबांसारख्यांना सत्प्रवृत्तींना हाक द्यावी लागावी याचाच अर्थ शांतरस आपले ईप्सित साध्य करू शकला नाही असेच सुचवीत नाही काय ? डॉक्टरसाहेबांच्या भाषणाच्या निमित्ताने हे प्रश्न मी केवळ अशासाठी उभे करीत आहे की वाङ्मयीन रसांचा (म्हणजे कलाकृतींचा) खरोखरच लोकजीवनावर प्रभाव पडतो काय, आणि तसा तो पडत असेल तर त्याचे नक्की स्वरूप कोणत्या प्रकारचे असते, याचा विचार नव्याने आणि अधिक सूक्ष्मपणे करण्यात यावा.

डॉक्टरसाहेबांच्या भाषणात वाङ्मयाला प्रेरणा देणाऱ्या संपूर्ण जीवनविषयक तत्त्वज्ञानाची चर्चा आहे. या दृष्टीने त्यांनी फार मोठा आवाका घेतला हे नि:संशय अतिशय मोलाचे आहे. परंतु म्हणूनच की काय प्रत्यक्ष वाङ्मय निर्मितीविषयीच्या प्रमेयविवेचनाला काटशह मिळाला असावा अशी मला शंका आहे.

त्यांच्या विवेचनाविषयी वरील प्रामाणिक शंका आल्या तरी त्यांच्या निवेदनशैलीतील तळमळ अक्षरशः विद्ध करणारी आहे. त्यांचा जुना विद्यार्थी म्हणून, मी त्यांचे अभिनंदन केल्यास 'वळचणीचे पाणी आढचावरी' जाण्याची शक्यता आहे. म्हणून ते टाळतो.

वाघाची शिकार

—बाळासाहेब महाजन

शिकारीचा मजा ढुंढण्यात आहे. तलास करण्यात आहे, असे एक काकाजी म्हणतात. आमच्या पहिल्या शिकारीत हा मजा आम्ही कसा अनुभवला हे सांगतो–

मी आणि माझे मित्र श्री. चितळे, यांना शिकारीचा शौक लागला. दोघांनी मिळून आम्ही नागलवाडी, ब्लॉक शिकारीकरता नक्की केला. याचे कारण हा लॉक दळणवळणाच्या रस्त्यापासून दूर आणि टेकड्यांनी वेढला आहे. त्यामुळे अशा भागात शिकारीकरिता जाताना मोटार, जीप व इतर वाहनांपासून त्रास होत नाही. कारण वाघाची वस्ती अशा ठिकाणी असण्याचा जास्त संभव असतो. आणि एवढ्याच कारणामुळे तो नागलवाडी ब्लॉक आम्ही निवडला. पहिल्या ट्रिपमध्ये तेथे गेल्यावर काय व्यवस्था होईल याची ज़रा आम्हाला शंकाच होती. तरी पण तेथे पोचल्यावर आणि तेथील रेंज ऑफिसरला भेटून आमची राहण्याची वगैरे व्यवस्था होईल काय, अशी विचारणा केली. रेंज ऑफिसर थोडेफार ओळखीचे असल्यामुळे, त्यांनी आम्हाला नर्सरी यार्डच्या स्टोअर रूम्स आहेत, त्यांपैकी एका स्टोअर रूममध्ये राहाता येईल म्हणून परवानगी दिली. हा भाग त्या नागलवाडी गावापासून जवळ जवळ १॥–२ मैल येईल. खुद्द जंगलातच नर्सरी असल्यामुळे विहिरीची सोय केलेली आहे. त्यामुळे पाण्याची सोय चांगली झाली. आमच्याजवळ शिधासामुग्री भरपूर असल्यामुळे तो प्रश्न मिटला होता. बरोबर आम्ही आमचा स्वतःचा नोकर जागोबा नेला होता. शिवाय तेथे चौकशी करून आम्हाला एक तेथील लोकल गाईड मिळाला.

त्याच दिवशी दोघांना दोन ठिकाणी वाघांच्या जागा पाहून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही संध्याकाळी स्वतः जीपने २–४ ठिकाणी गेलो. एका ठिकाणी तर वाघ नुकताच उठून गेला असला पाहिजे अशा खुणा सुद्धा पाहिल्या. परंतु प्रत्यक्ष वाघ मात्र दिसला नाही. ज्या दोघांना पाठविले, त्यांनी सुद्धा वाघाचा पत्ता आणला. त्यांनी पावले पाहिली परंतु त्यांना सुद्धा वाघ दिसला नाही. त्यांच्या सांगण्यावरून व आम्ही ज्या वाघांच्या पावलाच्या खुणा पाहिल्या त्यावरून, एकाच वाघाचे वास्तव्य नाही तर २–३ वाघ येथे आहेत, अशी आमची पूर्ण खात्री झाली. बरोबर आम्ही दोन गारे (वाघाला भक्ष्य म्हणून बांधतात त्या रेड्याला गारा म्हणतात.) नेले होते. संध्याकाळी ते दोन्ही गारे बांधून ठेवले. एक तर आमच्या मुक्कामापासून अगदी जवळ होता व एक ३–४ मैलांवर जे ठिकाण होते त्या ठिकाणी बांधला.

दुसऱ्या दिवशी त्या गाईड्सना बरोबर घेऊन आम्ही जीपने निघालो. सकाळी ७–७॥ ला निघून साधारणतः १ वाजेपर्यंत भटकत होतो. वाघाच्या पावलाच्या खुणा दिसायच्या परंतु जनावर अजूनही दृष्टीस पडले नव्हते. माझ्याबरोबर जी मित्रमंडळी होती त्यांची सुट्टी जास्त नसल्यामुळे मला परत यावे लागले व पुन्हा दुसऱ्या आठवड्यात जावे असे ठरविले. दुसऱ्या आठवड्यात पुन्हा आम्ही निघालो. पुन्हा त्याच नागलवाडीच्या नर्सरी स्टोअर रूममध्ये उतरलो. या ८ दिवसांच्या वेळामध्ये जागोबाने व लोकल गाईड सुब्बन व संतोष यांनी एका वाघाचा आणखी पत्ता लावला

होता. वाघ एका विशिष्ट ठिकाणी असतो असे त्याने पाहिले होते. हे जेव्हा त्याने मला सांगितले तेव्हा आम्हाला वाटलं या वेळेला वाघाची शिकार नक्कीच होणार. सकाळी न्याहारी करून आम्ही बाहेर पडलो. जेवढा जीपचा रस्ता होता, तेथपर्यंत ज़ीपने गेलो. वाघाची राहण्याची जागा ही दाट जंगलात असल्यामुळे आम्ही पायी पायी बंदूका घेऊन समोर निघालो. साधारण अर्धा पाऊण मैल चालल्यानंतर त्याची जागा आमच्या दृष्टोत्पत्तीस आली. आम्ही जवळ गेलो. खडकाळ गुहेसारख्या जागेत वाघ वसत होता. अतिशय कठीण अशी जागा होती. जवळून पाण्याचा अगदी लहानसा झरा होता. एका ठिकाणी डबके साचले होते. २-४ लहान लहान दगड मारून पाहिले. वाघ असेलच तर बाहेर येईल. परंतु वाघाची चाहूल लागली नाही. वाघ नाही ह्याची पूर्ण खात्री करून घेतली व शेवटी आम्ही त्याच्या गुहेत गेलो. आतील जागा अत्यंत स्वच्छ आणि थंड अशी होती. वाघाचे केसही तेथे पडलेले असल्यामुळे वाघाचे वास्तव्य तेथेच असणार याबद्दल शंका नव्हती. आणि आज रात्रौ तेथे मचाण बांधून राहावे असे ठरविले. मचाणावर मी आणि माझे एक सहकारी, असे दोघे बसलो. साधारणत: दुपारी ४ वाजल्यापासून ते जवळ जवळ संध्याकाळी ६-३० वाजे-पर्यंत कोणताही प्राणी तेथे आल्याचा आम्हाचा सुगावा लागला नाही किंवा चाहूल लागली नाही. साधारणत: १०-१०॥ च्या सुमारास तेथे जे डबके होते तेथे कोणीतरी पाणी पीत आहे, असा आवाज आला. परंतु हा आवाज कोणत्या प्राण्याचा असेल हे काही कळले नाही. तेव्हा टार्च मारावा की मारू नये, या संभ्रमात आम्ही पडलो. म्हणून २-३ मिनिटे वाट पाहिली व आणखी काही चाहूल लागते काय याची वाट पाहिली व शेवटी टार्च मारलाच. हे डबके आम्ही ज्या ठिकाणी मचाण बांधले होते त्या मचाणापासून साधारणत: १०० फुटांवर होते. टार्च ३ सेलचा असल्यामुळे त्याचा प्रकाश फारसा पडत नव्हता. तरीपण त्या प्रकाशात तो वाघ नसून ते आस्वल आहे हे स्पष्ट दिसले. आता आस्वलावर वार करावा, तर कदाचित वाघ मिळणार नाही, याकरिता आस्वलावर वार केला नाही. कारण आमचे मुख्य लक्ष्य वाघ होते. मारावयाचा तर वाघच. थोड्या वेळाने आस्वल आमची काही एक दखल न घेता पाणी पिऊन निघून गेले. रात्रभर आम्ही मचाणावर होतो. परंतु वाघ मिळाला नाही. शेवटी सकाळी ६ वाजता मचाणावरून उतरलो व आमचा मुक्काम गाठला. वाघ त्या जागेवर साधारण १०-३० ते ४ वाजेपर्यंत असतो, असे गाईड्सने सांगितले म्हणून परत दुसऱ्या दिवशी आम्ही १०-३० ला आमच्या कॅम्पवरून निघालो व १२ च्या सुमारास जंगलाच्या रस्त्यावर गाडी थांबविली. परत पायी पायी हळूहळू जाऊन साधारण वाघ जेथे बसतो, त्या जागेपासून सुमारे १०० फुटांवर जाऊन पोचलो. या वेळेस सुद्धा मी, माझे मित्र आणि दोघे गाईड्स असे चवघे जण होतो. आम्ही त्या गुहेपासून साधारण १०० फुटांवर पोचलो असताना वाघाला आमची चाहूल लागली आणि तो गुहेतून बाहेर येऊन आमच्या बाजूला न येता आमच्या विरुद्ध दिशेने खडकावरून १० फूट उंच उडी मारून खडकापलिकडे गेला. यावेळी आम्हाला परत वाघ दिसला, परंतु, बार करण्याकरिता एक क्षण सुद्धा मिळाला नाही. वाघ दिसला याचाच आम्हाला खूप आनंद झाला. आता पुन्हा वाघाला सोडावयाचे नाही, असा पूर्ण निश्चय केला.

तिसऱ्या दिवशी जवळ जवळ आदल्या दिवशीचीच पुनरावृत्ति झाली, असे म्हणण्यास हरकत नाही. फक्त या वेळेस वाघ वरून न जाता पाटाने निघून गेला. म्हणजे आजचाही दिवस फुकट गेला. वाघाची जागा निश्चित झालेली असल्यामुळे दुसरीकडे कोठेही न फिरता चौथ्या दिवशीही दुपारी त्याच ठिकाणी जाण्याचे ठरविले. दुसऱ्या वाघाची जागा साधारण दोन मैलांच्या अंतरावर असलेली पाहिली व मागच्या दिशेने निघालो. साधारण १॥ मैलांवर एक आडीगोटा म्हणून जागा होती. येथे बाराही महिने पाणी राहते व ह्या ठिकाणी सर्व जनावरे पाणी पिण्यास येतात. साहाजिकच उन्हाळ्यात अशा थंड जागेत आस्वल, वाघ, चित्ते यांपैकी काही ना काही जनावरे सापडण्याची बरीच शक्यता असते. त्या दृष्टीने आम्ही सर्व मंडळी पायीच ती जागा पाहण्यास गेलो परंतु नशीब बलवत्तर नव्हते. त्या जागी जनावरे असल्याच्या खुणा असून सुद्धा

आम्हाला एकही जनावर पाहावयास मिळाले नाही. त्याच नाल्याने आणखी साधारण एक मैल पुढे गेल्यावर मध्यप्रदेश व महाराष्ट्राच्या सरहद्दीवर एक वाघदरी म्हणून फारच छान जागा आहे. त्या ठिकाणी शंभर टक्के वाघ असतातच, असे आतापर्यंत जेवढे खेडूत भेटले, त्यांचे म्हणणे होते, ती जागा पाहून येण्याचे निश्चित करून त्याच पाटापाटाने पायी दगड-गोटे तुडवीत वाघदरीकडे जाण्यास निघालो. एका ठिकाणी गोटे आहेत आणि वाघाला लपण्याच्या जागाही भरपूर आहेत. एका ठिकाणाहून अचानक एक तरस गुरगुरत बाहेर निघाला. आम्हाला सुरवातीला वाघ किंवा चित्ता निघाला असाच एकंदर भास झाला. आम्ही वाघासाठी प्रयत्नात असल्यामुळे, तरसावर गोळी चालविली नाही. वाघदरी तर पुढेच होती आणि त्याची एकंदर रचना इतकी भयानक होती की शाब्दिक वर्णन करणेही कठीण आहे. थोडक्यात दोन बाजूने अत्यंत उंच सरळ कडे आणि वरून थोडे थोडे पाणी पडत होते आणि एका प्रचंड खडकाखाली गुहेसारखे असून, तेथे शंकराची पिंड आहे. बरेच भाविक लोक, दरसाल यात्रेनिमित्त तेथे जातात. त्याच कड्याखाली दोन्ही बाजूला साधारण २५ ते ३० फूट खोल अशी कपारी आहे. एका कड्याची उंची निदान १००-१२५ फूट असेल आणि त्या खाली येथे दरी असल्यामुळे साहाजिकच तेथील हवामान बरेच थंड असते. मे महिन्याच्या उन्हाळ्यात वाघाला बसण्यास अशीच जागा लागते. आता वाघदरीजवळ येऊन तर पोहोचलो, परन्तु आत जावयाचे कसे ? प्रत्येकजणाने सावधगिरीने एका बाजूने आत शिरण्याचे आम्ही ठरविले. हातात गोटे घेतले. दोन सहकारी मित्र आत गोटे फेकत असत आणि आम्ही एक एक पाऊल समोर टाकीत होतो. याही वेळेस वाघाचेच नशीब जोरावर होते. कारण आत वाघ बसलेल्या जागेवर खुणा आणि त्याच्या पावलाच्या ताज्या खुणा स्पष्ट उमटल्या होत्या. परन्तु वाघोबाचा पत्ता नव्हता. वाघ तेथे नसल्यामुळे आम्ही ती सर्व जागा व्यवस्थित पाहून घेतली. कारण पुढच्या वेळेस जर येण्याचा प्रसंग आला तर आपल्याला त्या जागेची खडान्‌खडा माहिती हवी. साधारण ४-३० ते पाचचा सुमार असेल. आम्ही सर्व कंटाळून गेलो होतो म्हणून त्याच रस्त्याने, कारण दुसरा रस्ताच नव्हता, परत मुक्कामाला आलो.

रोज रोज हिंडून कंटाळून गेलो होतो. म्हणून पाचव्या दिवशी दुसरीकडे कोठेच न जाता, पूर्ण सकाळ कॅम्पवरच घालविली. नंतर १० च्या सुमारास जेवण आटोपून आज वाघ कसा कोंडीत पकडायचा व काय तयारी करावयाची यावर चर्चा सुरू केली. निष्कर्ष हा निघाला की वाघ वरच्या बाजूने जेथून जातो त्याच्या मार्गावर एकाने बसावे. दुसऱ्या दोघांनी ज्या पाटापाटाने वाघ आदल्या दिवशी निघून गेला होता, त्या भागाने जावे आणि दोघांनी जे मधून दोन रस्ते आहेत त्या ठिकाणी बसावे.

ठरल्याप्रमाणे आम्ही जीप घेऊन अर्ध्या रस्त्यापर्यंत गेलो. पुढे जीप जाणे शक्य नसल्यामुळे जीप सोडून सर्वप्रथम वाघाच्या रोजच्या जाण्याच्या मार्गावर एक वाटाड्या व एक शिकारी गेले. साधारण वर पोचण्याकरिता अंदाजे जेवढा वेळ लागतो, तेवढा वेळ सोडल्यावर दुसरे दोन वाटांनी पाटापाटाने वाघाला हुसकावून लावण्याच्या उद्देशाने गेले. मधल्या दोन वाटा श्री. दास आणि गोरे यांनी अडविल्या. तयारी तर पूर्ण झाली. आमचा नोकर जागोबा आणि वायज्या व संतोष हे दोघे जण पाटापाटाने जाताना त्यांना वाघाच्या खालच्या बैठकीवर वाघ झोपलेला दिसला. दोघे इतक्या जवळ आल्यानंतरही त्याला चाहूल लागली नाही, याचा अर्थच तो मस्त खाऊन आला असला पाहिजे. वाघ आणि जागोबा व संतोष यांच्यामध्ये फक्त २५ फुटांचे अंतर होते. वाघ खडकात झोपला होता. परन्तु वाघीण खडकाच्या आड असल्यामुळे की काय या दोघांना दिसली नाही आणि वाघ उठत नाही म्हणून जागोबा वाघाला उठविण्याच्या उद्देशाने खाकरू लागला. आणि खाकरत नाही तोच वाघिणीनं एक जोरदार डरकाळी फोडून या दोघांच्या समोरील खडकावर एका उडीतच हजर झाली. वाघीण १० फूट समोर खडकावर उभी, या भयानक दृष्याने साहजिकच जागोबा आणि संतोष या दोघांचीही

(पुढील मजकूर पान ३०८)

अंतरलेला देव

(पान २४० वरून)

"डोकं कुठेनरीच मरकटत आहे. आपल्याला जगलं पाहिजे. पण, आई हवी जवळ. पहिलं बाळंतपण मुद्दाम माहेरी करतात. 'आई, अग तुला आपल्या ह्या मुलीची व्यथा कशी समजत नाही ? घे ना बोलावून मला. तुझ्या पहिल्या मुलीच्या मुलाच्या मनावर-तिच्या माहेरच्या घरचे काही तरी संस्कार होऊ देत ग, आई !'"

विचारांनी तिला ग्लानी येई. भान हरपल्या-सारखं होई अन् मग तिची तिलाच भीती वाटे.

"काय हे ? असा कमकुवतपणा काय कामाचा? छोटया छोटया गोष्टींच्या इतकं आहारी जाऊन कसं चालेल ? घराबाहेर पडले त्यावेळचा निर्धार आता आईची जबाबदारी सांभाळायला उपयोगी पडू नये ?"

पडलं ! हे उसनं आणलेलं अवसानही तिच्या उपयोगी पडलं. मुलगा नऊ पौंडांचा झाला. डॉक्टरांना फॉर्सेप्सचा उपयोग करावा लागला.

* * *

मुलाच्या मागून तीन वर्षांनी दुसरी मुलगी झाली. ह्या काळात तिने मनाला समजावलं होतं. "आपण लग्न मानून मूल न मानण्याचा मूर्खपणा केला होता. म्हणून पहिल्या मुलाच्या वेळी आपण मनाला आणि शरीराला यातना दिल्या. नवऱ्याशी दुरावा केला. एकांडेपणाने मनाशी झुरलो. स्वतःशीच नव्हे तर नवऱ्याशी आणि होणाऱ्या मुलाशी वंचना केली. अकारण त्यांना क्लेश दिले. नवऱ्याने एकत्र सुखाची स्वप्नं रंगविली. आपण लग्नवेदीवर बलिदानाच्या निर्धाराने चढलो आणि हुतात्मेपणाचा मोह ठेवला. मुलांनी लग्नबंधनं दृढ होतात. पण, आपण दुरावा उभारला. बापाचा पिंड घेऊन जन्माला आलेल्या त्या मुलाच्या भोवती आपण आपल्या मायेचं तोकडं जाळं गुरफटवून, आपण, त्याच्या बापाला परक्यासारखं दूर उभं ठेवलं. त्यामुळे सुख लाभलं नाही. हौतात्म्य योजनं दूर राहिलं. आपण नवऱ्याशी एकरूप कधी झालोच नाही. स्वतःभोवती वेगळ्या वर्तुळात फिरत राहिलो."

मुलगी झाली तेव्हा बापाला बढती मिळाली. त्याने मोठ्या प्रेमाने स्वतः तिचं नाव ठेवलं. श्रीमंतीचं सुखही वाढत होतं बापाची मुलीवर फार माया ! दौऱ्याहून येताक्षणीच पिता-पुत्री सुखसंवादात रंगून जात. ते पाहून ती दंग होत होती. हा अनुभव आगळा होता, त्यातलं सुखही आगळं होतं. संसारात ती गुरफटत चालली होती. बाहेरच्या जगातला बुजरेपणाही संपत चालला होता. तिसऱ्या बाळंत-पणाच्या कल्पनेनं ती उबली नाही. त्यात रंगून गेली. नवरा दौऱ्यावर गेला तरी, आता, तिला एकटं वाटलं नाही. पपा जायचे, यायचे, त्यांचा डबा भरून द्यायचा, होल्डॉल तयार ठेवायचा, त्यांना स्टेशनवर आणायला जायचं. मुलांची तिच्यापुढे धांदल चालायची. तिला रिकामपणा नव्हता. नसता विचार करायला सवड नव्हती. आता तो दौऱ्यावर जात होता, त्याचं दुःख नव्हतं. तो परत येण्याकरिता ओढ लागत होती ती मात्र सुखाची होती.

* * *

आणि मग अचानक पुन: तिच्या जगात वादळ उठलं. मुलांना बरोबर घेऊन स्टेशनवरून नवऱ्याला ती घरी आणायला गेली, तेव्हा पहिल्या वर्गाच्या डब्यातून त्याच्याबरोबर एक तरुण मुलगी उतरली. डब्यामध्ये दुसरं कुणी नव्हतं. ह्या तरुण मुलीचं त्याच्याशी वागणं तिला फार सलगीचं वाटलं.

"कोण होत्या त्या ?" तिने माहिती काढायचा प्रयत्न केला. पण उत्तर देण्याबाबत त्याने मोठीशी आस्था दाखविली नाही. एरव्ही ही गोष्ट ती विसरून देखील गेली असती. पण तिच्या कानावर येणाऱ्या बातम्यांमुळे ठरवून सुद्धा ती गोष्ट तिला मनाबाहेर घालवता येईना. नवऱ्याच्या वर्तनातला तुटकपणा तिला जाणवत होता. वेळी-अवेळी त्याचे दौरेही लांबत चालल्याचं तिच्या लक्षात येत होतं. पण अजून त्याला जाब विचारण्याइतकं कशावर बोट ठेवता येत नव्हतं.

एक दिवस, अचानक, संध्याकाळी त्या तरुण मुलीला तो घरी घेऊन आला. बायकोने ओळख दाख-

विली नाही. हॉलमध्ये बसून खाण्यापिण्याचा कार्यक्रम आटोपल्यावर तो तिला माडीवर घेऊन गेला.

हा अनुभव नवा होता. नवऱ्याच्या ह्या धारिष्ट्याचा ती अंदाज करू शकली नव्हती. त्या तरुण मुलीला माडीवर बसवून तो खाली आला. बायकोला म्हणाला,—

" आज रात्री ही इथंच रहाणार आहे. "

" म्हणजे ? कोण आहेत त्या ?" बायकोने विचारलं.

" आहे माझी एक जवळची मैत्रीण. " तो म्हणाला.

" जवळची मैत्रीण !" दिङ्मूढ होऊन न समल्यासारखं ती स्वतःशीच पुटपुटली. मग धीर करून म्हणाली,

" म्हणजे आतांपर्यंत ऐकत होते ते खरंच म्हणावयाचं !"

" खरं आहे ते." तो शांतपणे म्हणाला.

" खरं आहे ? कधी सांगितलं नाहीस मला ? " ती म्हणाली.

" तेच सांगतो आहे ना आता ? " तो.

" तिला घरी रहायला आणण्याइतकं सगळं पुढे गेल्यावर ? " ती.

" तुला काही कमी करतो आहे कां मी ?" तो.

" बाहेर तिला घेऊन रहात होतात ते कमी होतं कां ? " ती.

" नसते प्रश्न विचारू नकोस भलत्या वेळी. ती आज इथे रहाणार आहे हे नक्की " तो.

ती सुन्न मनाने आत जायला वळली. म्हणजे आता ह्या घरात तिला सवतीबरोबर नांदावं लागणार होतं. नवरा—बायकोच्या दोन विश्वांना एका विश्वात सांधावयाच्या तिच्या स्वप्नात आता कुठे रंग भरू लागला होता. प्रारब्धाच्या एका फटकाऱ्यासरशी साऱ्या संधिरेषा भंगून गेल्या होत्या, त्याचं तिच्यावरचं प्रेम संपलं होतं. " मी तुला काही कमी करतो आहे का ?" ह्या त्याच्या शब्दात त्याची स्वतःच्या कर्तव्याबद्दलची भावना व्यक्त झाली होती. तिला पटली नाही तरी ती बदलविणं तिच्या हातात नव्हतं. नीती—धर्म ! त्यांनी, त्याचा, एक नव्हे चार बायका करण्याचा अधिकार मानला होता. एक नव्हे चार — !

ती स्वतःवरच चिडली—" कशाला उगीच दुःख करते आहेस आता ? उघडया डोळ्यांनी खड्डयात उडी घेतलीस ! हे पुढचं भविष्य काय तुला दिसलं नाही ? प्रेमाची भुरळ पडली तुला ! साऱ्या उदात्त भावनांच्या पोटात अनुभवाचा खंजीर खुपसण्याचं पोक्त शहाणपण, त्या वयात तुला सुचलं नाही. असंच ना ? अग, पण प्रेमाचा सम्राट म्हणवला गेलेला शहाजहान ! त्याने सुद्धा जनाना बाळगला होताच की ! हा इतिहास काय तुला माहीत नाही ?"

मग स्वतःला समजावीत, शांत करीत ती विचार करू लागली.

" हो—! मला सगळं माहीत असायला हवं होतं—समजायला हवं आहे. केलेल्या प्रत्येक चुकीबद्दल प्रायश्चिताचं भरपूर माप मला चुकतं करायला हवं. प्रारब्ध माझ्याशी फार काटेकोरपणाने वागत आहे. त्याला माझी कीव येत नाही. माझी कीव करायला मला फुरसतच नाही. ते ऐश्वर्याचे सुखोपभोग मला परवडायचे नाहीत."

नवरा आणि त्याची मैत्रीण बाहेर गेली होती. घरी जेवणार नव्हती. एकापरीने तिला बरं वाटलं. तिने मुलांची जेवणं उरकवून त्यांना निजवलं. जेवणाची इच्छा नव्हती तरी तिने निश्चय केला,—

" मला जेवलं पाहिजे. अपराध त्यांनी केला आहे. दुसऱ्यांच्या अपराधाकरता स्वतःला शिक्षा काय म्हणून ? "

ती बळेच जेवली. रात्री दोघांना तिने दार उघडलं. तेव्हा त्या नव्या मुलीला त्याने प्रथम वर पाठवलं. आणि मग तो बायकोला म्हणाला,

" तुझी काय सोय केली आहेस ? "

अपमानाची जळण तिला चाटून गेली. ' आपली राखरांगोळी कशी झाली नाही ? ' ह्याचंच तिला नवल

वाटलं तिनं हीच अपेक्षा केली होती. आणि तरीही अपेक्षाभंगाची आशा वाटत होती तिला.

दुसरे दिवशी सकाळी मैत्रिणीला गाडीवर पोहोचवून, नवरा परस्पर ऑफीसमध्ये निघून गेला. मुलांना घेऊन ती जेवायला बसली आणि पोटात दुःखाचे कढ येऊन तिला भडभडून आलं. धाकटी मुलगी म्हणाली,

"आई रडतेस तू ?"

"आई लहान झाली आहे रडायला." मोठा मुलगा हेटाळणीच्या स्वरात म्हणाला.

"बाबा, तूच आता मोठा होऊन डोळे पूस माझे." ती अनवधानाने बोलून गेली.

"आई हा मोठा कधी होणार ग ? अजून माझ्याच वर्गात आहे. तरी काही येत नाही त्याला. आमचे मास्तर म्हणत होते, 'आता काही दिवसांनी आपल्या सगळ्यात लहान बहिणीची बरोबरी करेल तो." मोठी मुलगी म्हणाली.

तिच्या मनाला चरका बसला. घास हातातल्या हातात राहिला.

"मुलगा हूड आहे, त्याचं चित्त, स्थिर, एकाग्र होत नाही. थोडा मोठा झाला की होईल सगळं ठीक !" असं ती आपल्या मनाला समजावीत होती. मन समजत नव्हतं ह्याची अस्पष्ट जाणीव तिला कुठे तरी होत होती. आज मुलीच्या बोलण्याने, पाठीवर चाबकाच्या फटकाऱ्यांनी जाग यावी, तशी तिला जाग आली.

दुःख पहिले कढ विरण्याची सुद्धा वाट पहात नव्हतं. मुलं शाळेत गेली आणि साऱ्या शरीरातलं त्राण गळून गेल्यासारखी ती बिछान्यावर येऊन पडली. आता डोळे अश्रू ढाळायला सुद्धा कबूल नव्हते. डोळे ताठ उघडे ठेवून ती बिछान्यावर पडली होती. पण डोळे पहात नव्हते. उशीच्या बाजूला तिचा हात पडला होता. चेतनाहीन निर्जिव गोळ्यासारखा ! आपल्या शरीराशी त्या हाताचा नातेसंबंधच ती मानत नव्हती. तिचे डोळे, परकेपणाने तो हात न्याहाळून पहात होते का ? तिला कळत नव्हतं. डोळे परके अन् हातही परके ! सगळं शरीर परकं ! ह्या शरीराचा भोग तो त्रयस्थपणे निर्विकारपणे न्याहाळीत होती. सुख-दुःखाच्या जाणिवेपलीकडे गेली होती ती.

नवरा घरी आला. मुलं घरी आली. शरीर उठलं. पाय चालू लागले. हातांना चहा करायचा होता. खायला करायचं होतं. ह्या सगळ्या क्रियेत ती कुठेच नव्हती. नवरा चिडल्यासारखा झाला. म्हणाला,

"काय झालंय काय तुला ? आता गेली ना ती ? मुलांची काही फिकीर करशील की नाही ?"

शरीराचे भोग भोगायला ती सिद्ध झाली होती. सुखदुःखांकित मन तिने काढून घेतलं हातन्. पण त्यानं भागणार नव्हतं. अतिथीला मुलाच्या मांसाचं भोजन घालून अतिथी तृप्त होणार नव्हता. आणि त्याची तृप्ती होणार नव्हती, तोपर्यंत वचनभंगाचा दोष टळणार नव्हता. चांगुणेला ते भोजन मिटक्या मारत खायला हवं होतं. अश्रू न ढाळता.

ती मन सावरायला लागली. जाग्यावर येऊ लागलं तसं ते पुनः रडू लागलं आईच्या आठवणीनं आक्रोश करू लागलं.

लग्नाच्या त्या दिवशी ती घरातून बाहेर पडली होती, त्या गोष्टीला आता बराच काळ लोटून गेला होता. तिच्या भावाला लागोपाठ तिन्ही मुलीच झाल्या होत्या. तिचा मुलगा हाच आईचा पहिला नातू ! त्याला बघायची आईला उत्सुकता होती. जावयाबद्दलची अढी नाहीशी झाली होती. संधीचीच तेवढी वाट होती. येणं–जाणं सुरू व्हायला वेळ लागला नाही. ह्या तीन–चार वर्षात मात्र तिकडे फिरकायला तिला झालं नव्हतं. वाढत्या संसाराच्या व्यापात ती गळ्यापर्यंत बुडालेली होती. पण आता मन सावरायला पुनः तिला आईकडे जाऊन यावसं वाटू लागलं. तिने त्याप्रमाणे नवऱ्याला विचारलं,

आईकडे जाऊन येते एकदा. अनायासे मुलांनाही सुट्ट्या आहेत."

तिचा विचार त्याला आवडला. छातीवरचं ओझं कमी झाल्यासारखं वाटलं. आपल्या स्वाभाविक चांगुलपणानं तो तिला पोचवायला सुद्धा तिच्याबरोबर गेला.

आई चाणाक्ष होती काहीतरी बिघडलं आहे हे समजायला आणि मुलीकडून ते काढून घ्यायला तिला वेळ लागला नाही. तिची त्यावरची प्रतिक्रिया मात्र मुलीला अनपेक्षित अशी होती.

" आता तावडतोब घरी जा. " आई म्हणाली.

मुलीनं आईला मध्येच अडविण्याचा प्रयत्न केला. पण आई निश्चयाने म्हणाली,

" आताच कुठे आली आहेस. तुला 'जा' म्हणणं सुखाचं का वाटतं आहे मला ? पण कठोर वाटलं तरी मला तुला सांगितलं पाहिजे. ह्या प्रसंगी तुझं हे इकडे निघून येणं अगदी वेडेपणाचं आहे. वेळीच करायचं ते केलं नाही तर निस्तरण्याच्या पलिकडचं होऊन बसेल. "

" आई, निस्तरणं आपल्या का हातात आहे ?" ती.

" हो आपल्याच हातात आहे. " आई.

" कायदा त्यांच्या पाठीशी असताना ?" ती.

" कायदा मुलीच्या तर पाठीशी नाही ना ? ती कुणी तरी आपल्यातलीच आहे म्हणालीस ती ?" आई.

" पण धर्म बदलणं तर तिच्या हातचं आहे ना ?" ती.

" हे बघ, तू एक करून बसली आहेस. आणि आता 'तिला' रस्ता दाखविण्याची फिकीर करताना दिसते आहेस. आपल्या पायावर आपल्या हातांनीच धोंडा पाडून घ्यायचा आहे का तुला ? मुलगी लहान दिसते. मूर्खपणा करण्याचं वय आहे तिचं. त्यातून आजकाल मुली मोकाट सुटलेल्या. आई–बाप नोकरी करायला बाहेर पाठवताहेत ना त्यांना ? ते काही नाही. मुलीच्या आई–वडिलांना समजलं पाहिजे हे. एवढ्या मोठ्या लग्न झालेल्या माणसाशी अजाण मुलगी फशी पडते आहे हे पाहिल्यावर स्वस्थ बसायचे नाहीत ते. काहीतरी बंदोबस्त करतीलच. "

"ही गेली तर दुसरी येईल," ती आपल्याशीच म्हणाली.

"हे बघ, सध्याचा प्रसंग निभवायची तयारी आधी करायची. आणि तुला काय वाटतं ? बायकांचा असा अपराध करणारा तुझा नवरा पहिलाच आहे ? हे दुःखही पहिल्यांदा तूच भोगते आहेत ?"

" दुःख आपल्या हातांनी मी आपल्यावर ओढून घेतलं आहे हे समजत का नाही मला ?" ती म्हणाली.

" भ्रम आहे तुझा. दुसऱ्या बायकांच्या मागे लागायला पुरुषांना धर्माचा परवाना का लागत असतो? बाई ग, पुरुष जातीचाच धर्म आहे तो. आमच्या जुन्या बायकांची म्हणच आहे मुळी. 'साप म्हणू नये धाकला, नवरा म्हणू नये आपला.' धर्म वेगळा झाला म्हणून पुरुषांच्या स्वभावधर्मात काही फरक पडायचा नाही. बायकांनी एक लक्षात ठेवायचं. आपल्या स्थानापासून ढळायचं नाही. कायद्याने लग्न करता येत नसलं, तरी गुप्तपणाने–आणि उघडही–अंगवस्त्र बाळगणारे पुरुष आपल्यात सुद्धा काही कमी नाहीत. आमच्या वेळेला होते, आताही आहेत. त्यांनी चार घरं हुंगली तर 'ते जातीवर गेले' म्हणता येईल. पण बाईनं आपलं घर गमावलं म्हणजे सगळं गमावलं. "

"आई, तूच का हे बोलते आहेत ? सान्त्वनाकरता हेच का शब्द आहेत तुझ्याजवळ माझ्या करता ? पश्चात्ताप करायला सुद्धा मोकळीक ठेवली नाहीस मला. "

ती गोंधळून म्हणाली.

" लग्न झालं नव्हतं, तोपर्यंत नवरा होऊ पहाणाऱ्या त्या माणसाशी विरोध होता माझा. पण लग्न झाल्याबरोबर त्याच्या नवरेपणाच्या नात्याशी माझा विरोध संपला. हे लग्न सुखाचं व्हायचं नाही, हे भाकीत मी केलं होतं. पण आता मला सांगायचं ते इतकंच की तुझं दुःख धर्माच्या विरोधातून निर्माण झालेलं नाही. प्रत्येक बाईच्या वाट्याला कमी जास्त प्रमाणात ते येतंच त्याकरता तू कसला पश्चात्ताप करतेस ? " आई म्हणाली.

" माझ्या दुःखातली हवाच काढून घेतलीस आई तू. तुम्ही जुन्या बायका खरंच फार संयमाच्या ! दुःखं पचवून ते नाहीसं करीत होतात. पचवण्याकरता आयुष्याचं तत्त्वज्ञान उभं करीत होतात. साधं आणि सरळ ! शंकाकुशंकांना गप्प बसविणारं ! म्हणून तोल

डोळ्याला डोळा लागला नाही. झोपेच्या गोळ्यांचा सुद्धा उपयोग होत नव्हता. तो परत आला तेव्हा रात्रीचे आठ वाजून गेले होते. मुली निजल्या होत्या. तिने त्याला जेवायला वाढलं. पण, त्याच्याशी बोलायला तिच्या तोंडून शब्द उमटेना. तो रागावून म्हणाला,—

"आई, तू बोलत नाहीस माझ्याशी ?"

तिने नुसतं त्याच्याकडे पाहिलं. पण, ती बोलली नाही.

"तू बोलणार नाहीस माझ्याशी— बोलणार नाहीस—बोलणार नाहीस ? तू माझी आई नाहीस ?"

त्याचा स्वर वाढत चालला. आईचे दोन्ही दंड हातात धरून तो तिला गदगदा हलवू लागला. पुन: पुन: विचारू लागला,—

"तू बोलणार नाहीस माझ्याशी ? तू आई नाहीस माझी ?"

त्याच हे रूप तिला नवीन होतं. ती घाबरली. तिच्या तोंडून शब्द फुटेना. तो तिला हलवीतच होता, शेवटी प्राण कंठाशी आणून ती ओरडली,—

"बोलीन रे बेटा, बोलीन ! तू माझाच आहेस."

त्याचे हात ढिले पडले, तिने त्याला जवळ ओढलं आणि ती हमसून हमसून रडू लागली तो तिच्याकडे तारवटलेल्या डोळ्यांनी पहात राहिला, नंतर हळू मृदू आवाजात म्हणाला, "आऽई !"

तिने त्याला आणखी जवळ ओढलं. तो तिच्या छातीवर डोकं घुसळत राहिला. अस्पष्ट आवाजात म्हणत होता, —"माझी आई, माझी आई !"

त्याला मिठीत घेऊन ती अंथरुणावर पडली. त्याला गाढ झोप लागली. झोपलेला त्याचा चेहरा कसा शांत, निष्पाप दिसत होता. तिला भडभडून आलं.

"बाटलीतल्या साऱ्या झोपेच्या गोळ्या दोघांनी खाऊन टाकल्या तर एकमेकांच्या कुशीत हे असं शांत मरण येईल आम्हा दोघांना."

मरणातल्या विश्रांतीच्या कल्पनेनंही तिचं मन शांतवलं. समोरच्या शेल्फवरच्या गोळ्यांच्या बाटली-कडे आणि मग, शांत झोपलेल्या मुलाच्या चेहऱ्याकडे ती एकटक पहात राहिली.

घड्याळात दहाचे ठोके पडले. तशी ती दचकली,

"आपण मरणार ! कोण म्हणून मरणार आपण ? का आपण कुठेच नाही ? मेल्यानंतरही सद्गती मिळायची नाही आपल्याला ?"

* * *

ती मेली नाही. आपत्तीत कौल घ्यायला, आईची आठवण तिला हमखास यायची. उठल्यावर प्रथम आई आठवली तिला. माहेरच्या शेतगावावर आंबे खायला जायचं निमित्त चांगलं होतं. त्या नवीन गावात शांतपणा होता. तिला मुलांकडे लक्ष द्यायला जास्त फुरसत मिळणार होती. गाव नवं, म्हणून त्याच्या भटक्या उपद्व्यापालाही आळा बसण्याचा संभव होता. नवऱ्याने पुन: त्यांना पोहोचवून दिलं.

ह्यावेळच्या मुक्कामात आई थकल्यासारखी वाटली. हे छत्र सुद्धा फारा दिवसांच्या भरवशाचं नव्हतं, ह्याचा तो स्पष्ट इशारा तिला मिळाला होता.

संध्याकाळच्या वेळी, आई बरोबर तो देवदर्श-नाला म्हणून परकोटात बालाजीचं मोठं देऊळ होतं, तिकडे जाई. मुलं, धावत, उड्या मारत, पुढे निघत. कधी ढिवरांची मच्छीमारी न्याहाळीत बसत, कधी कणकीच्या गोळ्या अचुक तोंडात झेलणाऱ्या माशांची गंमत पहात. नदीत डुंबायचं, बाजूच्या आंबराईत कोकिळेसारखा आवाज काढीत झाडा–झाडातून हिंडा-यचं, कैऱ्या पाडायच्या, पाडाचे आंबे घरी आणायचे, असा वेळ मजेत जायचा.

देवळाच्या पारावर माय–लेकी गप्पा मारत बसत, कधी न संपणाऱ्या जीवाभावाच्या ! जणू दोघींना माहीत होतं, त्या बोलत नव्हत्या तरी माहीत होतं 'हे अखेरचंच म्हणून ! ' त्यामुळे आडपडदा कसलाच नव्हता. आईशी ही आताची जवळीक दोघींनाही अति–सुखाची झाली होती.

देवळातलं बालाजीचं ते सुंदर ध्यान, जवळ तेवणारा स्निग्ध नंदादीप, मोगऱ्याच्या अर्धस्फुट फुलांचे, संध्याकाळी देवाच्या गळयात पडणारे ते, अति–शुभ्र, गुढग्यापर्यंत पोहोचणारे हार, आजूबाजूची नीरव

शांतता ! देवाच्या समोर पैसा-सुपारी ठेवून हात जोडले, की एक अनिर्वचनीय शांतता माय-लेकींना लाभायची. बालाजीचं ते सुंदर ध्यान दृष्टीसमोरून हलू नये असं वाटायचं. साऱ्या चिंता, ताप-अनुताप, ह्यांचा विसर पडून मन हलकं फुलकं व्हायचं.

देवळात, सभामंडपाच्या गोल घाटदार खांबाला टकून आई बसायची. जवळ, ओटचाखाली, पाय सोडून, ती बसायची. कधी तिनं बोलावं, आईने ऐकावं, कधी आईनं बोलावं, तिने ऐकावं, कधी कुणी काही न बोलताच पुष्कळसं बोलून जावं. त्या सगळ्याच संभाषणात सुसंवाद होता. नीरव स्तब्धतेत कधी पक्षांचे बोल उमटत. कधी मुलांचा हास्य-ध्वनी कानावर पडे. शांततेला, कशी प्रसन्नचित्त हलकीशी जाग आल्यासारखी वाटे. गाभाऱ्यातून नंदादीपाच्या प्रकाशाचा कोवळा पट्टा सभामंडपात उठून दिसे. अंधाराचा पडदा, हळुवार हाताने फक्त उकलण्यापुरता ! नदीच्या पाण्यावर वाऱ्याच्या झुळका, नाजुक लहरी उठवीत. जगन्नायकाच्या विशाल हृदयावर उठणाऱ्या स्पंदनासारख्या ! त्या स्पंदनांनी सारं वातावरण भारलेलं असे. माय-लेकी भारून जात. एकमेकींशी, गाभाऱ्यातल्या प्रतिमेशी, नदीच्या पाण्याशी, पात्रातल्या वाळूशी एकरूप होऊन जात. अवाक् होत. सारं शब्दांच्या पलिकडे ! दिव्यलोकातून मोर-पिसासारखं तरंगत असल्याइतकीच जाणीव !

मग मुलं येत. गडबड करायला लागत. आणि अवाक्पणेच माय-लेकी त्यांच्यामागून चालू लागत. ती मनात म्हणे,--

"ही अंतरीची शांतता, हे असं सुख, जन्मभर पुरवीन मी ! "

* * *

एक दिवस पुराणिक बुवांनी देवळात प्रवचनाचा सप्ताह सुरू केला. माय-लेकी, आता, संध्याकाळच्या आधीच देवळात येऊन बसत. मुलांना मागून, उन्हं खाली आल्यावर, घेऊन येण्याकरता, गड्याला सांगितलेलं असे.

पाचव्या दिवशी, प्रवचन, ऐन भरात आलं होतं. पुराणिकबुवा कर्मयोगाचा विस्तार करणाऱ्या गीतेच्या ओळी, खड्या सुरात म्हणत होते इतक्यात कुठून तरी तिचा मुलगा धावत आला. आईच्या समोर येऊन उभा राहिला. त्याची आई, त्याने काही गडबड करण्यापूर्वीच, त्याला बाहेर घेऊन जाण्याच्या विचारात होती. पण, तेवढ्यात मशिदीत, मुल्लाने बांग द्यावी, तशी तार स्वरात बांग देण्यास त्याने सुरवात केली.

पुराणिक बुवांचा स्वर एकदम खंडित झाला जमलेले सारे चकित होऊन, मुलाकडे पाहू लागले.

तिची आई उठली. मुलाचा हात ओढीत तरातरा रस्त्यावर आली, मुलगी पाठोपाठ होतीच. रागाने आई म्हणाली,—

"कुठली अवदसा आठवली म्हणून तुला घेऊन आले इथे."

ती काय बोलणार ? दुसऱ्या दिवशी उठल्या बरोबर तयारीला लागली. म्हणाली,

"आई आता घरी जायला पाहिजे मला. देव मला अंतरला आहे. तुला मात्र माझ्यामुळे, म्हातारपणी उगीच त्रास होतो आहे. संसाराचे भोग सगळ्यांच्या वाट्याला सारखेच आहेत हे खरं. ते भोगायला, हा बालाजी मला ताकद देईल, अशा विश्वासात आनंद करीत होते मी. माझं प्रारब्ध असं, ह्या देवाचे पायही मला अंतरले आहेत.

वाघाची शिकार (पान २९९ वरून)

गाळण उडाली. परंतु, दोघेही अत्यंत हिमतीचे असल्यामुळे प्रसंगावधान राखून ते त्याच जागी उभे राहिले. इतक्यात काय झाले कुणास ठाऊक, त्या वाघिणीने स्वतःच्या डाव्या खांद्यावरून मागे पाहिले, तिला तिचा साथीदार जाताना दिसला असला पाहिजे; आम्ही असा अंदाज बांधण्याचे कारण एवढेच की संतोष आणि जागोबा हे दोघेही खडकाच्या खाली उभे असतानाही अशा चिडलेल्या परिस्थितीत तिने त्यांचेवर चाल कशी केली नाही ? वाघीणही मागे उडी मारून चालू लागली. वाघीण मागे वळून चालू लागल्या बरोबर आमचा नोकर जागोबा याने वाघीण परत जाताना पाहिली आणि तो ओरडला की 'गोरे बाबू, वाघीण तुमच्या बाजूला येत आहे. सावध राहा. हे ओरडत नाही एवढचात वाघीण श्री. गोरे यांच्यासमोर १० फुटावर येऊन उभी राहिली. वाघिणीचे सर्व लक्ष जागोबा व संतोष यांच्याच बाजूस असल्यामुळे श्री. गोरे यांच्याकडे तिचे लक्ष गेले नाही आणि याचा फायदा घेऊन श्री. गोरे तावडतोब खाली गवताआड बसले. ती वाघीण १० फुटांवर उभी होती. मारावे तर हातात फक्त एक बारा बारी बंदूक. (अशा वेळी त्या बंदुकीने बार करणे फारच धोक्याचे असते) आणि न मारावे तर वाघीण काय करील याचा नेम नाही, अशा द्विधा मनःस्थितीत श्री. गोरे होते. थोडा वेळ विचार केला, शेवटी इतक्या जवळून व जमिनीवरून बारा बारीने वाघिणीवर बार उडविण्यात अर्थ नाही, म्हणून श्री. गोरे अगदी स्तब्ध राहिले. वाघिणीला, आपल्याला काही तरी धोका आहे, अशी पक्की खात्री झाली होती. कारण तिच्या हालचालीच हे सर्व सांगत होत्या. थोडा वेळ थांबून, मागे पाहत पाहत ती निघून गेली आणि गोऱ्यांच्या जिवात जीव आला. इकडे आम्हाला श्री. गोरे यांच्याकडून हाक मारल्यानंतर सुद्धा प्रतिसाद न मिळाल्यामुळे ते जेवढे घाबरले नसतील, तितका मी व श्री. दास घाबरलो होतो. कारण गोरे यांच्याकडून बंदुकीचाही आवाज आला नव्हता आणि त्यांना हाक मारण्यानंतरही उत्तर येत नव्हते. असे पाहून साहाजिकच काळजी उत्पन्न झाली व आम्ही जागा सोडून, कारण आता वाघाची वाट पाहण्यात अर्थ नव्हता, धावत खाली, श्री. गोरे यांच्याकडे निघालो. धावत म्हणणे सोपे आहे. अडथळे पुष्कळच होते व घाईही तितकीच होती. श्री. गोरे उभे होते, त्या ठिकाणी धडपडत येऊन पोचलो. श्री. गोरे यांना कोठल्याही प्रकारचा धोका झालेला नाही, हे पाहून फार समाधान झाले. श्री. गोरे यांनी वर केलेले वर्णन नंतर आम्हाला सांगितले. श्री. गोरे यांनी जो निर्णय वाघावर गोळी न चालविण्याचा घेतला, तो खरोखरच उत्तम होता. कारण अशा परिस्थितीत वाघाने चाल केली असती तरच गोळी झाडणे इष्टच असते. जरी आम्हाला शिकार मिळाली नाही तरी ही एकंदर घटना, जी घडली ती, इतकी चित्तथरारक होती की आम्हाला शिकार न मिळाल्याचे दुःख वाटले नाही. सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर असे निश्चित ठरले की दुसऱ्याही दिवशी या वाघाला अशाच रीतीने कोंडीत पकडून मारावयाचे. आमच्या शूटिंग परमिटला आणखी दोनच दिवसे राहिले होते. आम्ही सर्वजण साधारण ४ वाजता थकूनभागून आणि अत्यंत कठीण अशा रस्त्याने चालून साधारण सहा वाजता मुक्कामावर पोचलो. मुक्कामावर आल्यानंतर प्रथम चहापाणी झाले आणि दुसऱ्या दिवशी शिकारीच्या वेळी वाघाला कोंडीत पकडण्याच्या योजनेसंबंधी चर्चा सुरू झाली. जागोबा आणि संतोष हेही चालून चालून थकले होते. अर्थात आणखी ३-४ नोकर आम्ही लोकांनी कामावर ठेवले होतेच. शिकारीला गेल्यानंतर खाण्यापिण्याची काहीही पंचाईत पडू नये म्हणून आम्ही आटोकाट प्रयत्न करतो. अर्थात काही वेळेला प्रसंग असे येतात की, काही वेळेला म्हणण्यापेक्षा बहुतेक वेळेला प्रसंग असे येतात की जवळ खायला असून सुद्धा काही ना काही कारणामुळे खाण्याचे सामान बरोबर घेतले जात नाही. आणि कडक उन्हात पाणी नाही व पोटात अन्नही नाही, अशी परिस्थिती येते. दिवसभर झाडावर अथवा जमिनीवर बसून हालचाल न करता, काढावे लागतात. असो. रात्रभर विश्रांती घेऊनही दुसऱ्या दिवशी सुद्धा उशिराच उठलो. सकाळी १० वाजेपर्यंत सर्व गोष्टींची नीट योजना आखून साधारण ११ पर्यंत जेवण करून तयार झालो.

साधारण १२–३० ला त्याच जागेवर पोचलो. योजना आखल्याप्रमाणे त्रिकोणात या वाघाला कोंडीत पकडायचे असे ठरले. वरच्या बाजूला खडकाच्या आड जाऊन बसलो. राहिलेल्या खालच्या दोन जागी एका ठिकाणी गोरे आणि जागोवा व दुसऱ्या बाजूला दास आणि संतोष यांप्रमाणे निघाले. या वेळेलाही वाघ आपल्या गुहेतच होता. गुहा वरच्या बाजूला होती. वरच्या बाजूला खडकाच्या आड असल्यामुळे माझ्या दिशेने वाघाला काही शंका येईल, याची शक्यता नव्हती. खालचे लोक जे दोन बाजूने येणार होते त्यांच्याकडून जो काही आवाज येईल, त्या आवाजानेच जर वाघ उठला व उठून आला तर माझ्या दिशेने येईल याची पक्की खात्री होती. ठरल्याप्रमाणे गोरे आणि दास हे दोन दिशेने ह्या गुहेकडे हळूहळू येत होते. साधारण डबक्यापर्यंत १५–२० फूट आल्यानंतर दोघांनाही वाघाचा तेथे माग लागला नाही. त्यामुळे आज वाघ तेथे आलाच नाही किंवा आला असला तरी निघून गेला असेल असा अंदाज झाला. पण कदाचित् वाघ वरच्या भागाला असेल, म्हणून हे दोघे जण आणखी पुढे पुढे यावयास लागले. थोडे आणखी समोर येऊन संतोषने आणखी १–२ गोटे त्या गुहेत टाकले. वाघ आला याची खालच्या लोकांना पूर्ण चाहूल लागली व काहीही काळजी न करता व हळुवारपणे ते दोघे खडकाच्या मधून हळूहळू माझ्या दिशेने येत होते. मी खडकावर उंच भागावर असल्यामुळे वाघाने आपली जागा सोडली व तो माझ्याकडे येत आहे, हे मला स्पष्ट दिसू लागले. परंतु, गोरे आणि दास हे खालच्या भागाला असल्यामुळे वाघाची काहीही हालचाल ते पाहू शकले नाहीत. वाघ हळूहळू वर येत होता. मी खडकाच्या आत बसलो आहे याची वाघाला बिलकुल कल्पना नाही, खालच्या लोकांचा, वाघ नाही असा समज होऊन, ते लोक हळूहळू वर येत होते. वाघ दिसल्याबरोबर मी बंदूक उडविणे हा धोकाच होता. याचे कारण की वाघ उलटला असता तर तो माझ्या अंगावर न येता, खालच्या लोकांच्या अंगावर गेला असता व तेथे पळण्याकरिता किंवा काहीही सावधगिरी घेण्याकरिता अशी काहीच जागा नव्हती. त्यामुळे वाघ जर मागच्या बाजूला गेला असता, तर अतिशय वाईट प्रसंग ओढवला असता, असे मनात ठरवून वाघाला मी माझ्याकडेच येऊ दिलं. आता वाघ आणि मी, आमच्यामध्ये साधारणत २० फूट अंतर होते. मी वरच्या बाजूला असल्यामुळे पुकष्ळच सुरक्षित होतो. वाघ आणखी जवळ येऊ लागला, वाघ परत न जाता आणखी माझ्या बाजूने येईल असा अंदाज करून मी वाघावर गोळी मारली. चालत्या वाघावर गोळी मारल्यामुळे गोळी जरा निसटती पायावर लागली. परंतु तो लंगडत लंगडत न चालता आणखी वरच्या बाजूला २० फूट वर गेला. वार कुठून झाला हे वाघाला बिलकूल समजले नाही. मी खडकाच्या मागेच होतो. पुन्हा मी माझ्या बंदुकीत दुसरी गोळी भरली आणि पुन्हा ३० फुटांवर वाघाची हालचाल किंचित कमी झाली असताना पुन्हा दुसरा बार उडविला. वाघ थोडासा वर चढला आणि पलीकडे नाल्यात निघून गेला. आता माझ्याकडून दोन बार झाल्यामुळे खालच्या लोकांना जरा काळजीच वाटली. बार का झाले, याची त्यांना कल्पना करता आली नाही. म्हणून त्यांनी 'बाळासाहेब, बाळासाहेब,' असा आवाज दिला. वाघ जागच्या जागी न पडल्यामुळे मी त्यांना प्रत्युत्तर दिले नाही. परंतु त्यांना पुसट कल्पना आली की वाघ आहे आणि वाघावर मी गोळी मारली असली पाहिजे. म्हणून ते लोक मी ज्या खडकावर बसलो होतो तेथे येऊन पोचले. माझ्याजवळ बंदूक तयार होतीच. ते लोक आल्यानंतर वाघ जखमी होऊन गेला, असे मी त्यांना सांगितले. आता त्या वाघाला जखमी सोडता येणे शक्य नव्हते. त्याचा पाठलाग करणे भाग होते. म्हणून आम्ही पाच मिनिटे विचारविनिमय करून व बंदुका सुसज्ज करून वाघाच्या मागावर निघालो. साधारण २५–३० फूट लहानसा उंचवटा पार करून आम्ही पलीकडे साधारण झुडपी जंगलात आलो. फार सावधगिरीने चालावे लागत होते. जखमी वाघाच्या मागावर जाणे हे किती धोक्याचं आणि किती कठीण आहे हे त्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय त्याची कल्पना येणे दुरापास्त आहे. ज्या ठिकाणी मी वाघाला पहिली गोळी मारली त्या ठिकाणी मला रक्ताचे डाग आढळून आले. त्यामुळे वाघ नक्कीच जखमी झाला आहे,

याची पूर्ण खात्री झाली. व त्या रक्ताच्या थेंबाच्या मार्गाने आम्ही हळूहळू पुढे निघालो. नंतर १०० फूट अंतर रक्ताचा एकही थेंब दिसला नाही. म्हणून वाघ कोणीकडे निघून गेला याची मुळीच कल्पना येत नव्हती. तरी पण हळूहळू आणखी चारही बाजूला नीट लक्ष देऊन आम्ही समोर जात होतो. २०० ते ३०० फूट समोर जात नाही तोच वाघ खाली बांबूच्या बेटामध्ये पाय अडकल्यामुळे आणि बरेच रक्त वाहिल्यामुळे तशाच पडलेल्या स्थितीत, आमच्या संतोष वाटा-ड्याने पाहिला. आमच्यापैकी इतरांची दृष्टी त्याच्यावर पडली नव्हती. एवढा मोठा थोरला वाघ आणि तो सुद्धा जिवंत पाहिल्यानंतर संतोषचे पाय लटपटायला लागले. तोंडातून नीट शब्दही निघत नव्हता व तो केवळ साहेब साहेब म्हणून स्वतःभोवती गोल फिरू लागला. मी त्याला खांद्याला धरून अरे काय, म्हणून विचारले तेव्हा वाघाच्या बाजूला नुस्ते बोट दाखवून—तो तेथे, तो तेथे— एवढेच तो म्हणाला. त्या बाजूला बघितले तर काय, अजस्र वाघ बांबूच्या बेटात अडकून अर्धवट झिंगलेल्या स्थितीत असलेला दिसला. वाघ जिवंत होता, यात काही वादच नव्हता. या ठिकाणी वाघात आणि आमच्यात साधारण ५० फुटांचेच अंतर राहिले होते. क्षणाचाही विचार न करता माझ्या ४७० नंबरच्या बंदुकीनं मी वाघावर गोळी डागली. या वेळेला वार हुकण्याचा प्रश्नच नव्हता. गोळीने वाघाच्या हृदयाचा अचूक नेम साधला होता. वाघ मेला याची पूर्ण खात्री असून सुद्धा सगळ्यांना सावध राहण्याचे सांगून आम्ही त्याच्यावर ८–१० दगड मारले आणि १० फूट समोर गेलो आणि कुठच्याही प्रकारचा धोका नको म्हणून आणखीही एक बार वाघावर डागला. परत ७-८ दगड मारले आणि तो मेला आहे, याची खात्री झाल्या-वर १५ ते २० मिनिटांनी आम्ही वाघाच्या अगदी नजीक येऊन पोचलो. वाघ मेला आहे, याची पूर्ण खात्री असूनसुद्धा धोका पत्करण्याची मन हिंमत करीना. आणि म्हणून भरलेली बंदूक वाघाच्या अंगावर ढोसून जेव्हा त्याची मान पूर्ण पडली आहे असे पाहिले, याचा खराच जीव गेला हे कळले तेव्हा कोठे हजर असलेल्या प्रत्येकाच्या जिवात जीव आला. प्रत्येकजण आनंदाने नाचू लागला. प्रत्येकाच्या डोक्यावर टोपी अथवा शिकारी हॅट होतीच. त्यांनी टोपी उडविण्यास सुरवात केली आणि सर्व आनंदाने मोठमोठ्याने ओरडू लागले. ३–४ मिनिटांतच सर्वजण पूर्वस्थितीवर आले आणि नंतर वाघाला खाली कसा आणावयाचा याच्यावर विचारविनिमय सुरू झाला.

वाघाची लांबी १० फूट ६ इंच भरली. आणि वजन—वजनाचा काटा नसल्यामुळे मोजता आले नाही. परन्तु वाघ खाली आणण्याकरिता एक मोठी बाज आणि ९ माणसे लागली. यावरून वाघ किती जड होता याची कल्पना येईल.

साभार पोच

पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	किंमत
१. जुम्मन	श्री. श्री. ना. पेंडसे	मौज प्रकाशन गृह, मुंबई ४	६-००
२. बारा रामाचं देऊळ	सरिता पदकी		५-००
३. एक शून्य बाजीराव (नाटक)	श्री. चिं. त्र्यं. खानोलकर		३-००
४. स्मृतिधन	श्री. नानासाहेब चापेकर		१५-००
५. कोंडुरा	श्री. चिं. त्र्यं. खानोलकर	,,	७-००
६. देवाला सगळे सारखे आहेत	महात्मा गांधी	संचालक, प्रकाशन विभाग, दिल्ली ६	
७. इतका लहान, पवढा महान	श्री. प्र. के. अत्रे	ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई-१४	४-००
८. नाद	श्री. गोपाळ कृष्ण भोबे	पाप्युलर प्रकाशन, मुंबई	८-००
९. हेगेल, जीवन आणि तत्वज्ञान	श्री. दि. के. बेडेकर	पुणे विद्यापीठ प्रकाशन	१५-००
१०. अमेरिकेतील सहकारी संस्था	अनु : अं. शं. अग्निहोत्री	नवलेखन प्रकाशन, मुंबई ४	५-००
११. कोलाम	प्रा. भाऊ भांडवकर	सेवा प्रकाशन, अमरावती	२०-००
१२. जेव्हा अकलेला अक्कल फुटते (नाटक)	श्री. दिनकर देशपांडे	राठी पब्लिशिंग हाऊस, नागपूर	१-५०
१३. संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग	प्रा. डॉ. दु. का. संत	अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २	९-००
१४. राज्याभिषेक (नाटक)	श्री. व्यंकटेश वकील	भारतीय ग्रंथ भवन, मुंबई	३-५०
१५. भगवान परशुराम	श्री. कनैयालाल मा. मुनशी	,, ,,	८-००
१६. माझे कवितेचे दुकान	श्री. वा. वा. जोशी	आदर्श प्रकाशन, महाल, नागपूर	२-५०
१७. पृथ्वी गोल आहे (नाटक)	श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर		३-२०
१८. राजमाता (नाटक)	श्री. कृ. बा. भोसले	,,	२-००
१९. साहित्य आणि कला	प्रा. म. ना. लोही	व्हीनस प्रकाशन, पुणे	३-००
२०. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास पूर्वार्ध १	प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे	व्हीनस प्रकाशन, पुणे	२०-००
२१. इथे साहेबाचिये नगरी	सौ. इंदुमती शेवडे	,,	६-००
२२. चिरंतन सीमा	अनुवादक : प्रा. स. ह. देशपांडे	वोरा अँन्ड कंपनी, पब्लिशर्स, मुंबई २	३-००
२३. सुफला भूमि	श्री. पद्माकर कुळकर्णी		३-००
२४. चिन्मय हक्कसूत्रे	प्राचार्य त्र्यं. कृ. टोपे		२-००
२५. मानिनी	श्री. सुधाकर प्रभु		२-००
२६. कलावती	श्री. अमरेन्द्र गाडगीळ		१-५०
२७. चन्द्रोत्सव	अनुवादक : सदानंद रेगे		४-००

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ,

'कला केंद्र' समिती

दि. २७ सप्टेंबर ६६ रोजी 'कला केंद्र' समितीतर्फे चित्रप्रदर्शन भरविण्यात आले.

चित्रप्रदर्शनाचे उद्‌घाटन श्री. कृ. ग. पाठक उपसंचालक, शिक्षण विभाग, नागपूर यांच्या हस्ते सायंकाळी ६–३० वाजता झाले. या चित्रप्रदर्शनात सुमारे १४१ कलाकृती मांडण्यात आल्या. विशेष म्हणजे ह्या प्रदर्शनाच्या बालचित्रकला—विभागात ५३ चित्रे होती.

नाटच–समिती

दि. २ ऑक्टोबर ६६ रोजी सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध विनोदी नट श्री. शंकर घाणेकर यांचे 'गडकऱ्यांच्या नाटकातील विनोदी भूमिका' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

याचवेळी नटश्रेष्ठ श्री. मामासाहेब पेंडसे यांचा षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

कवी कै. अण्णाजी बोबडे स्मृतिदिन

दि. १ ऑक्टोबर ६६ रोजी सायंकाळी ७ वाजता कवी कै. श्री. रा. ऊर्फ अण्णाजी बोबडे यांचा ३२ वा स्मृतिदिन–समारंभ साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते श्री. दि. ब. पंडित संपादक 'महाराष्ट्र' यांचे श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे अध्यक्षतेखाली भाषण झाले.

कवी केशवसुत जन्मशताब्दी महोत्सव

केशवसुत जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त दि. २ ऑक्टोबर ६६ रोजी रात्रौ ८–३० वाजता एक अभिनव कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळीं संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर केशवसुतांच्या काव्यसंग्रहाला श्री. मा. नी. गलगलीकर यांनी पुष्पहार समर्पण केला. कवी केशवसुत गीतगान हा कार्यक्रम श्री. राम फाटक आणि श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी सादर केला. यावेळी— 'नवाशिपाई' 'कोणीकडून कोणीकडे', 'अंतरले पाय तुझे' आणि 'स्फूर्ती' ह्या कविता म्हणून दाखविण्यात आल्या. या गीतगानात सर्वश्री गोपाळ कौशिक, मधुकर गुळवणी, अरविंद दाते, बाळ पुरोहित, विजय भावे, माधव भावे, कु. नीलांबरी बर्वे, कु. माधवी बर्वे, सौ. विद्यावती केळकर, सौ. कुमुद कुळकर्णी, कु. मीनाक्षी जोशी यांनी भाग घेतला.

'केशवसुत–काव्यदर्शन' या कार्यक्रमात 'कवींच्या दृष्टिकोनातून केशवसुत' या सदराखाली खालील कवींनी भाग घेतला.

श्री. शां. के. कानेटकर (गिरीश)	—'हरपले श्रेय'
श्री. आ. रा. देशपांडे (अनिल)	—'गोफण केली छान'

प्रा. म. श्री. पंडित	—'मूर्तिभंजन'
श्री. सोपानदेव चौधरी	—'क्षपूर्जा'
प्रा. या. मु. पाठक	—'प्रत'

यानंतर कवि-संमेलनाचा कार्यक्रम झाला. कवि-संमेलाचे अध्यक्षस्थान कवी श्री. शं. के. कानेटकर (गिरीश) यांनी स्वीकारले.

यावेळी सर्वश्री म. श्री पंडित, शं. के. कानेटकर (गिरीश), वा. रा. कांत, शरच्चंद्र मुक्तिबोध, या. मु. पाठक, आ. रा. देशपांडे (अनिल), वसंत बापट, सोपानदेव चौधरी, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर आणि वसंत सवनीस यांनी भाग घेतला.

दि. ५ ऑक्टोबर ६६ रोजी सायं. ६–३० वा. 'कवी केशवसुत काव्यचर्चा' हा कार्यक्रम झाला.

दि. ७ ऑक्टोवर ६६ रोजी सायं. ६–३० वाजता श्री. द. मो. दामले (सोलापूर) यांनी लिहिलेल्या 'सरस्वतीचे लाडके पुत्र' या पुस्तकाचा आणि युगवाणीच्या 'कवी केशवसुत विशेषांका'चा प्रकाशनसमारंभ सुप्रसिद्ध साहित्यिक आणि 'तरुण–भारता'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे शुभहस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला श्रीमती रत्नप्रभाबाई घारपुरे ह्या दामले–कुटुंबियांच्या प्रतिनिधी म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी; केशवसुतांच्या काव्याचे रसज्ञ समीक्षक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि प्रा. म. श्री. पंडित यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभाचे वेळी प्रा. म. शं. वाबगावकर आणि प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे यांची गौरवपर भाषणे झाली.

आभार प्रदर्शनानंतर केशवसुत जन्मशताब्दी महोत्सवाचा कार्यक्रम संपला.

युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिसच्या सौजन्याने दि. १५ ऑक्टोबर ६६ रोजी रात्रौ ७–३० वाजता 'लिटरेचर अँड आर्टस्' या विषयावरील अनुक्रमे आर्किटेक्चर यु. एस्. ए., यान्की पेन्टर आणि रॉबर्ट फ्रास्ट हे तीन लघुचित्रपट दाखविण्यात आले.

'साहित्यगोष्टी' कार्यक्रम

'साहित्य गोष्टी' या कार्यक्रमात दि. १२ ऑक्टोबर ६६ रोजी रात्रौ ७–३० वाजता चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांचे 'मॉडर्न आर्ट' या विषयावर भाषण झाले आणि त्यानंतर त्यावर सर्वांगीण चर्चा झाली.

श्री. वि. स. खांडेकर पारितोषिक समिती

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिती पुणे, ह्या संस्थेने रुपये ८००१ चा निधी विदर्भ–साहित्य संघाचे स्वाधीन केला असून ह्या रकमेच्या व्याजातून महाराष्ट्रातील नागपूर, मराठवाडा, पुणे, मुंबई व कोल्हापूर ह्या विद्यापीठातून बी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी रुपये ८० ची रोख श्री. वि. स. खांडेकर पारितोषिके देण्यात येतात.

त्यानुसार यंदा मार्च-एप्रिल ६६ मध्ये झालेल्या बी. ए. मराठी ऐच्छिक विषयात प्रथम येणाऱ्या पुढील विद्यार्थ्यांना श्री. वि. वि. खांडेकर पारितोषिक जाहीर करण्यात आले.

१. नागपूर विद्यापीठ	—श्री. पद्माकर रामचंद्र दादेगावकर, उमरखेड
२. मराठवाडा विद्यापीठ	— श्री. सुनंदा कृष्णराव मराठे, खडकेश्वर
३. पुणे विद्यापीठ	— श्री. अनिलकुमार कृष्णराव देवघर, पुणे
४. मुंबई विद्यापीठ	—श्री. दिगंबर विठ्ठल पाध्ये, दादर, मुंबई
५. शिवाजी विद्यापीठ	—कु. शशिकला वसंत पाटणकर, सातारा

परीक्षा समिती वृत्त

(१) आगामी सत्राच्या सर्व परीक्षा दि. २८ आणि २९ जानेवारी ६७ ला होतील.

(२) आवेदनपत्रे सशुल्क भरून पाठविण्याची अंतिम तारीख ५ जानेवारी ६७ पर्यंत ठेवण्यात येत आहे.

(३) नवीन केन्द्र सुरू करताना कमीत कमी २५ परीक्षार्थी परीक्षेस बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

(४) सर्व केन्द्राधिकाऱ्यांनी आवश्यक तेवढयाच आवेदनपत्रांची मागणी करावी. प्रत्येक परीक्षेला किती परीक्षार्थी बसतील याचा निश्चित आकडा कळवावा.

दि. १ नोव्हेंबर १९६६ }

ग. स. देशपांडे
संचालक

अनुक्रमणिका


दिवाळी -
सुखसमृध्दीचे प्रतीक
आणि
सुखसमृध्दी हे
राष्ट्रीय
नियोजनाचे
उद्दिष्ट
चवथ्या
पंचवार्षिक योजनेच्या
उंबरठ्यावर
महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला नव्या दिशा-नवी क्षितिजे

विदर्भ साहित्य संघ

सुप्रसिद्ध नाटककार श्री. मधुसूदन कालेलकर

— नाट्यसप्ताह —

दि. १४ ते २० जानेवारी १९६७, रात्रौ ९ वा.

स्थळ—वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिर

(१) दिल्या घरी तू सुखी रहा
(२) अपराध मीच केला
(३) दिवा जळू दे सारी रात
(४) विजयाचे वारस आम्ही
(५) पदरी पडलं पवित्र झालं
(६) ? ?
(७) ? ?

नटसंच—सर्वश्री राजा परांजपे, सूर्यकांत, विवेक, वसंत ठेंगडी, राजा नेने, अरुण सरनाईक, राजन, बालनट सचीन, शरद तळवळकर, बबन प्रभू, सतीश रणदिवे, नरेन चव्हाण, जयवंत वालावलकर, गोविंद कुळकर्णी, कृष्णकांत दळवी, उदय पाटणकर, दिनेश दिनानाथ, राजस साठे, नंदा फडके, लीला चिटणीस, लता थत्ते, कुसुम देशपांडे, वर्षा, कांचन राजे, कमिनी कदम, संजीवनी, शीला वालावलकर, सुवर्णा सेंजित.

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ सहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १.

अनुक्रमणिका